म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८२८
सन १९२९

[ च्या परीक्षेसाठीं नेमलेलें काव्य ]

डितकृत

# न सुधा.

काव्य

REFBK-0001983
REFBK-0001983

किंमत एक रुपया.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

REFBK-0001983

REFBK-0001983

[ मुंबई युनिव्हर्सिटीनें बी. ए. च्या परीक्षेसाठीं नेमलेलें काव्य ]

वामनपंडितकृत

# नामसुधा.

हें काव्य

## रा. रा. बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए.,

यांनीं

अर्थनिर्णायक व अवान्तर विपुल टिपा देऊन

तपासून शुद्ध केलें.

—:o:—

प्रकाशक व मुद्रक–

अनंत आत्माराम मोरमकर,

श्रीलक्ष्मीनारायण प्रेस, ४०२ ठाकुरद्वार, मुंबई.

मुंबई

जून १९२१

किंमत एक रुपया.

सर्व हक्क प्रकाशकानें स्वाधीन ठेविले आहेत.

सं.७३।५४ २२०

# नामसुधा.

## अध्याय पहिला.

### चरण पहिला.

( श्लोक. )

हरिचरणसरोजीं चित्सुधासारपानें
भ्रमर परमयोगी गुंजती नामगानें,
हरति सकळ दुःखा, हीं सुखाचीं निधानें;
वद, वद, वद, जिव्हे ! वासुदेवाभिधानें. १

हरिपण हरिनामें धातुमूर्तीसि आलें,
हरिमय हरिनामें विश्व संतांसि झालें,
भवभय हरिनामें साधकांचें पळालें;
वद, वद, वद, जिव्हे ! रामनामें रसाळें. २

हरितनु हरिनामें लेखिली सर्व भक्तीं,
सहजसुखनिधानें देखिलीं हीं विरक्तीं,
शुकसनकमुखीं जीं गाइलीं जीतमुक्तीं,
वद, वद, वद, जिव्हे ! टाकुनी लौकिकोक्ती. ३

निगमहि हरिनामें गर्जती वर्णवर्णीं
पतित तरति नामें आश्रमी आणि वर्णी,
हरिपदिं हरिनामी जेंवि मुद्रा सुवर्णी,
जगिं कवण असा जो नाममाहात्म्य वर्णी ?

आकाशअंत न कळोनिहि, अंतरिक्षीं
आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी;
नामप्रतापहि यथामति याच रीती,
सीमा न पावति, तथापि मुनींद्र गाती. ५

उडति मानसहंस जया नभीं,
शलभ त्याचि नभीं उडतां न भी.
अजितनाममहत्त्व ऋषिश्रुती
वदति, तेंचि वदेन यथामती. ६

श्रुतिनिगमपुराणें आगमक्षीरसिंधु
मथुनि, अमृतरूप ग्रंथ हा दीनबंधु
प्रकट करिल आतां वामनात्मा मुरारी,
श्रवणपठनमात्रें जो समस्तांसि तारी. ७

हा ग्रंथ याचिकरितां अमृताभिधानी
नामें प्रसिद्ध ' हरिनामसुधा ' म्हणोनी;
जें नाम गोड, महिमा अति गोड त्याचा,
जो वर्णिती अमृतरूप परादि वाचा. ८

' मोक्ष ' श्रुती वदति ज्यास गुणप्रसादें,
तो पावती सगुणनामसुधानुवादें;
कोण्या मिसेंकरुनि यो हरिनाम वाचे,
नेत्र प्रकाशति तयावरि माधवाचे. ९

' नारायणा ! ' म्हणुनि एक सुतासि बाहे,
नारायणाख्य नर अन्य तयासि पाहे;
' नारायणा ! ' म्हणति लौकिकही प्रवाहीं,
नारायणाक्षिविषय क्षण होति तेही. १०

आधींच साक्षि सकळांसिहि पाहताहे,
जो नाम घे, करुण होवुनि त्यास पाहे.
तो धन्य कीं क्षणहि ज्यावरि विष्णुदृष्टी,
थेंबीं तळें भरितसे करुणांबुवृष्टी. ११

कर्मानुरूपफळदायक साक्षिदृष्टी
सर्वांवरी, तसिच तत्करुणांबुवृष्टी
आहे, परंतु जनपातक आड जेथें,
छत्रें सुधेकरुनि त्या भिजती न तेथें. १२

छायेसही सूर्य जसा प्रकाशी,
जाणे तसा साक्षिहि पापराशी,
वृष्टीसही तोचि करी, तथापि
छत्रांहिं आच्छादिति लोक पापी. १३

न कळतहि पडे हा विष्णुनामाग्नि जेथें,
दुरिततृणगृहाचें भस्म होणार तेथें,
मग सम करुणेची आयती कृष्णदृष्टी
भिजविल, करिते जे सर्वसृष्टयर्थ वृष्टी. १४

जसें हेममूर्तीमधें हातपायीं
दिसे एक सोनेंचि तें सर्व ठायीं,
असा विश्वरूपें स्वयें शेषशायी
स्वनामें जना होतसे सौख्यदायी. १५

घटादीक नारायणाचींच नामें,
तरी तीं अविद्यामयें दुःखधामें;
म्हणोनी पुराणप्रसिद्धें विचित्रें
जगत्पावनें विष्णुनामें पवित्रें. १६

महाभारतीं ये रिती धर्मराजा–
प्रति, श्रीपतीदेखतां, भीष्म आजा
वदे कीं, ‘ऋषी वर्णिती जीं पुराणीं,
धरावी तया विष्णुनामीं शिराणी.’ १७

श्लोकार्थ तो कीं, ‘तुज भूमिपाळा !
सांगेन ते मी हरिनाममाळा,
जेथें प्रसिद्धें गुणकर्मरूपें
नामें पवित्रें महिमाप्रतापें. १८

श्रुतिस्मृतीलागिं महापुराणीं
व्यासादिकांच्या वदताति वाणी,
नामें हरीचीं तुज तींच, राया !
सांगेन सर्वांसहि उद्धराया.’ १९

‘महात्मयाचीं तुज नामधेयें
सांगेन विख्यात मुनींद्रगेयें,’
म्हणोनि भीष्मोदित पद्य जेथें,
महात्मशब्दें गहनार्थ तेथें. २०

‘महात्मा हरी जो अशेषात्मभावें,
घटादीक तेंव्हां तयाचींच नांवें;
तरी तारकें तीं जनाला न होती;
जगत्पावनें जीं ऋषी वेद गाती. २१

म्हणोनि विख्यात मुकुंदनांवें,
जीं वर्णिती वेद मुनींद्र भावें,
सांगेन तीं मी तुज, भूमिपाळा !
प्रसिद्ध जे माधवनाममाळा.’ २२

या कारणें जीं हरिनामधेयें
वेदीं पुराणीं मुनिवर्यगेयें,
ज्यात्या मिसें उद्धरिती जनाला,
जाळूनियां पापमहावनाला. २३

भाषांतरीं कल्पित नाम जेथें,
श्रद्धानुरूपेंचि फळेल तेथें.
प्रताप नैसर्गिक त्यास नाहीं;
प्रसिद्ध नामीं फळ नेणतांही. २४

हें सर्व आपण चराचर देववर्य;
श्रीकांत कारण सुवर्ण, समस्त कार्य.
नामीं स्वयें प्रगटतो भलत्याचि ठायीं;
या भूषणीं कनक केवळ शेषशायी. २५

जगत् कार्य, तो कारण श्रीमुरारी;
स्वयें तोचि सर्वीं वसे निर्विकारी.
स्वरूपें स्फुरद्रूप सर्वत्र आहे;
मुखीं नाम ज्याचें, तयालागिं पाहे. २६

अलंकार तो, मागतां हेम, आला;
‘ नव्हे हेम, ’ हें बोलवेना तयाला.
असीं रामकृष्णादि पुत्रादि नामें,
तरी सर्वही माधवाचींच धामें. २७

मागे अलंकार, सुवर्ण त्याला
दे केंवि सोनार सराफ ? बोला.
उच्चारिते लौकिक शब्द वाणी
ज्याची, तया दुर्लभ चक्रपाणी. २८

न सोनें अलंकाररूपास साहे,
मृषा त्या सुवर्णांत जो भासताहे;
असे हेम मिथ्या अलंकाररूपीं,
सुवर्णीं अलंकार नाहीं तथापि. २९

अलंकारनामें न ये हेम हाता;
अलंकार येतो, स्वयें हेम येतां;
समस्तांस हीं साधती विष्णुनामें,
न विष्णूस हीं बाधती दुःखधामें. ३०

या कारणें ‘ हरि ’ म्हणाल जयासि जेथें,
सर्वात्मतेकरुनि सिद्ध मुकुंद तेथें;
बोलावितां निजशिशूसिच, त्याचि नांवें
विख्यात अन्य नर ‘ ओ ’ म्हणतो स्वभावें. ३१

सुवर्ण म्हणतां, जसें कनककुंडलीं तें दिसे;
मुकुंद म्हणतां, तसा जनसुतादिकीं तो असे.
सुतादि सकळासही करुनि वर्ततो जो हरी,
अशेष जनपातकें करुण तो स्वनामें हरी. ३२

अजितनाम वदो भलत्या मिसें,
करि कृतार्थ अमोघसुधारसें;
करुनि शाकहि भक्षिल औषधी,
न करि ते गुण, हें न घडे कधीं. ३३

न कळतां पद अग्निवरी पडे,
न करि दाह असें न कधीं घडे;
अजितनाम वदो भलत्या मिसें,
सकळ पातक भस्म करीतसे. ३४

श्रीविष्णुधर्मी मुनि येचि रीती
आख्यापिती कीं, ' जरि दुष्टचित्तीं
तो आठवीतां हरि पाप नाशी;
नेणोनिही अग्नि तृणादिराशी. ' ३५

हरी आठवीला जरी दुष्टचित्तीं,
हरी पापमूळा कुमार्गप्रवृत्ती;
कळोनी जरी आठवीजे मुरारी,
हरी पातकें तो अशीं या प्रकारीं. ३६

न ठावा हरी आणि ठावीं न नांवें,
अशाच्या मुखा नाम आलें स्वभावें,
अनिच्छेकरूनी मुखा नाम आलें,
हरी मानितो कीं, ' मला आठवीलें. ' ३७

नसे द्वैत; सर्वांसही स्वात्मभावें
हरी आठवे आठवाच्या स्वभावें;
तयाचेचि वाचेसही नाम जेव्हां,
नरें त्या हरी आठवीलाच तेव्हां. ३८

जरी स्वात्मभाव स्फुरे सर्वभूतीं,
स्फुरे तो अहंकाररूपींच चित्तीं;
अहंशब्द जेथें स्फुरे, नाम तेथें,
स्मृति श्रीहरीची असे सिद्ध एथें. ३९

असाही हरी आठवीतील पापी,
हरी तो हरी सर्व पापें तथापि;
असा आठवीतां अनिच्छेकरूनी,
तरी तो करी शुद्ध, पापें हरूनी. ४०

म्हणोनीच कीं अग्निदृष्टांत येथें,
न जाणोनिही घालितां भस्म तेथें;
न जाणोनिही नाम वाचेसि आलें,
स्वभावें तरी पाप त्याचें जळालें. ४१

न जाणे शिशू अग्निची शक्ति कांहीं,
'जळो तूळ,' इच्छा अशी ज्यासि नाहीं;
तरी, घालितां अग्नि, कार्पासराशी
जळे; ये रिती नामही पाप नाशी. ४२

शिशुकरें अनळें कडबा जळे,
सहज अंगणिं दीसति ते वळे;
परि घरांतिल बीजहि आढळे,
न जळती कणगींतिल जोंधळे. ४३

विषयभोगसुखात्मक कामना,
सहज वेष्टुनि जे असते मना,
मन कुकर्म तिच्याच बळें करी;
सकळपातकमूळ अशा परी. ४४

हुडकुनी असि कुत्सित कामना,
तिजवरी हरिनामहुताशना
जरि अमंगळचित्तहि घालिती,
सकळ पातकबीजचि जाळिती. ४५

'न करुं पातक,' निश्चय हा वडे,
मन तथापिहि पापपथीं पडे;
जरि धरी हरिनामक चित्त हें,
अशुभही शुभ होइल चित्त हें. ४६

जन, न इच्छुनि शुद्धि असी, जरी
न कळतां हरि आठविती, तरी
जळति पापकुळें, अनळें जसीं
न कळतांहि तृणें जळती, तसीं. ४७

येथें म्हणाल, ‘ जळती जरि सर्व पापें,
मूळें न कां जळति नाममहाप्रतापें ?
नेणोनि नाम म्हणतां दुरितासि जैसें
जाळी, न कां सकळ पातकमूळ तैसें ?’ ४८

धातूवरी अनळ नेणत बाळ घाली,
तो अग्नि धातुमळ तों अतिशीघ्र जाळी;
ताम्रादि भस्महि तया अनळेंचि, जेव्हां
कर्ता अभिज्ञ बहु जाळिल धातु, तेव्हां. ४९

न जाणतहि ये मुखा ‘ हरि,’ तथापि पापें हरी;
स्मरोनि महिमा स्मरे वदनिं तींचि नामें जरी,
प्रवृत्तिविषयीं जरी असति त्या जनाचीं मनें,
विरक्त करितो हरि स्वगुणनामसंकीर्तनें. ५०

श्रीमद्भागवतीं अजामिळकथा व्यासें नृपातें शुकें,
नामाचा अमित प्रताप वदतां, हें वर्णिलें कौतुकें;
तेथें निर्णय विष्णुदूत वदती, तो वामनाच्या मुखें
येथें ‘नामसुधें’त वर्णिल हरी, श्रोत्यांस जेथें सुखें. ५१

अध्याय तीन इतिहास महापुराणीं,
टीका तदर्थ रचिली क्षितिलोकवाणी,
अध्याय एथ तितुकेच करी मुरारी,
तीहींसही चरण सुंदर चारचारी. ५२

अध्याय तो प्रथम 'नामसुधें'त तेथें,
त्याहीमधें चरण हा पहिलाचि एथें
संपूर्ण अर्पुनि मुकुंदपदारविंदीं,
सर्वात्मतेकरुनि वामन त्यास वंदी. ५३

---

## चरण दुसरा.

( श्लोक. )

षष्ठस्कंधमुखीं अजामिळकथा, संक्षेपटीका तिची
श्रीगोविंद करील वामनमुखें छायात्मविश्रांतिची;
श्रोत्यांच्या श्रवणोदरांत अलस त्रासा समासें करी;
व्याख्या 'नामसुधा' हरी करितसे, जे पापतापा हरी. १

परिसुनि शुकवाक्यें सर्व भूगोळ भूपें,
नरककथनकाळीं तेथ ऐकोनि पापें,
जननरकनिपातें फार संतप्त झाला;
जगदघहर रायें श्रीशुका प्रश्न केला. २

शुकाच्या मुखें पंचम स्कंध कानीं
परीक्षिन्नृपें आदरें आयकोनी,
' चुके यातना केंवि ? ' हा प्रश्न केला,
पुढें षष्ठ हा तेथुनि ग्रंथ झाला. ३

जें पंचमीं हरिकथामृत दिव्य प्याला,
उद्धाररूप अवघा अनुवाद केला;
यानंतरें पुसतसे परिहार पापा,
जो चूकवी नरकनामक अग्नितापा. ४

नृप म्हणे, ‘ कथिल्या तुम्हि दुर्गती,
परि वदा चुकती कवणे रिती ?
पुरुष आचरल्या कवणे स्थिती,
गमन तो न करी नरकाप्रती ?’ ५

प्रायश्चित्त अघानुरूप करितां हीं नासती पातकें,
ऐशा दुर्गतिनिर्गती कथियल्या रायासि आधीं शुकें.
प्रायश्चित्त समस्त कर्ममय, हें रायासि वाटे वृथा,
बोले, ‘कीं गजशौच हें सकळही, याची वृथा कां कथा? ६

हस्तीतें धुतिलें, जळीं बसविलें, मालिन्यही नाशिलें,
तेणें तें पहिलें स्वकर्म वहिलें तीरींच आरंभिलें,
शुंडाग्रें धरिलें धुळीस, भरिलें सर्वांगही आपुलें,
प्रायश्चित्त दिलें, तथापि न भलें ज्याचें मन क्षोभलें. ७

प्रायश्चित्त जना, कृपामृतघना ! तें सांग, कीं या मना
पापाच्या दहनावरील पवना वारी, हरी कामना;
जों पापीं घटनाप्रवृत्तिरचना, दुर्वार तों यातना.
प्रायश्चित्त पुन्हा, स्मरोनि वचना, बोलें, जगत्पावना !’ ८

करी असा प्रश्न नरेंद्र जेव्हां,
रहस्य सांगे मुनिवर्य तेव्हां.
म्हणे, ‘ खरें होतिल शुद्ध पापी,
न पापबीजें जळती तथापि. ९

अज्ञा जनाला अधिकार जेथें,
न पापबीजें जळतील तेथें;
या कर्मशुद्धी गजशौचरूपा,
हेंही खरें तूं वदलासि, भूपा ! १०

मोठें प्रायश्चित्त तें आत्मविद्या,
नाशी जे का पापमूला अविद्या;
विद्या नाशी पातकें आणि पुण्यें,
नानाजन्मीं संचितें जीं अगण्यें. ११

हें तों खरें, परि न जोंवरि चित्तशुद्धी,
तों प्राणियांसि न घडे निजबोधसिद्धी.
ते शुद्धि तों भगवदर्पणकर्मयोगें,
पापें स्वयें जळति सर्वहि त्या प्रसंगें. १२

कर्मं दासपणें करूनि निपुणें नारायणीं अर्पणें,
पापातें क्षपणें, रमापतिगुणें प्रेमामृता सेवणें,
सत्संगीं वसणें, स्मृतींत असणें, एकांतिचें बैसणें,
सर्वां हें करणें, भवाब्धि तरणें, दुर्वासना मारणें. १३

ऐसी केवळ भक्तिमात्र करितां, कैवल्यही पावती.
भक्तीवांचुनि अन्यथा न चुकती तेव्हांतरी दुर्गती.
मद्याच्या कलशासि शुद्ध करितां व्यर्थंचि तीर्थें जसीं,
श्रीगोविंदपदारविंदविमुखां कर्में समस्तें तसीं. १४

करी प्रायश्चित्तें, तनु विविध तीर्थांत बुडवी,
व्रतें नाना कर्में करुनि, हरिभक्तीस उडवी,
पवित्रें तीं देऊं न शकति तया पावन कळा,
सुरामृद्भांडातें त्रिभुवन नद्या जेंवि सकळा. १५

कृष्णार्पणें करिति जे निज सर्व कर्में,
सिद्धी अनेक घडती हरिदास्यधर्में,
पापें समस्त जळती, उठती विरक्ती,
वाढे जसीजसि मुकुंदपदाब्जभक्ती. १६

हरिभजनिं असें तों शीघ्र कैवल्य लाधे,
नरक चुकति हें तों थोडियामाजि साधे.'
म्हणउनि शुक बोले श्लोक ते व्यासवाणी,
सुजन धरुत चित्तीं हेचि गीर्वाणवाणी. १७

'आयासाविण ही कथा परिसतां गोडी हरीच्या गुणीं
ज्या चित्ता उपजे, निघे सहज तें त्याच्या पदीं तत्क्षणीं;
ऐसें अर्पिति कर्म जे सहजही, जे एकदां त्या मना,
ते स्वप्नीं नयनीं न देखति यमा; कैंच्या तयां यातना?' १८

'इतुकि ही हरिभक्ति कसी जना?'
म्हणसि साध्य जडा मलिना मना;
तरि, नृपा! हरिनामसुधागुणें
सकळ साधनमात्र गमे उणें. १९

न कळतां हरिनामसुधा मुखीं
जरि पडे, जन होय तरी सुखी.
जरि महत्त्व कळोनिहि वैखरी
'हरि' म्हणे, मग काय तया उरी? २०

सुतमिषें हरिनाम अजामिळें
वदनिं आणुनि, उद्धरिलीं कुळें.'
शुक म्हणे, 'इतिहासहि तो, नृपा!
तुज वदेन, करूनि महाकृपा.' २१

## चरण तिसरा.

( श्लोक. )

शुक म्हणे मुनि, ' आयिक, राजया !
द्विज अजामिळनाम कनोजया
निज कनोजपुरीं वृषलीपती
परम पातकि पातकसंगती. १

दासीचा पति नष्ट दुष्ट, अवघें ब्राह्मण्यही टाकिलें,
अठ्यांशीं वरुषें वया सकळही त्यानें तिसीं घातलें,
तीच्या पोषणतोषणार्थ सकळें तो आचरे पातकें,
तीच्या गर्भदरींत जो उपजतां मानी मनीं कौतुकें. २

श्रुति वदति जयाचा गर्भ पोटांत जीच्या,
पुरुषचि सुतरूपें गर्भवासांत तीच्या;
कळत कळत जों जों पुत्र दासीस होती,
द्विज सुख बहु तों तों मूढ मानी स्वचित्तीं. ३

जरठ तो, वृषळीउदरीं दहा
सुतमिषें उपजोनि, सुखी महा;
सुत तिचे अतिसादर खेळवी,
विविध लाड रसें करि, आळवी. ४

नारायणाख्य सुत त्यांत कनिष्ठ झाला,
तो आवडे अवघियांहुनि फार त्याला.
' वृद्धासि याउपरि होइल बाळ कैंचें ? '
भावें अशा करित लालन फार त्याचें. ५

जरठ, खेळवुनी निज बाळ, तों
सफळ मानि अजामिळ काळ तो.
परिसतां वचनें मृदु बोबडीं,
सुखमृगांबुमधें मन दे बुडी. ६

असा खेळवी पातकाच्या फळातें,
करी धन्य तन्नामधेयें कुळातें;
तयाच्या मिसें नाम नारायणाचें
हरी सर्वही पाप त्या ब्राह्मणाचें. ७

'ये ये, नारायणा ! रे !
वद, वद वचनें गोड, नारायणा ! रे !
जेवीं, नारायणा ! रे !
क्षुधित बहुत तूं आजि, नारायणा ! रे !
कोठें, नारायणा ! रे !
त्यजुनि मज नको जावुं, नारायणा ! रे !
मातें, नारायणा ! रे !
तुजविण न गमे वेळ, नारायणा ! रे ! ८

उष्णांत नारायण खेळताहे,
गृहींच नारायण तो न राहे,
नारायणा शीतळ पाज पाणी;'
नारायणीं रंगलि विप्रवाणी. ९

' नारायणा जें प्रिय खाद्य व्हावें,
नारायणा तें अति शीघ्र द्यावें;
नारायणा मी करुं काय वाणी?'
नारायणीं रंगलि विप्रवाणी. १०

'नारायणावांचुनि मी न जेवीं,
नारायणावीण न नार सेवीं.
नारायणा धुंडुनि शीघ्र आणीं,'
नारायणीं रंगलि विप्रवाणी. ११

‘ नारायणास ह्मणि होईल दुष्टदृष्टी,
नारायणास ह्मणि कीटकदंशधृष्टी,
नारायणास ह्मणि रागिजतील कोणी, ’
नारायणस्मरणिं रंगलि विप्रवाणी. १२

‘नारायणासम शिशु त्रिजगांत नाहीं,
नारायणीं न अणुमात्रहि दोष कांहीं,
नारायण, प्रियतमे ! गुणरत्नखाणी, ’
नारायणस्मरणिं रंगलि विप्रवाणी. १३

असा सर्वदा छंद नारायणाचा,
प्रियेसीं सदा वाद त्याच्या गुणांचा.
मनीं स्वप्निंही लागला छंद ऐसा,
जसा जागरीं वर्तवी स्वप्निं तैसा. १४

पापद्रुमीं नवल पुण्य फळासि आलें,
नारायणा म्हणुनि तें सुतनाम झालें.
नारायणा म्हणुनि यद्यपि पुत्र पाहे,
नामप्रताप उगला न तथापि राहे. १५

लक्ष्मीकांतकृपासुधाघन जगीं सर्वांवरी वर्षतो;
जे का पातकझोंपडींत दडती, त्यांतेंचि न स्पर्शतो.
विप्राची अघझोंपडी न कळतां नामाग्निनें जाळिली,
तेंव्हां कृष्णकृपांबुवृष्टि सहसा माथां पडों लागली. १६

नामाग्निनें अघकुळें जळतां अशेषें,
संतोषला हरि तयावरि नामघोषें.
‘ द्यावा तयासि निज केवळ भक्तिधंदा, ’
एसी अहा उपजली करुणा मुकुंदा. १७

टाकूनि तो वृषलिसंगति, भक्तियोगीं
लागोनि, अक्षयनिजात्मसुखासि भोगी.-
ऐसी कृपा उपजली करुणालयाला
निर्माण येविषयिं एक उपाय केला. १८

यमासही मोहन वासुदेवें
केलें असें कीं, यमधर्मदेवें,
असोनि आयुष्यहि त्या द्विजाला,
निष्पापही तो द्विज आणवीला. १९

आयुष्य शेष म्हणऊनिच त्या द्विजासीं
नेलें न विष्णुसदनाप्रति विष्णुदासीं.
आयुष्य शेष असतां यमधर्मराया
तो मृत्युकाळ गमला, तरि विष्णुमाया. २०

अंतीं कथा शुकहि वर्णिल याच रीती,
कीं वांचला तदुपरांतिक तो द्विजाती.
आयुष्यही सरलिया जरि विप्र वांचे,
प्रारब्धनेम लटिके मग या जिवांचे. २१

आतां म्हणाल, 'सुतनाममिषेंच पापें
गेलीं जळोनि हरिनाममहाप्रतापें;
त्याला न भक्ति घडली, म्हणऊनि देवें
भक्तीनिमित्त दिधलें वय वासुदेवें.' २२

जे जे जीवन्मुक्त, ते भक्त मोठे
प्रारब्धाचे भोगिती भोग खोटे;
तैं प्रारब्धें सर्वथा जो न मोडी,
येथें कैसा आपुला नेम सोडी ! २३

दिल्हें त्यासि आयुष्य हें कां म्हणावें, ?
यमा मोहिलें, हेंचि अंगीकरावें.
‘ पुढें शेष आयुष्य तें भक्तिभावें
सरावें, तदंतीं स्वलोकासि न्यावें. ’ २४

असा माधवें सत्य संकल्प केला,
मनीं घातला मोह तेंव्हां यमाला.
‘द्विजाचें कितीएक आयुष्य आहे;
कसा आणवूं ?’ मोहला तें न पाहे. २५

सुतमिषें हरिनाम मुखीं सदा,
जळति त्याकरितां अघआपदा;
परि अगोचर हा महिमा यमा,
म्हणुनि आणवि विप्रकुळाधमा. २६

द्विजाचे दुरन्याय ते आठवीले,
तिघे दूत आणावया पाठवीले,
उभे मस्तकीं तांबडे केश भारी,
मुखें वांकुडीं, अंग नानाविकारी. २७

काळीं मुखें, मारिति चंड हाका,
‘ बांधा, धरा, हा नरकांत टाका; ’
धरूनि फांसे विकराळ हातीं,
दंष्ट्रा कराळा वदनीं न मातीं. २८

बहु त्रासला विप्र देखोनि त्यांला,
म्हणे, ‘ त्रास होईल नारायणाला. ’
मुलांमाजि तो गुंतला दूरि खेळीं,
द्विजें त्यासि पाचारिलें अंतकाळीं. २९

अकस्मात ‘ नारायणा ! ये, ’ म्हणोनी
म्हणे विप्र उच्च स्वरें आळवोनी.
यमाचा पडे लिंगदेहास फांसा,
उठे विप्रवाणीमधें घोष ऐसा. २०

निघे स्थूळदेहांतुनी लिंग जेव्हां,
सुताच्या मिसें नाम वाचेसि तेव्हां;
उडी त्यामधें घातली विष्णुदूतीं,
गदा, शंख, पंकेरुहें, चक्र हातीं. २१

ते तोडिले पाश तिहीं यमाचे,
जे किंकर श्रीपुरुषोत्तमाचे,
दटाविले ते यमदूत दापें,
त्या ब्राह्मणा सोडविलें प्रतापें. २२

टकमकां यमदूत तयांकडे
चकित होवुनि पाहति बापुडे;
धरुनि धैर्य तथापिहि त्यांप्रती
समयिं त्या यमकिंकर बोलती. २३

---

## चरण चवथा.

( श्लोक. )

तीघ तयांसि म्हणती, ‘ यमशासनाला
उल्लंघणार तुम्हि कोठिल ? कोण ? बोला.
सांगा, तुम्ही अमर, कीं उपदेव, किंवा
गंधर्व सिद्ध, करणार सुरेंद्रसेवा ? १

कोठें हो असतां ? अपूर्व दिसतां, हेमांबरें नेसतां,
अम्लाना कमळांचिया अळिकुळी माळा गळां घालितां;
चौघांही भुज चारि, पीन, सरळे, श्रीचंदनें चर्चिले,
चौघे रत्नहिरण्यभूषणवरीं सर्वत्रही अर्चिले. २

शस्त्रास्त्रें धरितां समान, तरुणे चौघे तुम्ही, सांवळे,
डोळे भाळ विशाळ, पुष्ट बरवे, रूपें बळें आगळे.
तेजें आपुलिया दिगंततमही दूरूनि संहारितां,
दूतांला यमधर्मराजविभुच्या आम्हांसि कां वारितां?' ३

शुक म्हणे, यमकिंकर ये रिती
वदति विष्णुनिदेशकरांप्रति;
परिसतां हरिपार्श्वग हांसिले,
घनरवें मग गर्जत बोलिले ४

'धर्मदूत तरि हे म्हणवीती,
पापहीन नरकाप्रति नेती.'
भाव हा धरुनि आंत, विनोदें
पूसती हरिसभासद मोदें: ५

'धर्मराजविभुचे तुम्हि जेंव्हां
धर्म जाणत असां तुम्हि तेंव्हां;
पूसतों म्हणुनि एक तुम्हांला,
धर्मतत्त्व तुम्हि सत्वर बोला. ६

कर्ते सर्वहि दंड योग्य, अथवा, जीवांमधें नेमिले
कीं तें पाप असो नसो, परि तुम्ही दंडार्ह ते लेखिले !'
ऐसे तत्परिहास दास हरिचे हांसोनियां बोलिले
कीं, निष्पातक जो तयासि नरका हे न्यावया पातले. ७

विनोदें असें दूत सर्वोत्तमाचे
पुसों लागले दूत त्यांतें यमाचे.
प्रवृत्तिप्रवाहें यथाशास्त्ररीती
बरीं उत्तरें मृत्युचे भृत्य देती. ८

तीं वर्णिलीं मुनिवरें; निवडोनि जेथें
संक्षेप, त्यांमधुनही वदिजेल येथें;
वैकुंठनाममहिमाश्रवणानिमित्तें
उत्कंठितें तदमृतार्थ तृषार्तचित्तें. ९

म्हणति, विहित वेदीं ‘धर्म’ त्याला म्हणावें,
स्मृतिनिगमनिषिद्धें ते ‘अधर्म’ स्वभावें.
शुभ अशुभहि कर्में जीं करी जीव जेथें
तनुहृदयिं, पहाती देव सूर्यादि तेंथें. १०

देवांत साक्षि यमधर्महि त्यांत आहे;
पाप्यास तो तदनुरूपचि दंड पाहे;
जीवांसि पातकफळें सकळांसि देतो,
धाडूनि दूत निरयाप्रति त्यांस नेतो. ११

प्रस्तूत हा द्विज अजामिळ शुद्ध पूर्वीं,
संपन्न सर्व सुगुणीं, अतिमान्य सर्वीं,
आणावयास समिधा, कुश, पुष्प, पानें,
रानासि विप्रवर पाठविला पित्यानें. १२

परततां समिधाकुश घेउनी,
तरुण सुंदर देखिलि कामिनी;
पुरुष एक तिसीं रत देखिला,
पिवुनि मद्य मदें बहु मातला. १३

उपवनिं नरनारीद्वंद्व उन्मत्त भारी,
कुसुमशरविहारी, युग्म दिग्वस्त्रधारी;
स्मर हृदय विदारी देखतां या प्रकारीं,
द्विज जरि बहु वारी, नावरे चित्त हारी. १४

मनसिज द्विजमानस, या मिसें
खवळुनी, करि तीकरितां पिसें.
बहुहि आवरितां मन नावरे,
हृदयिं तो मकरध्वज वावरे. १५

मग तिच्या सदनाप्रति जावुनी,
धन तिला तदपेक्षित देवुनी,
रतिरसें वरि लंपट होवुनी,
विचळला अधरासव सेवुनी. १६

पित्यानें बहू अर्जिलें वित्त होतें,
दिल्हें द्रव्य तें या द्विजें सर्व तीतें;
महा मोहला नीच कांतांगसंगें,
स्वधर्मासही टाकिलें त्या प्रसंगें. १७

तिच्या स्नेहपाशें जसा बद्ध झाला,
न ते आवडे धर्मपत्नी द्विजाला.
तिला टाकिलें, टाकिलीं मायबापें;
तिसीं आचरूं लागला सर्व पापें. १८

तिच्या पोषणातोषणाच्या निमित्तें
बहू मेळवूं लागला पापवित्तें.
तिला ध्यातसे सर्वदा दुष्ट चित्तें,
असा कंठिला काळ येणें प्रमत्तें. १९

या कारणें द्विजकुळाधम शीघ्र तेथें
नेऊं, असे धरुनि दंड कृतांत जेथें.
भोगील दुष्कृतफळा नरकासि जेव्हां,
हे पापभोग अवघे सरतील तेव्हां.' २०

शुक म्हणे, ' यमकिंकर ये रिती
वदति धर्म अनेक तयांप्रति;
श्रवणिं ऐकुनि या वचनास, ते
' हरि हरी ! ' म्हणती हरिदास ते.' २१

तों तो अजामिळ तिहीं द्विज सोडवीला,
त्याच्या हितार्थ उपदेश तयासि केला.
नामप्रताप कथिला मग त्याप्रसंगें;
नामें अमोघ हरिच्या जनपाप भंगे. २२

ते उत्तरप्रकरणीं जगदात्मबंधु
बोलेल वामनमुखें करुणैकसिंधु.
स्कंधांत या प्रथम हाचि महापुराणीं
अध्याय दिव्य वदली मुनिवर्यवाणी. २३

अध्याय जैसा पहिलाच तेथें,
तैसाच हा ' नामसुधें'त येथें.
भावार्थ गूढार्थ यथार्थरूपें
नीरूपिला श्रीहरिच्या प्रतापें. २४

द्वितीयापासूनी धरुनि सकळा व्यासवचना
हरी टीकाकर्ता, तदुपरि महाराष्ट्ररचना.
तथापि श्लोकींचें प्रतिपद न भाषेंत मिरवे;
जसे देहीं डोळे, दिसतिल तसे श्लोक बरवे. २५

---

# अध्याय दुसरा.

## चरण पहिला.

( श्लोक. )

अध्यायीं दुसऱ्या प्रतापमहिमा नामामृताचा स्वयें
श्रीवैकुंठपदाब्जभृंग कथिती नानापरी निश्चयें,
गेला ज्या श्रवणें अजामिळहि तो, जेथें स्वयें श्रीपती;
आतां काय, पहा, मुनींद्र वदतो येथूनि रायाप्रती. १

शुक म्हणे, इतुकी हरिकिंकरीं
परिसतां यमकिंकरवैखरी,
सकळनीतिविशारद त्यांप्रती
वदति, आयिक तें, धरणीपती ! २

' अन्याय-आचरण तें, यमकिंकरांचें, '
हें बोलणें परमधर्मधुरंधरांचें
ऐकोनि, मानुनि मनीं हरिदास भारी,
हे श्लोक पांच वदती प्रभु या प्रकारीं. ३

" न पापी, न दंडार्ह, ऐशास जेथें
करीती वृथा ये रिती दंड, तेथें,
अधर्म स्वयें स्पर्शतां धर्मवंतां,
अहो ! कष्ट ते वाटती थोर संतां. ४

" जे मायबाप जनशासनदंडधर्ते,
जे साधु सर्वसम, जे नयनीतिकर्ते,
ऐशांसही विषमता उपजेल जेव्हां,
कोणास हे शरण जातिल लोक तेव्हां ? " ५

अन्याय आचरति संत समर्थ जेथें,
तैसेच सर्व जनही करितील तेथें,
तेव्हां बुडेल जग, भाव धरूनि ऐसा,
हा श्लोक यावरि पहा वदतील कैसा? ६

" जसा वर्ततो लोककल्याणकारी,
जगीं वर्तती सर्वही त्या प्रकारीं;
वदे तो सदाचारशास्त्रार्थ जैसे,
जगीं वर्तती सर्वही लोक तैसे. " ७

श्लोकत्रयी करुनि, "शासनदंडधर्ते
होवूनि, हे न्हति केवळ नीतीकर्ते, "
ऐसें वदोनिहि, अतःपर बोलती कीं,
विश्वासघातकहि केवळ हे त्रिलोकीं. ८

' माझा मित्र सखा,' म्हणोनि हृदयीं विश्वासला जो असा,
अंकीं ठेवुनि मस्तकासहि निजे त्याला वधी, तो असो;
निष्पापा यमधर्मराज ' नरकीं घालूं ' म्हणे जेधवां,
विश्वासूनि अशास शुद्ध जन हे होती कसे तेधवां? ९

' निष्पाप केवळ अजामिळ, नामघोषें
गेलीं जळोनि कृतपापफळें अशेषें.
याला कसें म्हणति पातक?' याचि भावें
नामप्रसंग वदतील महाप्रभावें. १०

येथूनि नाममहिमा वदती हरीचा,
ऐका विलास हरिकिंकरवैखरीचा,
प्रत्यक्षशब्दउपमाअनुमानरीतीं
श्रोत्यांसि जे रिति घडे महिमाप्रतीती. ११

" हा तों भूतभविष्यपातककुळा जाळूनियां राहिला,
कीं नारायणनाम जो विवशही होवूनियां बोलिला;
कल्याणालय नामधेय हरिचें आलें मुखा जेधवां,
याचे जे भवपाश, ते हरियले श्रीमाधवें तेधवां." १२

म्हणाल, 'पापघ्न म्हणूनि त्याचे
आलें न नारायणनाम वाचे;'
'झाला कसा नाश समस्त पापा ?'
म्हणाल, ऐका तरि त्या प्रतापा. १३

जेव्हां ' नारायणा, ये, ' म्हणउनि वदला अक्षरें चारि वाचे,
प्रायश्चित्तें अशेषें सहजचि घडलीं, नाशले दोष त्याचे;
तावन्मात्रेंचि याचीं सकळहि दुरितें पातकेंही जळालीं,
जेव्हां नारायणाचीं स्ववदनसदनीं अक्षरें चारि आलीं. १४

नाशावया पापकुळासि कांहीं
नामाअसा अन्य उपाय नाहीं;
म्हणोनि पद्यद्वय धर्मदूतां
वाखाणिती ते हरिदास आतां. १५

" मित्रद्रोही, मद्यपी, वित्तहारी,
स्त्री, गो, विप्र, क्ष्मापती, यांसि मारी,
ऐसे नाना आणखी पापकारी,
यांला शुद्धी देवुनी नाम तारी." १६

या दों श्लोकीं पापिया शुद्धिधामें
प्रायश्चित्तें बोलिलीं विष्णुनामें,
येथें अंतीं दूसऱ्याच्या चतुर्थी
पादीं, पाहा, बोलिलीं जीं समर्थीं. १७

श्लोकांचिया त्रिचरणीं, 'सकळांसि शुद्धी
अत्यंत, जेथ न पुन्हां अणु पापबुद्धी.'
तें हेंच कीं अजितनाम, म्हणाल, कैसें ?
त्याचे निमित्तहि चतुर्थपदांत ऐसें. १८

विषय बुद्धिस होय रमापती,
म्हणति यास्तव 'तद्विषया मती,'
विषय बुद्धिस ज्याकरितां हरी,
परम उत्तम नाम अशापरी. १९

सकळहि अघबीजें नाशती अंतरींचीं,
अतिअघहर नामें यास्तव श्रीहरीचीं
हरि विषय मतीचा कीर्तनें होय जेव्हां,
करतळगत त्याला चारिही मोक्ष तेव्हां. २०

वदनिं तद्गुणकीर्तन जेधवां,
मन तदर्थक तन्मय तेधवां.
म्हणुनि कीर्तनिं तद्विषया मती,
विषय विष्णु मतीस असे रिती. २१

विषयहि हरि होते बुद्धि तन्नाम जेथें;
म्हणउनि दुसराही होतसे अर्थ येथें;
परि उचित दुजा या प्रस्तुतीं अर्थ झाला,
न कळत हरिनामें पापमेळा जळाला. २२

नारायणस्मरण बुद्धिस पुत्रभावें
झालें, तथापि हरि दृष्टि पडे स्वभावें;
एकास एक जन घेवुनि नाम बाहे,
तन्नामधारक दुजाहि तयास पाहे. २३

न पाचारितां आपणा, जो स्वभावें
स्वयें ' ओ ' म्हणे आणि पाहे स्वभावें,
न सर्वज्ञ तो; विष्णु सर्वज्ञ कैसा,
पहाता न जाणोनि ? संदेह ऐसा. २४

सर्वज्ञ हें कथियलें हरि सर्वसाक्षी,
जेथें स्वनाम, करुणेस्तव त्यास लक्षी;
नामप्रताप हरि पाप कळोनि ऐसा,
पाहे कृपेकरुनि त्यास हरी न कैसा ? २५

' पाचारितों निजसुतासि मदीय नांवें,
म्यां कां कृपेकरुनि त्यास अहो ! पहावें ? '
सर्वज्ञही परि जना न असा उपेक्षी,
नेणोनि नाम म्हणतांहि कृपाळु लक्षी. २६

जो का दयाळु सुख सर्व जना अपेक्षी,
नामप्रताप समजोनि कसा उपेक्षी ?
' नामें अघें जळति, ' हें तरि सर्वसाक्षी
जाणे, अशा रिति अजामिळबुद्धि लक्षी. २७

जीवोद्धारनिमित्त जो अवतरे मत्स्यादि रूपें धरी;
तीर्थें, वेद, पुराण, शास्त्र अवघें त्याकारणें जो करी;
साक्षी, आणि समर्थ, आणि करुणासिंधु स्वयें जो हरी;
तन्नामें भलत्या मिसें वदति जे, त्यांला कसा नुद्धरी ? २८

हा पूर्वपक्ष हरिला हरिनेंच येथें,
आतां पुढें वदति पार्षद काय तेथें ?
" आणीकही म्हणति पापहरें विचित्रें
होती, तरी न जसिं केवळ नाममात्रें. २९

प्रायश्चित्तें बहुत वदती वेदवक्ते, तथापी
त्या त्या कर्मे करुनिहि जरी शुद्ध होतील पापी,
'रामा, कृष्णा, मुरहर, हरे!' या पदीं शुद्धि जैसी,
प्रायचित्तें इतर न कधीं शुद्धि देतील तैसी. ३०

श्लोकीं असें कथुनि तीं चरणेंकरूनी,
ते बोलती जरि 'किमर्थ असें?' म्हणूनी,
श्रीविष्णुदूत हरिनामगुणानुवादें
येथें निमित्त वदतील चतुर्थ पादें. ३१

हरति सकळ पापें उत्तमश्लोकनामें,
तदुपरि रुचितांतीं रूचती विष्णुधामें.
हरिगुण हरिनामीं, पाहतां अर्थ त्याचा;
मग विषयविषांचा अंतरीं ताप कैचा? ३२

कडुवट बहु वाटे शर्करा पित्तरोग्या,
परि परम सिता ते पित्तनाशासि योग्या;
सहज मधुर, तेंही पित्त नासूनि, देहीं
निज अति रुचि दावी; आवडो दे न कांहीं. ३३

कडुवट हरिनामें वाटती पापियाला,
परि दवडुनि पापें, गोड होती तयाला;
मग विषयसुखाची नाठवे त्यास वार्ता,
म्हणउनि न पुन्हा तो होय अन्यायकर्ता. ३४

हरुनि सकळ पापें, गोड होतील नामें,
मग मनिं अभिरामें सूचती विष्णुधामें;
हरि सकळहि पापें, तत्फळें दुःखवृंदें;
'हरि हरि!' म्हणवीलें यास्तव श्रीमुकुंदें. ३५

न कळत हरिनामें नासती पापमात्रें,
परि करिति कृतार्थ श्रीपतिप्रीतिनेत्रें;
तदनु हरिकटाक्षें नाम जाणोनि घेती,
गुणिं मिठि पडतां, ते पातकी केंवि होती ? ३६

मधुर मधुर नामें दाविती अर्थ दृष्टी,
मधुरिपुमय तेव्हां नामनिष्ठांस सृष्टी;
वसति सकळ भूतें, भूषणें जेंवि हेमीं;
हरिमय जग देखे वासुदेवाख्यधामीं. ३७

' नर, ' 'पुरुष,' असीं हीं जीवनांवें अपारें,
गुणमय नरतत्त्वें बोलिजे त्यांस ' नारें. '
अयन सकळ नाराधार आत्माच साचा,
मुनिवर वदती हा अर्थ ' नारायणाचा. ' ३८

मृषा सर्व, आधार त्याला गुणाचा
असे, सर्व नारांसि नारायणाचा;
जगत् व्यक्त अव्यक्त हें सर्व नारें;
प्रकाशी चिदात्मा तदाधार सारें. ३९

व्यक्त प्रपंच नभआदिक पंचभूतें;
अव्यक्त बुद्धि, मन, मीपण, आणि चित्तें;
नारें असीं, अयन आश्रय यांच नारां
नारायण, प्रभु खरा लटक्या विकारा. ४०

नारांसि जो आश्रय या प्रकारें,
नारायणा आश्रय तेंचि नारें;
नारांसि जो आश्रय ईश, झाला
तो जीव, कीं, आश्रय हे जयाला. ४१

नारायणाश्रित अशेषहि जीव नारें
भूमीवरी असति, जेंवि नदींत नीरें.
पाण्यांत त्या दरडि दीसति, जीव तोही.
नारायणात्मक दिसे प्रतिबिंब देहीं. ४२

साक्षी, विमुक्तजनआश्रय, आणिखीही
नारायणार्थ बहु बोलति अंत नाहीं;
हीं ज्ञानगम्य हरिचीं गहनार्थ नामें,
यांवेगळीं सुगम जीं गुणकर्मधामें. ४३

‘ मेघश्यामल कोमलांग,’ म्हणतां, जो सांवळा कोंवळा;
‘ श्रीपीतांबर ’ नाम दाखवि मनीं कासेस सोनेसळा;
वाचे ‘ कौस्तुभकंठ’ नाम म्हणतां, तें रत्न दावी गळां,
‘ भूभारांतक,’ तो रणांगणिं दिसे दंडी खळांच्या कुळां. ४४

‘ श्रीरामा,’ म्हणतांचि, जो करिं धरी कोदंड सीतापती;
‘ गोपीवल्लभ’ वेणु लावुनि मुखीं दावी विचित्रा गती;
‘ लक्ष्मीवल्लभ,’ विष्णु शेषशयनीं, चक्रादि चिन्हें करीं;
ब्रह्मा दाखवि, ‘ पद्मनाभ’ म्हणतां, तो नाभिपद्मोदरीं. ४५

या श्लोकीं अकरावियां चरण हा चौथा कसा वाटतो,
जैसा वामनवामपाद गगनीं ब्रह्मांड तो आटतो.
गंगा त्यांतुनि ही जसी त्रिभुवनीं, टीका तयाची असी
येथें ‘नामसुधा’ मधूनि निघते त्रैलोक्यकर्णीं तसी. ४६

नामीं असे अर्थ अनेक जेथें,
सिद्धन्त हा जो ग्रथितार्थ एथें,
कीं ‘ नाम नाशी अति पापराशी;
नामार्थ पापें सहमूळ नाशी. ’ ४८

स्फुरे अर्थ, वाचेसि ये नाम जेंव्हां;
हरी पातकें आठवे नाम तेंव्हां.
धरी कीर्तनीं चित्त नामार्थ गोडी,
सुखें सर्व सोडी तईं पापखोडी. ४८

प्रायश्चित्तें सर्वहा व्यर्थ जेंव्हां,
नामीं ऐसी शुद्धि अत्यंत तेंव्हां;
या श्लोकाचा अर्थ भावार्थ ऐसा,
चित्ताकाशीं चित्सुधारश्मि जैसा. ४९

---

## चरण दुसरा.

( श्लोक. )

प्रायश्चित्तें बहु, परि न तीं शुद्धि अत्यंत देती,
जैसीं नामें सुलभ हरिच्या जीं गुणां सूचविती.
तेथें जेंव्हां मन रुचि धरी, तो पडे कैंवि पापीं ?
ऐसें पूर्वीं विषद वदले विष्णुदूत प्रतापी. १

आतां म्हणाल, ‘ असि होवुनि विष्णुभक्ती,
दुर्वासना जरि करी विषयीं प्रसक्ती,
हेही न केवळ विशुद्ध, ’ म्हणाल जेंव्हां,
‘सांगों रहस्य’ म्हणती हरिदास तेंव्हां. २

नामींच शुद्धि जरि आचरला, तथापी
धांवेल तेंचि मन मागुति त्याच पापीं;
ते ही न शुद्धि बरवी; परि याच नामीं
जें शुद्धसत्व मन, तें न बुडेल कामीं. ३

न कळत महिमाही, जाळिती सर्व पापें
त्रिभुवनपतिनामें आपुलीया प्रतापें;
पुनरपि मन पापीं धांवतें, तें न धांवे,
जरि हरिगुणगोडी अंतरंगीं ठसावे. ४

ऐसी तथापिहि न इच्छिति शुद्धि कामी;
कामीं प्रवर्तति, जरी हरिच्याच नामीं;
जे इच्छितील असि शुद्धिहि दीर्घबुद्धी,
त्यांची त्वरेंकरुनि होइल सत्त्वशुद्धी. ५.

विषय तामस; राजस इंद्रियें;
गढुळ सत्त्व अखंड गुणद्वयें.
विषय वाटति गोड बहू मना,
म्हणुनि सोडवती न कधीं जना. ६.

करिति कीर्तनही हरिचें मुखें,
परि मनीं अतितुच्छतरें सुखें.
'मन निघो विषयांतुनि ये रिती,'
विषयनिष्ठ कदापि न इच्छिती. ७.

करिति कीर्तन, ते समयीं ' हरी '
वदति मात्र, परंतु न अंतरीं;
प्रकटतो मनिं माधव जे स्थळीं,
प्रबळ ते स्थळिं काम न हा बळी. ८

विषय शत्रु मनीं जयिं वाटती,
मनिं तयीं हरिचे गुण दाटती;
विषयपाश अशेषहि तूटती,
मग कधीं कुपथीं न रहाटती. ९

परि न शुद्धि असी जन इच्छिती;
तरति, जे असि शुद्धि अपेक्षिती;
जरि अपेक्षिति, काय तयां उणें ?
परम शुद्धि रमापतिच्या गुणें. १०

रज, तम, गुण दोन्ही दुष्ट अत्यंत, यांसी
हरिगुण अनुवादीं छेदिती निश्चयासीं.
करुनि विमळ सत्त्वा त्या नरा सत्त्वधीरा,
पुनरपि अणु लागों नेदिती पापवारा. ११

'असिहि शुद्धि अपेक्षिति जे जनीं,
त्वरित ते तरती हरिकीर्तनीं;'
म्हणुनि निर्णय हा अतिनिश्चयें
कथियला हरिच्या भृतकीं स्वयें. १२

'परमशुद्धि न इच्छिल तो जरी,
करिल शुद्धहि पाप पुन्हां तरी;'
म्हणुनि संशय हा धरितो गळां,
तरि पहा तुम्हि येथ अजामिळा. १३

सुतमिषें घडतां हरिकीर्तनें,
पतित उद्धरिलाचि जनार्दनें;
परि हरूनि कुसंग, सुसंगती
करुनि, दीधलि त्यासहि सद्गती. १४

सहज कीं हरिकीर्तन जो करी,
सुमति त्यासहि देइल तो हरी;
परम शुद्धिहि जैं जन इच्छिती,
सुमति दे हरि तोचि रमापती. १५

परि मनीं अतिशुद्धि अपेक्षिती,
त्वरित ते फळ उत्कट पावती.
त्यजिति ते विषयात्मक वासना,
जितचि मुक्ति अहो ! मग त्या जनां. १६

म्हणुनियां मथितार्थ, 'कसेपरी
पतितपावन यो वदनीं हरी.'
त्वरित नासति पूर्विल पातकें,
मग हरी हळु दाविल कौतुकें. १७

इतर शुद्धिहि तो हरि देतसे,
परि जसा क्रयविक्रय होतसे.
करिति जे व्रत, तीर्थ, तपें, जसीं,
हरि विशुद्धिहि देत असे तसी. १८

निज अपत्यजना सकळोपरी
सकळ लक्षिति लोक, असा हरी;
वदनिं नाम अखंड जयांचिया,
करि समस्तहि शुद्धि तयांचिया. १९

म्हणुनि ये रितिनेंचि अजामिळा
सुमति देवुनि, सोडवि तो गळा;
श्रवण हें निजदासमुखें तया
करवुनी, करितो हरि हे दया. २०

इतर शुद्धिस हा महिमा नसे,
अजितनाम न जेथ मुखीं वसे;
म्हणुनियां, जन हो ! भलत्यापरी
पतितपावन यो वदनीं हरी. २१

पतितपावननामपदें जसीं
करिति शुद्धि, न तीं इतरें तसीं;
म्हणुनि 'नेउं नका नरकाप्रती
द्विज,' असें हरिकिंकर बोलती. २२

'नेऊं नका तुम्हि अतःपर या द्विजाला,
संहार ज्यास्तव अघां सकळांस झाला;
कीं जेधवां मरणकाळिं मरों निघाला,
तेव्हां मुखीं पतितपावन विष्णु आला.' २३

मरणसमयिं त्याचें नाम वाचेसि आलें,
म्हणउनि अवघेंही पाप याचें जळालें;
'जितचि अजितनामें हीं न जेव्हां समर्थें,'
म्हणउनि मनिं शंका श्रोतयां या श्रुतार्थें. २४

अभिप्राय हा व्यक्त होईल जेव्हां,
मनींहूनि शंका निवारेल तेव्हां.
अहो! वर्णिला मूळ पद्यार्थ ऐसा,
बरा आयका येथ भावार्थ कैसा. २५

पूर्वश्लोकीं, 'वासनात्यागरीती
जे का शुद्धी इच्छिती, त्यांस होती;'
ऐसे जे का बोलिले, ती द्विजाला
नाहीं झाली, येथ संदेह झाला. २६

"अशेष पापें म्हणतां जळालीं,
जे शुद्धि त्याला न कळोनि झाली;
तों मृत्यु येतां, इतुक्यांत कांहीं
कुकर्म झालें, तरि शुद्धि नाहीं." २७

असें बोलती दूत चित्तीं यमाचे;
म्हणोनी मनीं दूत सर्वोत्तमाचे
विचारूनिया, बोलती, ‘ मृत्यु तऱ्हां,
मुखीं याचिया स्वामिचें नाम जेऱ्हां. ’ २८

‘ देहावसानसमयीं जरि पाप झालें,
देहावसानसमयीं तरि नाम आलें;
कांहींच शुद्धि नसली जरि त्यासि पूर्वीं,
हें एक नामचिहि शुद्धि करील सर्वी. २९

हा अंतकाळ नरकाप्रति जावयाचा,
काळीं अशाहि जरि गर्जेलि नाम वाचा;
मागील सर्वहि अहो ! अघ तें जळालें;
धाकेंचि, जे नरक, सर्वहि ते पळाले. ३०

“ नेवूं नका, ’ म्हणुनि जें म्हणतों तुम्हांला,
तें नाम शेवटिल हें फळलें द्विजाला;
पूर्वी मुखीं सुतमिषें हरिनाम आलें,
तें नाम यासि अतिशुद्धिसि हेतु झालें. ३१

हा आजि नाममहिमा श्रवणासि आला,
सत्संग जो क्षणहि, हाचि फळेल याला.
टाकूनि संग, भजतां हरिनाम घोषें,
दुर्वासना जळति त्या अघबीजशेषें. ” ३२

गंभीर भाव हृदयांत धरूनि ऐसा,
ते बोलिले अजितकिंकर बोल तैसा,
कीं, ‘ प्राणयानसमयीं हरिनाम जेथें,
नेऊं नका पुरुष तो नरकास तेथें. ’ ३३

येथें सूचविलें जनांस सकळां दूतीं हरीच्या असें,
कीं, ' देहीं हरिनाम अंतसमयीं येणार वाचे कसें ?
जैसें पुत्रमिसें अजामिळमुखीं जें नाम होतें सदा,
आलें तेंचि; तदर्थ नाम हरिचें गर्जा मुखीं सर्वदा.' ३४

म्हणति ते हरिकिंकर यावरी,
" तुम्हि म्हणाल, ' न हा स्मरला हरी;'
'सतत हा स्मरला निज आत्मजा;
घडलि शुद्धि' म्हणाल, ' कशी द्विजा ? ' ३५

तरि सुधा कसिही पडतां मुखीं
हरि जरामरणासि, करी सुखी. "
धरुनि भाव मनांत असा बरा,
वदति वैष्णव त्या यमकिंकरां. ३६

" सांकेत जीं निजसुतादिनिमित्त नामें,
संकेतरूप रचलीं परि शुद्धिधामें.
गोविंदनाम हरि, माधव, चक्रपाणी,
कोण्या मिसें तरि वदो, परि धन्य वाणी. ३७

'हरि, हरि! म्हणुनी हा नाचतो काय वेडा ?'
'अज, अजित ! म्हणूनी गर्जतो काय रेडा?'
मुखिं हरि परिहासें ये अशाही प्रकारें,
तरि जळतिल पापें पापियांचीं अपारें. ३८

घडिघडी वदनीं हरि आळवी,
स्वहरिदासपणें जन चाळवी,
सकळ पापकुळें जळती तरी,
करुनि दंभ ' हरी ' म्हणतो जरी. ३९

हरिकथा उदरार्थ जरी करी,
स्वगुण नाम करी भलत्यापरी;
त्रिकितसे उदरार्थ फुलें जरी,
शुभ सुगंध कधीं न चुके तरी. ४०

' हरि ! हरि ! हरि ! ऐसें बोलतां काय होतें ? '
' हरि हरि ! म्हणती, हा नावडे शब्द मातें. '
'हरि' म्हणति असाही हेळणेनें, तथापी
' हरि, हरि !' म्हणतां तो होय निष्पाप पापी. ४१

कोण्या मिसेंकरुनि ये हरिनाम वाचे,
जे पापराशि अवघे जळतील त्याचे;
वाचे जरी सुतनिमित्तक नाम आलें,
सांकेतकीर्तनमिसें अघ तें जळालें. ४२

आतां म्हणाल, ' हरिनाम, समस्त पापें
नासूनि, उद्धरिलही सहज प्रतापें,
दुर्मृत्युनें मरति, दुर्गति सिद्ध यांला;
दुर्मृत्युचे नरक चूकति केंवि बोला ? ' ४३

' तरि न दुर्मरणें करि दुर्गती,'
म्हणुनियां हरिकिंकर बोलती.
'जरि हरिस्मरणें मरणें घडे,
भलतसे नरकीं न तरी पडे.' ४४

पडे, अडखळे, गळे, करपदादि भंगे, मरे,
डसे भुजग, अग्निहीकरुनि जीविता अंतरे,
मरेल जरि मारितां, तरि न त्या नरा यातना,
स्मरेल मरतांच जो विवशही जगत्पावना. ४५

विवशतेंत मुखा हरि ये तरी,
नर वदे हरिनाम सदा जरी;
म्हणुनियां, हरिनाम सदा मुखीं
जपति, गर्जति, तेचि जगीं सुखी. ४६

प्रायश्चित्तें नासती पापमात्रें,
बीजें त्यांचीं राहती तीं विचित्रें;
तींही जाती, आवडे नाम जेथें;
ऐसें मागें वर्णिलें स्पष्ट येथें. ४७

पूर्वी येथें विशद कथिलें कीर्तनाच्या प्रतापा;
आतां सेवा हरिचरणिंची जे स्तुती स्तोत्ररूपा,
तेथें, 'नामेंकरुनिच महापातकी शुद्ध होती,'
ऐसें बोलों, म्हणुनि हृदयीं चिंतिलें विष्णुदूतीं. ४८

जीं कीर्तनीं तारक विष्णुनामें,
सेवामिसें तींच विशुद्धिधामें;
आतां असें बोलति तेचि वाचे
श्लोकद्वयें किंकर माधवाचे. ४९

थोरां थोरें, लाहनां लाहनालीं,
प्रायश्चित्तें ब्राह्मणीं बोलियेलीं;
पापें त्यांनीं भस्म होती, तथापी
राहे जें का चित्त, तें पापरूपी. ५०

मळ अनादि मनांत कुवासना,
हरि तिला हरिपादउपासना;
भजनिंही हरिनामक मंत्र ते,
अजितनामक सर्वहि तंत्र तें. ५१

स्तुति, स्तोत्र, सन्मात्र सूक्तें विचित्रें,
समस्तांतरीं विष्णुनामें पवित्रें.
करीती तिंहीं पुंडरीकाक्षपूजा,
हरी श्रीहरी त्यांचिया पापबीजा. ५२

असिच धर्मसुताप्रति भारतीं
वदलि जान्हविनंदनभारती;
'पुससि तूं जरि धर्म, युधिष्ठिरा !
वदतसें, मज जो गमला बरा. ५३

हा श्लोक भीष्ममुखिचा परमार्थ जेथें,
भाषेकरूनि वदिजेल तदर्थ येथें.
स्तोत्रें स्तुती करुनि जे हरिभक्तिपूजा,
हा एक धर्म दिसतो मज, धर्मराजा ! ५४

या धर्मा सकळांत संमत मला तों धर्म हा आगळा,
नाहीं यासम धर्म आणिक नृपा ! जो धर्म यावेगळा;
जो स्तोत्रें दृढ भक्तिनें प्रतिदिनीं गोविंद हा पूजणें,'
ऐसें कृष्णसमीप भीष्ममुखिचें श्रीभारतीं बोलणें. ५५

नामप्रताप हरिचा सकळां पुराणीं
व्यासादि बोलति मुनीश्वर वेदवाणी;
याकारणें परम नामचि जेथतेथें,
जें प्रस्तुतीं वदति हे हरिदूत येथें. ५६

असें कीर्तनें आणि सेवादिरूपें
महाशुद्धि दे विष्णुनाम प्रतापें;
न जाणोनि, जाणोनि, उच्चारितांही
हरी पातकें, येथ वैषम्य नाहीं. ५७

जसजसा अतिसादर कीर्तनीं,
तसितसी हरिभक्ति फुगे मनीं;
परि पुरातन पातक तों नुरे,
भलतसें हरिनाम वदो, पुरे. ५८

वदति येथुनि पद्ययुगें रसें
अजितकीर्तन हें उपमामिसें;
गमन ते करिती मग तेथुनी,
शुक वदेल अतःपर येथुनी. ५९

'न कळत, कळतां, घे उत्तमश्लोकनामें,
सहज निजगुणें हीं नासती पापधामें;
न कळत, कळतांही, घालिती अग्नि जेथें,
करि सहजगुणें तो भस्म जाळूनि तेथें. ६०

' श्रीउत्तमश्लोक ' म्हणूनि त्याचें
श्लोकांत या वर्णिति नाम साचें.
सत्कीर्ति जे, 'श्लोक' तिला म्हणावें,
जे विष्णुनामात्मक रूपभावें. ६१

' गोपाळबाळ ' म्हणतां व्रजबाळलीळा,
नामें सुचे हृदयिं केशवकीर्तिमाळा;
' गोपांगनारमण ' नाम विलासलीला
वीहार सूचवि असें हृदयीं तयाला. ६२

वदनिं नाम ' धनंजयसारथी, '
उभय कृष्ण मनीं दिसती रथीं;
शतसहस्र असीं हरिनामकें
अजितकीर्तिसुधारसधामकें. ६३

ऐसीं जगत्पावन विष्णुनामें
वैकुंठकीर्त्यात्मक पुण्यकामें
नेणोनि जाणोनि मुखासि आलीं,
पापें तयाचीं अवघीं जळालीं. ६४

न अग्नि टाकी स्वगुणासि जेव्हां,
टाकी कसें नाम गुणासि तेव्हां ?
जाळी स्वनामेंचि अघें अपारें,
तो उत्तमश्लोक अशा प्रकारें. ६५

नामें हरीचीं हरिकीर्तिरूपें
न नाशिती हीं जरि लोकपापें;
प्रसिद्धमात्रेंचि कसें म्हणावें
तीं ‘ उत्तमश्लोक’ म्हणोनि नांवें ? ६६

विख्यात पापी बहुसाल होती,
वेदीं पुराणीं श्रवणासि येती;
तसी नव्हे कीर्ति रमापतीची,
तारी जगा ख्याति असीच तीची. ६७

‘ हरी पाप तें नाम कोण्या प्रकारें?
स्मरे सादरें त्यासि सौख्यें अपारें;
जसी नेणतां औषधी रोग नाशी,
पुढें सेवितां तेचि दे सौख्यराशी. ६८

करि अहो ! गुण कीं वनऔषधी,
न करि कां हरिनामसुधानिधी ?’
धरुनि भाव असे मित बोलिले,
मग उगे हरिकिंकर राहिले. ६९

## चरण तिसरा.

( श्लोक. )

अजितनाममहत्त्व अशापरी
कथियलें बरवें हरिकिंकरी.
उभय दूत अतःपर वर्तती,
कथिल तें शुक भूमिपतिप्रती. १

शुक म्हणे, हरिकिंकर ये रिती
परम वैष्णव धर्म तयांप्रती
करुनि निर्णय, ते यमपाशही
द्विजनिबंधक तोडियले तिहीं. २

दूतीं यमाच्या मग काय केलें ?
अजामिळाचें मग काय झालें ?
अध्यायपर्यंत मुनींद्रवाणी
बोलेल हें सर्व महापुराणीं. ३

यानंतरें कुपित ते यमदूत तेथें
गेले त्वरेंकरुनिया, यमधर्म जेथें.
वृत्तांत हा वदति संयमनीपतीला,
जो का ' जगीं त्वदनुशासनभंग झाला. ' ४

आतां द्विजें क्षणहि वैष्णवसंगतीनें
केलें, पहा, स्वहित जें वृषलीपतीनें,
सांगेल तें शुकमुनींद्र महीपतीला,
तें आयिका, ' द्विज सुमंगल केंवि झाला ?' ५

'नृपा ! विप्र निष्पाप निष्पाश झाला,
भयें सोडिलें सर्वथा त्या द्विजाला;
करी वंदनें दूत पादांबुजाला,
धरी मस्तकीं आदरें त्या रजाला. ६

विप्रास आयुष्य असोनि, देवें,
यमासही मोडुनि वासुदेवें
तो दूतहस्तें द्विज आणवीला,
स्वकिंकरांहातुनि सोडवीला. ७

स्वकिंकरांच्या वदनें तयाला,
श्रीवल्लभें हा उपदेश केला,
यानंतरें वांचतसे द्विजाती,
ऐशामधें ते हरिदूत जाती. ८

आयुष्य शेष, म्हणऊनि पुन्हां शरीरीं
विप्र प्रवेश करि सूक्ष्मशरीरधारी,
त्या देखतांचि हरिकिंकर गुप्त झाले,
अस्ताचळाप्रति दिवाकर चारि गेले. ९

त्यानंतरें वृत्ति अजामिळाची
कथा महत्संगतिच्या फळाची.
श्लोकत्रयें प्रस्तुत, 'त्या द्विजाला'
हें सांगतों कीं, 'अनुताप झाला.' १०

अनंतदूतांसि कृतांतदूतीं
निवेदिली वैदिक धर्मरीती,
अन्याय ते सर्व अजामिळाचे
निवेदिले, दंडहि त्या फळाचे. ११

कृतांतदूतांसि अनंतदूतीं
निरूपिले वैष्णव धर्म संतीं;
सद्भक्ति त्यांच्या वचनें द्विजाला,
ऐकोनि पापें, अनुताप झाला. १२

म्हणतसे, ' मम कर्म पहा, पहा !
वृषलिपासनि वार दहादहा
उपजलों उदरांत, अहा ! अहा !
पतित मी पतितांत महामहा. १३

ब्राह्मण्य म्यां बुडविलें वृषलीपतीनें,
आयुष्य हें दवडिलें अतिदुर्मतीनें.'
ऐसें स्मरोनि निज सर्व कुकर्मपापें,
दुःखी अजामिळ बहु स्वकृतानुतापें. १४

श्लोकत्रयें करुनि आणिकही स्वकर्में
तो आठवील, घडलीं जितकीं अकर्में.
जों पूर्वकर्मअनुताप मनास नाहीं,
तों सत्पथीं रुचि मना उपजे न कांहीं. १५

" जें दीपतुल्य कुळ, काजळ त्यांत झालों;
धिक्कार ह्या मजचि, जो कुपथीं रिघालों.
स्त्री धाकुटी, बहु भली, तिस टाकिलें म्यां;
जे मद्यपी, धरिलि ते वृषली अगम्या. १६

परम वृद्ध पिता-जननी बरीं,
मजविणें गति ज्यांस न दूसरी,
बहु तपोनिधि, आणि तपस्विनी,
त्यजियलीं अकृतज्ञपणें वनीं. १७

आतां मला नरक होतिल मोठमोठे,
धर्मघ्न जेथ पचती अतिदुष्ट खोटे."
ऐसा अजामिळ मनीं बहु तप्त झाला,
एथूनि वर्णितिल जें घडलें द्विजाला. १८

'नरकहरणचिंता प्राप्त होतां द्विजाला,
स्मृतिगत हरिदासप्रोक्त वृत्तांत झाला.
द्विज मग हरिनामीं आत्मकल्याण मानी,'
म्हणुनि कथिल आतां पंचपद्यें करूनी. १९

श्लोकद्वयें आठवुनी तयांला,
संवाद अन्योन्य जयांत झाला,
श्लोकत्रयें ब्राह्मण 'त्याकरूनी
कल्याण माझें,' म्हणऊनि मानी. २०

म्हणे, "हें प्रत्यक्षें नयनिं दिसलें ? स्वप्न अथवा ?
तिघे कोठें गेले, धरुनि मज जे बोढिति जिवा ?
अहा ! गेले कोठें पुरुष चवघेही ? जिहिं मला
बळें त्यांपासूनी हरुनि, नयनानंद दिधला. २१

मी तों अगण्य पतितांतहि अग्रगण्य,
प्रख्यात मद्यप, तथापिहि काय पुण्य !
कीं देखिलें नयनिं त्या विबुधोत्तमांतें,
तेणें प्रसन्न मन नाशितसे तमातें. २२

नाहीं तरी मज अमंगळ पापियाचे,
ये केंवि या मरणिं माधवनाम वाचे ?
मी दुष्ट, नष्ट, अतिपातकि, काम खोटें,
'नारायणा' म्हणुनि मंगळ नाम कोठ ? २३

ऐसें असोनिहि मुखीं हरिनाम आलें,
नेणों महासुकृत कोठुनि हें उदेलें.
मी तों स्वयें पतित, निर्लज, विप्रहंता;
'होणार काय मज,?' हे न जयासि चिंता." २४

द्विज असें शुभसूचक मानुनी,
स्वहित केवळ चिंतिल एथुनी;
कथिल तो सुमनोरथ निश्चयें
शुक मुनीश्वर पद्यचतुष्टयें. २५

द्विज, "अतःपर यत्न," म्हणे, "करूं;
पवन, इंद्रिय, चित्तहि, आवरूं.
मन बुडे न तमांत पुन्हां जसें,
करिन साधनवृंद म्हणे तसें. २६

छेदूं बंध अनादिही प्रथम, जो झाला अविद्याबळें;
जीच्या आवरणें, सुखासि सरतां, दुर्वासनेचीं कुळें.
विक्षेपें बहु कामना उपजतां, कर्में करी वेगळें,
त्यांचीं भोगिलियाविणें न चुकती जीं कर्ममूळें फळें. २७

सांख्यें आत्मअनात्मता निवडतां, शाब्दें अविद्या हरूं,
योगज्ञानहुताशनांत अवध्या वृत्तींसिही संहरूं.
तेव्हां, संचित नाशतां, उपजती कर्में अकर्मेंपणीं;
प्रारब्धासहि भोगितांच सरकं; ऐक्यें उरूं निर्गुणीं. २८

जों प्रारब्ध असेल, तोंवरि भजों सर्वात्मभावें हरी;
पाहों तो स्थिरजंगमीं बहुघटीं मातीच जैसी खरी;
जे मध्यस्थ, अमित्र, मित्र, अवघे तद्रूप पाहों स्वयें;
सर्वांचा प्रिय सोयरा निजसखा आत्मा असा निश्चियें." २९

ऐसे निश्चय गुंफितां, वृषलिचे फांसे गळां प्रीतिचे
देखे, आठवती विशेषहि रतक्रीडादिकीं जे तिचे,
'या पापेंचि कृतांतपाश पडले होते, पहा, हो! मला,'
एसें आठवितां, विरक्ति उठतां, तात्काळ झाला भला. ३०

ऐसे हे विषयांत दोष; नसतां, कां टाकिती, हो! भले?
मिष्टान्नीं विष, ये रिती विषय ते त्या ब्राह्मणा वाटले.
बोले प्रस्तुत, "आर्यकार्य करणें, कीं हे जगन्मोहिनी
माया, स्त्रीसम ईस टाकुनि, निघों निःसंग संगीं वनीं. ३१

करुनि मर्कट नाचविलें मला,
कटकटा! अतिलंपट मी तिला.
प्रियतमा अधमा मज वाटली,
वय समस्त घडी जसि लोटली. ३२

'हा देह मी,' म्हणुनि मानुनि, दुष्टकर्मे.
आयुष्य म्यां सरविलें अवघें अधर्मे.
प्रत्यक्षही जड असत्य जिता, शवाला
नाहीं प्रतीति, इतुकें न कळे जिवाला." ३३

आतां म्हणे द्विज, "अहंममता शरीरीं
टाकीन, जे चिर तृषा रविरश्मिनीरीं.
उल्लंघनें कठिण यद्यपि विष्णुमाया,
तन्नामकीर्तन उपाय असे तराया. ३४

करिन कीर्तन मी दिनयामिनी,
स्फुरति कामगृहें सुतकामिनी,
जसजसें सुख होइल कीर्तनीं,
तसतसा मग निर्लज नर्तनीं. ३५

अशा कीर्तनीं नर्तनीं चित्तशुद्धी
त्वरें होवुनी, होतसे ध्यानशुद्धी;
हरीच्या पदीं स्थैर्य चित्तास जेव्हां,
स्फुरे विष्णु आत्मा स्वतःसिद्ध तेव्हां." ३६.

उपजले सुमनोरथ जे जसे,
द्विज समस्तहि आचरला तसे.
'त्यजिल सर्वहि तो, मन नेमुनी,'
म्हणुनि एथुनियां वदतो मुनी. ३७.

क्षणैकसत्संगतिच्या फळानें
केलें तसें सर्व अजामिळानें;
उदासता ते रुचली द्विजाला,
सांडूनि दासी, हरिदास झाला. ३८

गंगाद्वारासि गेला, मनिंहुनि पहिला संग तो टाकियेला;
गातां वाचे हरीला, मनमळ हरिला, श्रीहरी मोहरीला;
ध्यानीं तन्निष्ठ झाला, हृदयिं उमजला विष्णु आत्मा द्विजाला;
ध्यातां श्रीमाधवाला, भवदव शमला, नामनादें निवाला. ३९

द्विजाची शुकाचार्य वैकुंठयात्रा
वदूं पाहतो पांडुच्या पुत्रपौत्रा;
असे मूळिचे पांच हे श्लोक आतां
करीतील टीकामुखें सौख्य गातां. ४०.

कचित् गंगातीरीं हरिगृहिं हरिद्वारनगरीं
निजा चिंता योजी द्विजवर चिदाकाशकुहरीं;
दृढ प्रत्याहारें नियमुनि मनीं इंद्रियगणा,
चिदाकारें चित्तेंकरुनि भजतो विप्र अगुणा. ४१

' चिदाकारा चित्ताहुनिहि निज आत्मा पलिकडे, '
असें योगी पाहे, तरिच मनि हे उन्मनि पडे,
चिदाकारें आहे मन, म्हणुनि राहेल तितुका,
निरोधीं त्या वृत्ती उपजतिल, हा योग इतुका. ४२

न जेथें चिच्छक्ती, सहजचि असें निर्गुणपणीं;
अखंडानंदाचा अनुभव असे ऐक्यसगुणीं.
असे देवा जीवा सहज अगुणीं ऐक्यचि; परी
असा आत्मा पाहे, तरिच कळला त्यासिच हरी. ४३

अशा अनुभवीं दिल्ही बुडि अजामिळाच्या मनें;
समाधि सरतां मनीं किमपि इच्छिलें चिंतनें;
अशांत हरिदास ते नयनिं चौघही देखिले,
द्विजें वळखिले, मनीं सतत जे सुखें रेखिले. ४४

करी जों नमस्कार चौघां जणांला,
जसे चौघ ते, पांचवा विप्र झाला.
पडे अंग पूर्वीच गंगाप्रवाहीं,
भुजा चारि देखे नव्या दिव्य देहीं. ४५

करिं गदांबुज, अंबुदसांवळा,
कटितटीं तडिदंबर मेखळा,
सतत षोडशवार्षिक, कोंवळा,
हरि करी हरिनाम अजामिळा. ४६

जलज, शंख, रथांग, गदा करीं;
कनकरत्नविमान तयावरी;
द्विज अजामिळ तो हरिकिंकरीं
मिरविला हरिपार्षदशेखरीं. ४७

असा विप्र वैकुंठलोकासि नेला;
फिरेना पुन्हा, जो असा तेथ गेला.
म्हणूनि, ' स्वयें श्रीपती स्वामी जेथें,'
ऋषी बोलतो, ' पावला विप्र तेंथें.' ४८

---

## चरण चवथा.

' जेथेंचि श्रीपति, अजामिळ तेथ नेला,'
ऐसें मुनींद्र नृपतिप्रति बोलियेला.
भावार्थ कीं, ' न चवती जन त्या विभागीं
तो पावला गति अजामिळ नामयोगीं.' १

श्री, भू, दुर्गा, भाग हे तीन जेथें,
श्रीवैकुंठीं पावती धन्य तेथें.
ज्ञानी भक्त श्रीविभागास जाती,
तैशा स्थानालागिं गेला द्विजाती. २

जयविजय गळाले, ते न त्या श्रीविभागीं,
गतभवतमशेषें विप्रशापप्रसंगीं;
गज जलचर पूर्वीं दोघ अन्योन्यशापें;
गति परमहि जे का, ते न भक्तिप्रतापें. ३

लव जरी असती हरिभक्ति, ते
उभय बंधु धनार्थ न शापिते;
म्हणुनि त्याच तमें सनकादिकां
कुवचनें वदले हरिसेवकां. ४

कृष्णार्पणें करुनियां तप, यज्ञ, तीर्थें,
पुण्यें अगण्य बहु जोडियलीं समर्थें;
नेलें म्हणूनि हरिनें स्वपदासि दीना,
श्रीभाग लभ्य न म्हणोनिहि भक्तिहीना. ५

श्रीमद्भागवतीं गजेंद्र हरिनें जो सोडवीला स्वयें,
इंद्रद्युम्न नृपाळ जो गत भवीं, तो वेगळा निश्चयें.
हे तों पद्मपुराणिचे निज सखे भाऊ धनाकारण
देती शाप परस्परें द्विजपणीं, 'हो नक्र,' 'हो वारण.' ६

गजपति धरिला तो गंडकीमाजि नक्रें;
स्तुति करि गज, तेव्हां मारिला नक्र चक्रें.
जयविजय असे ते दोघ वैकुंठवासी,
असुरपण पुराणीं विप्रशापें तयांसी. ७

द्विजवर हरिनामें शुद्ध अत्यंत झाला,
परिहरुनि अविद्या आत्मतत्त्वीं निवाला.
म्हणवुनि हरिनें तो श्रीविभागास नेला,
पुनरपि परते ना जो, असा तेथ गेला. ८

या कारणें श्रीशुक बोलियेला
कीं, 'जे स्थळीं श्रीपति, तेथ गेला;'
'दुर्गापती भूपति जेथ, तेथें
गेला न;' भावार्थ असाच एथें. ९

कोण्ही कैवल्य मोक्षाविण न गणिति, ते बोलती गौण मुक्ती;
जे का अव्यक्तमात्रीं सतत रत, जयां नावडे विष्णुभक्ती,
क्लेशें कैवल्य त्यांला; पुनरपि सगुणीं लावितां अंतरंगा,
होती सिंधूंत बिंदू हरिजन, मिळती सागरीं, जेंवि गंगा. १०

घनाच्या मुखें सिंधुचा बिंदु जैसा
मिळे सागरीं, निर्गुणीं मोक्ष तैसा.
सदा भेटते ऐक्य पावोनि गंगा
समुद्रीं, असी भक्ति हे अंतरंगा. ११

फिकी मुक्ति भक्तीपुढें ज्ञानियाला;
स्वयें मुक्ति येती, पहाती तयाला.
मुमुक्षूसही कामना मोक्षकामीं,
न भक्तास, जे देखती मुक्ति नामीं. १२

पडे देह, तों त्याचि देहीं मुकुंदा
पहाती, जगीं टाकुनी लोकधंदा,
सरे कर्म त्यांचें, पडे देह जेव्हां,
हरी ने स्ववैकुंठलोकासि तेव्हां. १३

मुमुक्षू जरी सेविती अंबुजाक्षा,
तरी मागती नित्य कैवल्यमोक्षा.
स्वभक्तां जरी मुक्ति चारी उपेक्षा,
हरी मुक्तिभक्ती तरी दे स्वपक्षा. १४

स्वभक्तांसही देवुनी दिव्य मुक्ती
हरी देतसे मुक्तिहीमाजि भक्ती.
जसें नित्यमुक्तां न देहत्व देहीं,
असे देहसारूप्य मोक्षादिकांहीं. १५

अमृत केवळ सेवुनि राहती,
परि सुधामधुरत्व न पाहती;
अमृत होवुनिही, रसनामिसें
अमृत सेविति; भाग्य पहा कसें ! १६

जननमरण मेलें, दुःख अज्ञान गेलें,
हरिमय वपु कलें, विष्णुलोकासि नेलें:
न जळति लल लोळें शेषवक्त्राग्निजाळें;
घडतिल विधिगोळे, ते न होतील काळे. १७

' विकुंठासुतें निर्मिलें पूर्णकामें
हरीनेंचि वैकुंठ वैकुंठनामें,
लयीं तें नुरे, मोक्ष हो ! नित्य कैस ? '
बरें नेणतां, बोलती एक ऐसें. १८

विकुंठेच्या पोटीं हरि मनुजरूपें अवतरे,
तसी लोकाकारें तनुकरुनि वैकुंठ पसरे;
यथाकाळें जैसे अजित-अवतार प्रगटती,
तसीं लोकाकारें सकळ हरिरूपें उमटती. १९

करी योगनिद्रा हरी शेषशायी,
लयीं नीजती मुक्त त्याचेच ठायीं;
करी सृष्टि, होवूनि जागा, मुरारी;
तयीं ऊठती मुक्तही या प्रकारीं. २०

जयीं निर्मिली सृष्टि होती न कांहीं,
विकुंठेस, हो ! तेधवां ठाव नाहीं.
तयीं दाविला लोक जो ब्रह्मयाला,
विकुंठात्मजें निर्मिलें केंवि त्याला ? २१

विकुंठेचिया जेंवि पोटासि आला,
तसा लोकही तोचि वैकुंठ झाला;
विकुंठेचिया तोचि गर्भांत पूर्वीं
कसा जन्मला ? जो सदा सर्व सर्वीं. २२

निजेही लयीं, सृष्टिकाळांत जागे,
जगीं रामकृष्णादि होवूनि वागे,
तरी तें अनादित्व तैसें न भागे,
न वैकुंठलोकासि सादित्व लागे. २३

'वैकुंठावरि काळचक्र फिरतें,' कोणी असें बोलती,
त्यांचे सर्वहि बोल फोल, बरवे हें तत्त्व ते नेणती.
नाहीं षड्गुण ईश्वरत्वहि जरी तो योगनिद्रा करी,
काळाचें तरि चक्र हें फिरतसे, माना, तयाहीवरी. २४

काळीं ईशहि सांपडे, तरि गती दे कोण ? बोला, अरे
काळग्रस्त न काळपाश चुकवी, ऐसें पहाना बरें ;
तो जेव्हां निजतो लयीं, जन निजे वैकुंठिचा तेधवां;
त्या योगांतुनि सर्व मुक्त उठती, तो ऊठतो जेधवां. २५

द्रष्टा सर्व गिळूनि जोंवरि असे, वैकुंठही तोंवरी.
योगीं निद्रित तो, तई निजति, हें कांहीं न त्याऊपरी.
द्रष्टयावांचुनि रज्जु सर्प न दिसे, द्रष्टाचि हा तो दिसे,
मायामात्रचि कंठरूप हरिचें, तेथें अविद्या नसे. २६

नव्हे सर्प, हा हार; मायाच देही;
असी शुद्धमाया रमाकांतदेहीं;
असे शुद्धमायाच वैकुंठधामीं,
तया पावला विप्र तो धन्य नामीं. २७

वैकुंठासि अशा अजामिळ असा नामप्रतापें तरी
गेला भागवती गतीस, न करा कैवल्य जीची सरी.
नामाचा महिमा अतर्क्य निगमा, तो एथ कांहीं मुनी
श्रीद्वैपायनपुत्र बोलत असें श्लोकद्वयें नेमुनी. २८

ज्याणें धर्म समस्तही बुडविले, जो निंद्य दासीपती,
जो नष्टव्रत, ज्यास नेत असतां भोगावया दुर्गती,
ऐशाही समयीं अजामिळ असा तत्काळ तो सूटला.
नामें श्रीहरिच्या, अनादि रचला तो बंधही तूटला. २९

नाहीं त्याहुनि कर्मबंधन दृढ च्छेदावया आणिखी
मोक्षापेक्षक त्यास, कीर्तन सदा तैसें हरीचें मुखीं.
नामें जें मन शुद्ध, तें रजतमा टाकी; तयांवेगळें
तें कर्मी न मिळे पुन्हा, हरिगुणीं सप्रेम जें आगळें. ३०

शुक म्हणे, भरतान्वयनंदना!
हरिल पातक कर्महि बंधना
अजितकीर्तन एकचि सर्वथा;
इतर जें तपतीर्थकथा वृथा. ३१

प्रायश्चित्त न अन्य नामसम, हें श्रोत्यां जरी बिंबलें,
गंगा काय करील? ये रिति मनीं गंगाम्बु हें तुंबलें,
एथें 'तीर्थपदानुकीर्तन' अशा एका पदें श्रीशुकें
श्लोकीं सूचितसे सभे, मुनिजना, रायासही, कौतुकें. ३२

गंगाख्य तीर्थ चरणीं उपजे जयाचे,
तो विष्णु 'तीर्थपद' बोलति विप्र वाचे,
'तीर्थांघ्रि' तो म्हणुनियां म्हणतांचि, पायीं
गंगा दिसे, अजितनाम समस्त देहीं. ३३

नामें स्फुरे तनु समग्र मनांत जेव्हां,
मंदाकिनी पदनखांत दिसेल तेव्हां,
व्यापूनि नाम असणार समस्त अंगा,
त्याची कसी सरि करी चरणांबुगंगा? ३४

पादांगुष्ठींच गंगा, त्रिभुवनपतिचें नाम हें अंगअंगा;
जें का व्यापी विहंगासननखशिख, तें दाखवी अंतरंगा.
गंगा ही पापभंगा, परि हरुं न शके वासनेच्या कुसंगा,
हस्तीही तत्तरंगा धुति, विषयदिवा इष्ट चित्ता पतंगा. ३५

गंगेंतही गज जसा धुतला, तथापी
घाली शिरीं धुळि, तसें जन चित्त पापीं.
स्नानेंकरूनि जरि पावन देह झाला,
पापीं प्रवृत्ति घडणार पुन्हा तयाला. ३६

म्हणाल, 'गंगा हरि पूर्वपापें,
शुद्धी अशा नामसुधाप्रतापें.
दोहींसही मागुति पापवृद्धी
होणार, नामीं तरि काय सिद्धी?' ३७
पूर्वींच हा निर्णय एथ झाला,
नामीं द्विधा शुद्धि असे जनाला;
उच्चारमात्रेंचि हरूनि पापा,
दावीतसे त्याउपरि प्रतापा. ३८

आजन्म गंगास्नपनेंचि केलीं,
दुष्टेंद्रियें तीं विषयीं भुकेलीं,
गंगातटींही हरिकीर्तनानें,
संहारिला संग अजामिळानें. ३९

करुनि तीर्थ, तप, व्रत, मागती
श्रवणकीर्तन केवळ सद्गती,
म्हणुनियां हरिनामसुधा जसी,
न गति जान्हवि देवुं शके तसी. ४०

हरि जसें जळ-अन्न तृषाक्षुधा,
हरि तसी जनभूकतृषा सुधा;
परि सुधा अजरामरता करी,
न इतरें, हरिनाम अशापरी. ४१

जगीं नानाकामी, धरुनि रति नामींच, तरले;
विरक्तीच्या धामीं, धरुनि मन नामींच, उरले.
सदा तीथग्रामीं तरि विषयभूमीं उतरले;
सुखेंही स्वर्गामीं विषयविषधामींच भरले. ४२

याकारणें तीर्थपदानुकीर्तनें,
दुर्वासनेपासुनियां निवर्तनें,
चित्तें असंगें हरिनामनर्तनें
होतां, न होती विषयीं प्रवर्तनें. ४३

जरि म्हणाल, ' अशा हरिकीर्तनीं
विषयसंग न कां उपजे मनीं ?'
तरि शुकोदित उत्तर अर्ध हा,
विशद अर्थ करूनि, बरा पहा. ४४

हरिगुणीं उपजे रति जेधवां,
रजतमीं न मिळे मन तेधवां;
सतत गुंफिल जो गुणरत्न, तो
न करि काचमणीप्रति यत्न तों. ४५

अमृतसिंधु तरंग उठे मुखीं,
न मन आठवि आंबिल तें सुखी;
हरिगुणीं मन घे जरि आवडो,
मग न दे विषयांत कधीं बुडी. ४६

विषय राजस, तामस इंद्रियें,
विमळसत्त्वचि मानस निश्चयें;
अमळसत्वहि तुच्छसुखस्पृहा
रजतमाकरितां धरितें पहा. ४७

असुखमिश्रित सर्वहि हीं सुखें,
सुखचि तें, हरिकीर्तन जें मुखें,
जरि मनासि असें सुख आढळे,
रजतमीं न कधीं मग तें मिळे. ४८

विषयकर्म असंग न घे मनीं,
निरत जो हरिकीर्तननर्तनीं;
म्हणुनि, तीर्थ, तपोव्रत, त्यांहुनी
अधिक हें हरिनाम, म्हणे मुनी. ४९

हरियले जनसंशय हो! शुकें,
कथियलें हरिकीर्तन कौतुकें,
प्रकरणश्रवणस्मृतिवर्णनीं
कथिल पद्ययुगें फळ एथुनी. ५०

जो हें असें नरकहारक गुह्य कर्णीं
ऐकेल, जो सदितिहासविलास वर्णी,
तोही न जाय नरका, न तयास डोळां
पाहों कदापिहि शके यमदूतमेळा. ५१

न जाय नरकाप्रती, नवल काय हें ? भूपती!
अमंगळहि पूज्य तो मनुज विष्णुलोकीं अती.
असा सदितिहास हा श्रवणवर्णन सद्गती
करी; जरि अनुष्ठवे, फळ न बोलवे तें किती! ५२

फळ इतर पुराणीं तीर्थयज्ञव्रतांचें
वदति रुचिनिमित्तें, तेथ तें लभ्य कैंचें ?
न वदति फळ तैसें, बोलणें तथ्य जेथें.
कटुक रुचिनिमित्तें बोलती तीं न एथें. ५३

'धर्मः प्रोज्झितकैतवोऽत्र' म्हणुनी श्रीव्यास ऐसेपरी
षष्ठस्कंधमुखींच श्लोक दुसरा तेथें प्रतिज्ञा करी,
ज्या धर्मीं कपटार्थ लेशहि नसे, तो ये स्थळीं बोलणें,
हा वाक्यार्थ, म्हणूनि एथ अवघें नाणें खरें तोलणें. ५४

जो लाभ या श्रवणवर्णनिं बोलियेला,
कीं, तो अमंगळ, तरी हरिलोक त्याला,
श्रद्धेकरूनि हरिभक्ति करूनि जेव्हां
ऐकेल, वर्णिल, फळप्रद होय तेव्हां. ५५

श्रोता श्रद्धायुक्त ऐकेल जेव्हां,
तो वैकुंठालागिं जाईल तेव्हां;
जो भक्तीनें यासि वर्णील वक्ता,
श्लोकीं सांगे, लोक हा त्याचि भक्ता. ५६

'श्रद्धा,' आस्तिकबुद्धिनाममहिमा जो वर्णिती, तो खरा,
ऐसा निश्चय बाणतां स्वचरणें वैकुंठ येतें घरा.
ऐसाही इतिहास हा परिसती, त्यांला नुपेक्षी हरी;
त्यांचीं आचरणें अमंगळ जरी, नासूनि तीं उद्धरी. ५७

म्हणुनि शेवट पद्यहि ये रिती
वदतसे शुक भूमिपतीप्रती;
प्रकरणश्रवणीं हरिकीर्तनीं
तरति, विस्मय हा न गमे मनीं. ५८

‘ मरों टेंकला विप्र, पुत्रोपचारें
हरीचें वदे नाम लोकप्रचारें,
असा पातकी विष्णुलोकासि गेला, ’
म्हणे, ‘ भक्ति भावें उणें काय त्याला? ’ ५९

प्रकरणश्रवणस्मृतिवर्णनें,
धरुनि भाव मनीं, हरिकीर्तनें;
नवल काय, जगीं जरि तो तरे ?
श्रवणमात्र करूनिहि उद्धरे. ६०

प्रकरणश्रवणेंहि तरे जईं,
नवल काय, अनुष्ठिल तीं तईं ?
म्हणुनि भाव असा शुक बोलिला,
तदनु ‘नामसुधें’त निरूपिला. ६१

षष्ठस्कंधमुखीं अजामिळकथा अध्याय हा दूसरा,
श्रीमद्भागवतांत नाममहिमानिर्धार जेथें खरा.
टीका ‘नामसुधा’ म्हणूनि रचिली हे वामनाच्या मुखें
श्रीकृष्णें, सुरस प्रसन्नवदनीं कानीं मनीं दे सुखें. ६२

# अध्याय तिसरा.

## चरण पहिला.

श्लोक.

अध्यायीं तिसऱ्या मुरारिचरणप्रेमें महानिश्चयें
दूतांतें यमधर्मराज वदतो नामप्रताप स्वयें.
ऐसें गुह्य कसें, अहो! प्रकटलें? श्रोत्यांस हे विस्मये
होती, यास्तव वर्णितो मुनि नृपप्रश्नास पद्यद्वयें. १

राजा पूसतसे, ' स्वसेवकजनीं हें वर्णिल्याऊपरी,
त्यांसी तो यमधर्म त्या अवसरीं बोले कसी वैखरी?
आज्ञा मोडुनि, पाश तोडुनि, बळें वैकुंठिच्या किंकरीं
पापी सोडविला, असें परिसतां बोले कसें त्यावरी? २

स्वामी हा यम, दंडभंग कवणापासूनि आम्हीं असा
नाहीं आइकिला, तुम्हीं कथियला नामप्रतापें जसा;
हे इत्यादिक लोकसंशय जगीं छेदी असा दूसरा
नाहीं यास्तव, धर्म काय वदला, तो वाद सांगा बरा.' ३

मुनिवरासि असें धरणीश्वरें
चरित हें पुसतां अतिआदरें,
अजितनाममहत्त्वसुधारसें
निववितो शुक मागुति या मिसें. ४

शुक म्हणे, ' नृपती! हरिकिंकरीं
फिरविले यमकिंकर यापरी,
सकळ सांगति सूर्यसुताप्रती,
स्वपति जो यम संयमनीपती. ५

कृतांतासही ऐकतां क्षोभ व्हावा,
धरूनी अशा बोलती दुष्ट भावा.
असें बोलतां, सप्तपद्यें विचित्र
स्वयें सांगतो राजया व्यासपुत्र. ६

शुक म्हणे, "यमदूत यमापुढें
वदति कोपकरें वचनें दढें;
म्हणति, 'शासनकार, अहो! किती
त्रिभुवनीं? वद, संयमनीपती! ७

करिति दंड उदंडहि जेधवां,
नियमभंगचि कीं मग तेधवां.
सरलिया वय आणविशी जया,
इतर येवुनि सोडविती तया. ८

करिति दंड अनेक असे जईं,
प्रभुपणें अवघेचि वृथा तईं;
सकळमंडळनाथनृपासनें
जसि परस्पर मोडिति शासनें. ९

तुजचि आजिवरी प्रभु लेखिलें,
न कधिं शासन आणिक देखिलें;
नवल आजिच हें जनिं वर्तलें,
परम दुर्धर शासन पर्तलें. १०

पतित केवळ जो वृषलीपती,
द्विज तुझ्या वचनें नरकाप्रती
धरुनि चालवितां, वरि सांवळे
पुरुष चारि चतुर्भुज पावले. ११

तिंहिं असें तव शासन मोडिलें,
पतितबंधन तें दृढ तोडिलें;
कवण ते? प्रभु! सांग बरेपरी,
श्रवणयोग्यअसें असिलें तरी. १२

आकर्षिला पतित घालुनि पाश जेव्हां,
'नारायणा!' म्हणुनि मारिलि हाक तव्हां;
चौघांचिही उडि तया समयांत आली,
'आलों, झणी भिसि;' असी ध्वनि दीर्घबोली. १३

महाराज! ते सांग हे कोण वाचे."
यमातें असें पूसती दूत त्याचे.
असें ऐकतां त्या यमें काय केलें?
शुकें हें वदायास आरंभियेलें. १४

शुक म्हणे, 'यमकिंकर ये रिती
पुसति, ऐकुनि संयमनीपती
हरिपदांबुज हें स्मरला मनीं,
मग वदे हृदयीं सुख मानुनी.' १५

यम म्हणे स्वमनीं, 'यमकिंकरां
मजविणें न दिसे प्रभु दूसरा,'
म्हणुनि जो अखिलेश रमापती,
प्रथम वर्णिल त्यास तयांप्रती. १६

"प्रभु मजविण मोठा, ज्याचिया चित्स्वरूपीं
स्थिरचर जग ऐसें अंबरें तंतुरूपीं.
स्थिति, भव, लय, तीन्ही अंशमात्रें करीतो,"
रविसुत म्हणतो कीं, "स्वामि माझा हरी तो. १७

स्वयें विष्णुरूपें करी जो स्थितीतें,
जगत्कर्तृता त्याच लक्ष्मीपतीतें.
करी सृष्टि तो ब्रह्मरूपें मुरारी,
तसा रुद्ररूपेंचि संहारकारी. १८

वृषभ, नासिकिं घालुनि वेसणी,
वश करूनि, जसा फिरवी धणी;
सकळ लोक जया वश ये रिती,
अवधियांहुनि थोर रमापती." १९

'ऐसेंच तत्त्व, तरि, टाकुनि वासुदेवा,
शास्त्रज्ञही करिति कां पर अन्यसेवा?
ऐसे कथीं,' म्हणति, 'ते परधर्म आतां.'
यांचें रहस्यहि वदेल तयां स्वदूतां. २०

लोकीं द्विपाद पशु सर्व मनुष्य झाले,
दुर्वासनामय वनांत पळों निघाले,
बांधोनि त्यांस सकळांसहि उद्धरावे,
केलें तदर्थ निजवैखरिरूप दावें. २१

तद्वैखरी निगमरूपचि थोर दावें,
जेथें अनेक गळबंधन देवनांवें;
तेथें असो भलतिया गळबंधनीं तो,
कैसा तरी निगमदामनिबद्ध होतो. २२

दाव्यांत बद्ध पशु जे, तितुक्यांस चारा
घाली धणी, म्हणुनि धांवुनि येति दारा,
येवूनियां धरितसे पशु आपलाल्या
थारा, तथापिहि न जाणति त्या धण्याला. २३

याकारणें निगम सर्वहि थोर दावें,
इंद्रादिरूप गळबंधन त्यांत नांवें,
कोण्या मिसेंकरुनि वैदिक कर्म केल्या,
स्वर्गादि सद्गति, न दुर्गति त्यास मेल्या. २४

यज्ञादि सर्वहि फळें हरि तोचि देतो,
इंद्रादि मुख्य म्हणऊनि यजी जरी तो;
हे अस्मदादिक असीं निगमांत नांवें,
मूढा जनासि गळबंधन हेंच दावें. २५

आम्हांसि आहुति समर्पिति आणि पूजा,
आम्ही शिरीं धरुनि पाववुं देवराजा;
दाव्यांत बद्धपशुवत् गळबंधनेंही
आम्ही उपास्य, परि बद्ध जसेचि देही. २६

आम्हांस सर्व अधिकारहि वासुदेवें
हे दीधले विविध नेमुनि देवदेवें,
हीं शासनें शिरिं धरूनि भितों तयाला,
आम्हां स्वतंत्रपण केंवि घडेल ? बोला." २७

यमास "सर्वोत्तमतात" याचे
जे बोलिले दूत सकोप वाचे,
यमें दिलें उत्तर हें तयांतें
स्मरोनि सर्वेश्वर विष्णु चित्तें. २८

## चरण दुसरा.

श्लोक.

समस्तांहुनी थोर गोविंद, ऐसें
कळे जे रिती, बोलिला धर्म तैसें,
' तयाचेच ते चौघही दूत, ' आतां
असें धर्म बोलों पहातो स्वदूतां. १

' तिहीं मोडिलें तूझिया संयमाला, '
असें बोलिले दूत जे का यमाला,
वदाया तया गोष्टिच्या उत्तरातें,
पुन्हा वर्णितो धर्म सर्वेश्वरातें. २

सगुणनिर्गुण एक रमापती,
म्हणुनि वर्णितसे यम त्यांप्रती,
सगुण इच्छित तें न कळे कसें,
कथिल पद्ययुगें पहिलें तसें. ३

" मी धर्मराज, सुरराज, दिशाधिराजे,
ब्रह्मादिदेव, ऋषि, आणिक थोर जे जे,
नेणों तदिच्छित, न जाणति तत्ववेत्ते;
ऐशास जाणति कसे जन आणिके ते ? " ४

' सगुणचेष्टित हें न कधीं कळे
अगुण तों कवणासहि नाकळे, '
म्हणुनियां यम संयमनीपती
सकळ निर्गुण वर्णिल त्यांप्रती. ५

" प्राणेंद्रियादि सकळांसहि जो कळेना
वाचेस आणिक मनासिहि आकळेना,
शुद्धें मनें अनुभवाप्रति ये तथापी,
तेव्हां पतंग मन होय चिदात्मदीपीं. ६

ऐसा अतर्क्य हरि, त्या प्रभु माधवाचे
ते दूत होतिल, " म्हणे यमधर्म वाचे.
श्लोकद्वयेंकरुनि हेंच वदेल आतां,
टीकामुखेंकरुनि होइल सौख्य संतां. ७

" तुम्हि मनोहर जे नर देखिले,
निजसुखात्मरसें वरि रेखिले,
मज गमे बहुतेक रमापती-
जवळि ते असणार महामती. ८

हरिगुण हरिरूपें दूत ते माधवाचे,
हरिमय जग दृष्टीं पाहती, नाम वाचे;
सुरवर शिरिं त्यांच्या वंदिती पायधूळी,
त्रिभुवनिं हरिभक्तां रक्षिती सर्व काळीं. ९

जगिं अदृश्यपणें जन लक्षिती
भगवदीक्षणमात्र अपेक्षिती
हरिजनासि कधीं न उपेक्षिती,
मजहिपासुनि ये रिति रक्षिती. १०

' नारायणा ! ' म्हणुनियां म्हणतांचि वाचे,
ते छेदिले तिहिंच तें दृढ पाश त्याचे;
कानीं मुखांत नरकांतक नांव जेथें,
कैचें उरे नरकदुर्गतिदुःख तेथें ? " ११

वाटे तयां, ‘धर्म समस्त जाणों,
नामप्रतापास किमर्थ नेणों?’
येथें पहा येविषयीं स्वदूतां
श्लोकत्रयें वर्णिल काय आतां. १२

“श्रीमद्भागवतांत भक्त हरिचे सप्रेम वाखाणिती
जे साक्षाद्भगवन्मुखें प्रगटले, कोण्ही तयां नेणती;
ते श्रीभागवताख्य धर्म कळती कैसे तुम्हांला, अरे?
जे बाराजण मात्र जाणत असों, ऐका तयांतें बरें. १३

ब्रह्मा, शंभु, कुमार, नारद, शुक, प्रऱ्हाद, किंवा बळी,
कीं वैदेहि, मनु स्वयंभुसुत जो, कीं कौरवांचे कुळीं
जो गंगासुत भीष्म, आणि कपिल प्रख्यात, कीं मी स्वयें,
जाणों वैष्णवधर्म, जो कळलिया प्राणी तरे निश्चयें. १४

हा श्रीभागवताख्य धर्म इतुक्यां बाराजणां ठावुका,
‘कां तो गुप्त असा?’ म्हणाल, तरि तें सांगेन मी, आइका.
जो का गुह्य निजात्मबोध गुरुच्या भक्तीविणें नाकळे,
तो हा वैष्णवधर्म विष्णुकरुणेवांचूनि कैसा कळे? १५

विज्ञान जें अतिरहस्य विशुद्ध वेदीं,
तेथेंचि भागवतधर्म, न भक्ति भेदीं;
ज्याकारणें प्रिय कलत्रसुतादि वित्तें
तेंव्हांचि भक्ति, जरि तो उमजेल चित्तें. १६

म्हणविती बहु वैष्णव आपणा,
परि न जाणति भक्तिचिया खुणा;
हरिअसें दुसरें जरि नावडे,
तरिच ते हरिभक्ति तयां घडे. १७

प्रिय हरी सकळांहुनि जाणती
परि जयास्तव ते प्रिय नेणती,
भजति कीं सुख दे हरि आपणा,
प्रिय तयीं निजजीव, हरी उणा. १८

निजसुखार्थ धनादि जसीं प्रियें,
प्रिय हरि स्वसुखार्थचि निश्चयें;
धनसुताहुनि आवडि आपुली,
तसि हरीहुनि भक्ति नव्हे भली. १९

भजति मुक्तिनिमित्त हरी जरी,
निजनिमित्त, तदर्थ नव्हे, तरी;
भजति मानधनार्थ नृपा जसें,
हरिस मुक्तिनिमित्तक हे तसे. २०

जरि न मुक्तिनिमित्तहि सेविती,
तरि किमर्थ उपास्य रमापती?
जग्निं वृथाचि न मंदहि वर्तती,
वदति शास्त्रविशारद ये रिती. २१

प्रयोजनावांचुनि मूर्ख तेही
प्रवर्तती न त्रिजगांत देही;
शास्त्रज्ञ होवोनि वृथा हरीला
कां सेवितां? हें समजोनि बोला. २२

म्हणाल आतां, 'गुण गोड भारी,
याकारणें आवडतो मुरारी,'
सुधा बहू गोड सुरेंद्रलोकीं,
ऐकोनि तीतें न भजाचि कां कीं? २३

'स्वभक्ता न जाणे सुधा, आणि कांहीं
कृपाळू हरीसारखी होत नाहीं.'
असें बोलती ते, तयांला पुसावें,
'कृपा घेवुनी काय, सांगा, करावें?' २४

कोण्या प्रकारें निजदुःख नाशी,
नासूनि दुःखा करि सौख्यराशी,
या कारणें तो प्रिय देव जेव्हां,
स्वप्रीति देवाहूनि थोर तेव्हां. २५

निजसुखार्थ हरि प्रिय जेधवां,
अधिक आपुलि आवडि तेधवां,
हरिहुनी प्रिय आणिकही, असी
निगमसंमत भक्ति घडे कसी? २६

मैत्रेयीप्रति याज्ञवल्क्य निगमीं विस्तार हा बोलिला
कीं, 'ज्यालागिं समस्तही प्रिय असा आत्माच हा आपला;
जो का आवडतो निमित्त नसतां, तो जाणसी जेधवां,
कांहींही तुज जाणणेंचि न उरे, सर्वज्ञ तूं तेधवां.' २७

जेंजें लौकिक सौख्य, वैदिकहि जें, ज्या आपणाकारणें
वाटे आवडतें, तसा प्रियतम स्वात्माचि जो आपणे;
ज्याची आवडि निर्निमित्त, हरिही ज्याकारणें आवडे,
तोचि श्रीहरिसा कळे, तरिच हे सद्भक्ति ठायीं पडे. २८

आत्मा सर्वजडप्रकाशक असें लोकीं बहू जाणती,
जाणोनि श्रुतकीर्तनादि सगुणप्रेमा मनीं नेणती;
कोण्ही ते सगुणींच निष्ठ, परि हा आत्मा प्रिय श्रीहरी,
ऐसें भक्तिरहस्य नेणति, न हें सद्भक्ति दोहीपरी. २९

म्हणतसे श्रुति कीं, 'पशुतुल्य तो
इतर मानुनियां हरि सेवितो,'
म्हणुनि आत्मपणें हरि सेवणें,
परमवैष्णव तो तरि बोलणें. ३०

श्रुत्यर्थ तो स्पष्टचि दीसताहे,
न भेद हा वैष्णवधर्म साहे;
ऐक्येंचि जें का भजणें हरीचें,
तेथेंचि हें भागवतत्व साचें. ३१

गुरुमुखें कळली स्वचिदात्मता,
तदुपरांतिक जो गुरु देवता,
उभयभक्ति निजात्मपणें करी,
सकळ होय कृपा गुरुची तरी. ३२

ऐसेंचि बोले श्रुति 'यस्य देवे,'
म्हणूनियां अर्थ इचे पहावे.
धरूनि येथें स्फुट या श्रुतीतें
यथामति व्याकरिजेल तीतें. ३३

श्रुत्यर्थ कीं, 'तत्त्वमसीति वाक्यें
देवीं जसी भक्ति निजात्मऐक्यें;
जैसीच देवीं गुरुभक्ति जेव्हां
तैसी करी, सिद्धि तयासि तेव्हां.' ३४

आत्मानात्मविवेकमात्र गुरुच्या जेव्हां कृपेनें कळे;
जीवेशैक्य, उपाधितें निरसिता, शिष्यास तें आकळे;
देवीं आत्मगत प्रियत्व उमजे, तैसें गुरूचे स्थळीं;
ऐसी भक्ति करील, चित्तलहरी तेव्हां मुरे चिज्जळीं. ३५

चित्ताची लहरी चिदंबुधिजळीं त्याची मुरे जेधवां,
चैतन्यांश जडांत, तंतु वसनीं, देखे असें, तेधवां
ज्ञानाचा परिपाक होय, परि हें, सर्वात्मभावीं जयीं
भक्ति श्रीगुरुदेवपादकमळीं याची ठसावे, तयीं. ३६

सहज आवडि जे निजिच्या निजीं,
तितुकि भक्ति मुकुंदपदांबुजीं;
श्रवणकीर्तन आवडिनें असा
न करि, वैष्णव तोंवरि तो कसा? ३७

'गुरुमुखें कळल्यावरि आत्मता,
सगुणभक्ति निरर्थक तत्त्वतां,'
म्हणति, वैष्णव तेहि न सर्वथा,
वदति अद्वयशास्त्रकथा वृथा. ३८

श्रवणकीर्तनभक्ति न जोंवरी,
मन न तों सगुणीं स्थिरता धरी;
निज चिदात्मकता कळली जरी,
न हरिभक्तिविणें स्थिरता तरी. ३९

म्हणुनियां म्हणते श्रुति कीं, 'जयीं,
गुरुरमापतिभक्ति घडे, तयीं
गुरुवरें कथिले निगमार्थ ते
अनुभवीं करितातिं कृतार्थते.' ४०

सहज आत्मपणें हरि आवडे,
सगुणभक्ति तयावरि हे घडे,
अनुभव स्थिर होय तया नरा,
तरिच केवळ वैष्णव तो खरा. ४१

म्हणुनि वैष्णव दुर्लभ या जगीं;
इतर वैष्णवता मिरवे उगी;
म्हणुनि धर्महि 'वैष्णवधर्म हा
अकळतत्त्व' तयासि वदे, पहा. ४२

बाराजणासि हरिभक्तिरहस्य ठावें,
ब्रह्मादि ते कथियेले यमधर्मदेवें.
'ते थोर, सिद्ध इतरां अधिकार तेथें
नाहीं,' म्हणाल तरि धर्म वदेल येथें. ४३

"मनुष्यलोकांत मनुष्यलोकीं
मनुष्यमात्रासहि धर्म हा कीं,
श्रीवासुदेवीं निजभक्तियोगें
आत्मत्वभावें भजणें असंगें." ४४

हा भक्तियोग घडणार कसा मनुष्यां ?
बोलेल तो यम उपाय तयां स्वशिष्यां.
श्लोकांत या चरणि शेवटिल्याच पाहा,
भक्तीस साधन उपाय वदेल जो हा. ४५

हरिगुणश्रवणें हरि आवडे,
भजन त्यावरि आवडिनें घडे;
परि न पातकि या श्रवणीं रती;
परमसाधन नाम असे रिती. ४६

कोण्या मिसें ये हरिनाम वाचे,
जळोनि जाती अतिदोष त्याचे.
घे चित्त जेव्हां श्रवणादि गोडी,
गोडी हरिची मग त्या न सोडी. ४७

श्रोते हो ! यमधर्म वाक्य वदला हें सूक्ष्म दृष्टीं पहा,
कीं,' नामग्रहणादिकींकरुनियां सद्भक्तिचा योग हा;
तेंही कीर्तन हें नव्हे, ग्रहण हें जें का मुखीं उच्चरे,
श्रीमन्नाम तसें करी ग्रहण तें, पापाब्धि जेणें तरे. ४८

कोण्या मिसेंही हरिनाम वाचे
येईल भाग्येंचिकरूनि याचे;
श्रद्धा तयाऊपरि कीर्तनाची,
ते तों कृपा श्रीमधुसूदनाची. ४९

येथें निदर्शन अजामिळ पुत्रनावें
'नारायणा !' म्हणुनिही म्हणतां स्वभावें,
झालाचि मुक्त, म्हणऊनि यम स्वदूतां
श्लोकद्वयेंकरुनि हेंच वदेल आतां. ५०

उच्चारमात्रेंचि अजामिळाला
प्रसन्न नामें जगदीश झाला,
हा एक पद्यें महिमा स्वदूतां
बोलेल आधीं यमधर्म आतां. ५१

" मुखीं नाम तन्नामकाच्याच भावें
असें कीर्तन श्रीपतीचें म्हणावें,
म्हणे नाम, जाणे न तन्नामकाला,
न जाणोनि तो नामउच्चार झाला. ५२

नामोच्चारणमात्र विप्र करितां कैसा, पहा, सूटला;
जो दुर्भेद्य कृतांतपाश तुमचा तोही कसा तूटला ? "
नामोच्चारमहत्त्वधर्म वदतां, प्रेमा मनीं दाटला;
दूतांला यम 'पुत्र हो !' म्हणतसे, स्नेहाब्धि तो लोटला .५३

'पहा नवल, पुत्र हो ! ' यम म्हणे स्वदूतां कसें,
'न जाणतहि ये मुखा सहज नाम, तेंही असें;
अजामिळहि सूटला इतुकियाचमात्रें त्वरें,
म्हणूनि हरिभक्तिचीं प्रथम साधनें हीं, अरे ! ५४

सहज नामहि नाशक पातका,
स्मरणकीर्तनरूप तया सिका;
परम भक्ति रमापतिकीर्तनें,
प्रथम यास्तव नामचि साधनें.' ५५

बोलेल ऐसें यमधर्म आतां
नामप्रतापासि तयां स्वदूतां,
तीं आयका हो ! वचनें विचित्रें
पीयूषरूपें निजकर्णपात्रें. ५६

म्हणे यम तयांप्रती, 'अघ हरावया कारणें
समर्थ हरिकीर्तनें म्हणुनि काय हें बोलणें ?
उगेंचि म्हणतां मुखें निजसुतासि नारायणा,
पहा, परम मुक्ति ही कसि अजामिळा ब्राह्मणा. ५७

जळति अग्निकणेंचि तृणें जरी,
तरि तयां प्रबळानळ कां परी ?
भलतसें हरिनाम अघें हरी,
श्रवणकीर्तन कां तरि त्यावरी ? ५८

चित्तीं नाम म्हणे; स्मरे स्वहृदयीं, तें नाम ज्याचें, तया;
ऐसा तो जप आणि ध्यान करणें, तें नाम जाणोनियां;
तें संकीर्तन आणि नाम म्हणणें, नेणोनि तन्नामका,
तो उच्चार अजामिळासि फळला कैसा ! पहा कौतुका.' ५९

'नारायणा!' म्हणुनि केवळ आत्मजाला
आक्रोशतां, द्विज अजामिळ मुक्त झाला.
त्यालागिं कीं यम म्हणे, अघमात्र नाशी
संकीर्तनें जिहिंकरूनि सुखांबुराशी. ६०

अजर अमर होती ज्या सुधेच्याच पानें,
प्रथम सहज नाशे क्षुत्तृषादैन्य त्यानें,
क्षुधित तृषित मानी लाभ तों तोचि भारी,
अघहर फळ नामीं वर्णिती या प्रकारीं. ६१

नामद्रुमीं फळ चतुर्विध मुक्ति जेथें,
तें पापताप हरणें तरि पुष्प तेथें,
जें वीरसैन्य भुवनत्रयराज्य साधी,
मार्गीं तृणें रगडिती चरणेंचि आधीं. ६२

## चरण तिसरा.

### श्लोक.

आत्मा हरि प्रिय असें समजोनि, वाचे
गाती गुण, श्रवणिं आइकती तयाचे,
ते भक्त दुर्लभ; तरी अधिकार तेथें
सर्वां, म्हणूनि वदला यमधर्म येथें. १

सर्वांस भक्तिअधिकार जया प्रकारें,
तोही उपाय वदला यम या विचारें;
कीं साधन प्रथम माधवनाम घेणें,
नाशूनि पाप, भजनीं रुचि होय तेणें. २

त्याहीमधें, न कळतांचि, जरी स्वभावें
येती मुखा, हरिति पातक विष्णुनांवें;
याकारणें स्मरणकीर्तनरूप नामें
तीं मुक्तिहूनि अधिकें सुखपूर्णकामें. ३

म्हणुनि निर्णय वर्णियला यमें,
वदति जो, मुनिहो! निगमागमें,
परि न जाणति कर्मठ धर्म हा,
म्हणतसे यमधर्मचि तें पहा. ४

म्हणाल, 'नामीं जरि मुक्ति होते,
कां कर्ममात्रीं रत शास्त्रवेत्ते?'
'ते मोहिले वैदिक काम्यकर्मे,'
बोलेल ऐसीं यमधर्म वर्मे. ५

यम म्हणे, 'निगमागम जाणती,
जन तयांसि महाजन बोलती,
परि तयांसि रहस्य न ठाउकें,
करिति कर्म मखादिक कौतुकें. ६

विरळ त्यांत रहस्य विचारुनी
तरति हे हरिच्या गुणकीर्तनीं.
परि, अहो! बहुतेक न जाणती,
मृगजळांत बुडोनिहि राहती. ७

यज्ञादिकीं करुनि होइल चित्तशुद्धी,
ज्ञानेंकरूनि तदनंतर मोक्षसिद्धी;
याकारणें निगम बोलति यज्ञदीक्षा;
हे स्वर्गमात्रगमनीं धरिती अपेक्षा. ८

स्वर्गादिकाम करिती विविधां मखांसी;
ते तों न पावति निजात्ममहासुखासी.
कोशिंबिरी करुनि भक्षिति पुष्पमात्रें,
त्याला फळें मग न त्यां तरुचीं विचित्रें. ९

यज्ञादि वृक्ष, फळ मोक्ष तयांसि येती,
स्वर्गादिरूप सुमनें, जन तींच घेती;
सर्वज्ञ जे, करिति त्या सुमनीं उपेक्षा;
होवूनि तींच सुमनें फळ, देति मोक्षा. १०

फुलें भक्षितो, तो फळें केंवि लाधे ?
मनीं स्वर्ग, कैसा तया मोक्ष साधे ?
मनीं कामना ते, न तों चित्तशुद्धी,
अशुद्धां तयां केंवि कैवल्यसिद्धी? ११

स्वहित केवळ ते न अपेक्षिती,
तरिच ते हरिभक्ति उपेक्षिती.
त्यजुनियां, अमरांअमरावती-
प्रतिहि जावुनि, दुःखचि भोगिती. १२

जसा भाडियाचा तटू, स्वर्ग तैसा;
तयाचा, अहो ! मानिती लाभ कैसा ?
सरे पुण्य, लोटूनियां देति जेव्हां,
रडे फुंदफुंदों, पडे मूढ तेव्हां. १३

धरूनी भुजीं कंठ देवांगनांचे,
विमानीं वनीं नंदनीं तेथ नाचे;
भुजें त्याच त्यांचे गळे ते धरूनी
रडे, त्यांस टाकूनि जातो म्हणूनी. १४

पुण्यास पाप म्हणती अतएव योगी,
आद्यंत पापफळ, यद्यपि पुण्य भोगी,
लोखंडरूप जसि पातककर्म बेडी,
बेडी सुवर्णमय हे, तरि काय गोडी? १५

स्वर्गादि पुण्यफळ इच्छुनि, दीर्घकामी
झाले महाजन पराङ्मुख विष्णुधामीं;
लोकांस गोड उपदेशहि हाचि वाटे,
अंधासवें फिरति अंध जसे कुवाटे. १६

स्वर्गादि मात्र वदती फळ वेद जेव्हां,
आद्यंतवंत फलदायक मात्र तेव्हां;
राज्यादि लाभकर लौकिक यत्न जैसे,
स्वर्गादि लाभपर वैदिक यज्ञ तैसे. १७

वेदीं चातुर्मास्ययाजी, तयाचें
आहे कीं जें पुण्य अक्षय्य साचें;
नेणोनीयां अर्थ ते त्या श्रुतीचा
वाखाणीती भाव जैसा मतीचा. १८

म्हणति अमर देवां नश्वरांलागिं जैसें,
ऋतुफळ वदती हे वेद अक्षय्य तैसें;
अमरहि मरणातें पावती दीर्घकाळें,
क्षय बहुदिवसान्तें अक्षयें कर्ममूळें. १९

"वदति 'शाश्वत मुक्तिफळें' श्रुती,
तरि तदर्थ किमर्थ न ये रिती?"
म्हणुनि येथ असें जरि बोलती,
तरि वदों प्रतिउत्तर त्यांप्रती. २०

न्हति शाश्वत मुक्तिफळें तरी,
श्रुतिपुराण असें असतें जरी.
न्हति शाश्वत कर्ममयें फळें
म्हणुनि बोलतसो श्रुतिच्या बळें. २१

"नाना कर्म करूनियां क्षितितळीं राज्यादि संपादिती,
तैसा स्वर्गहि यज्ञपुण्यविविधा कर्मींच कीं पावती;
जैशा या इहलोकराज्यपदव्या कर्मार्जिता नासती,
तैसीं तीं परलोकदैविक पदें." बोले असें हें श्रुती. २२

" आतां चातुर्मास्ययज्ञादिपुण्यें
अक्षय्यें तीं केंवि ? बोला. " अगण्यें;
तेव्हां ऐसा अर्थ अक्षय्यशब्दें,
कीं तीं पुण्यें राहती फार अब्दें. २३

म्हणूनि देवां अमरत्व जैसें,
नित्यत्व या कर्मफळासि तैसें;
कोण्ही श्रुति ज्ञानफळासि तैसा
न बोलती नाश, तयांत ऐसा. २४
याकारणें मुक्तिसि नाश नाहीं,
न नित्यता कर्मफळासि कांहीं;
सांडूनियां मोक्ष, अशा फळाला
बोलेल कां वेद जनांस ? बोला. २५

" स्वर्गकाम सुतकाम जनाला
यज्ञ कां वदतसे श्रुति ? बोला. "
पूर्वपक्ष करिताति असाही,
वेदतत्त्व तरि ठाउक नाहीं. २६

नयनिं दावुनि लड्डुकशर्करा,
जननि दे कडु औषध लेंकरा;
न फळ साखर औषधिंचें जसें,
श्रुति वदे फळ काम्य जगीं असें. २७

करुत वैदिक कर्म जसेंतसें,
म्हणुनि वेद फळें वदती असें,
तदपिही न विरक्त जनाप्रती;
फळ अपेक्षिति त्यासचि मागती. २८

"स्वर्गाचीही कामना ज्या नराला,
ज्योतिष्टोमा तो यजू कीं सुराला."
ऐसा अर्थ स्पष्ट पाहा श्रुतींत
'ज्योतिष्टोमं स्वर्गकामो यजेत.' २९

श्रवणकीर्तनही वदती श्रुती,
परि न तुच्छ फल श्रुति बोलती,
म्हणति, 'वैष्णवधर्म धरा, अरे!
त्रिभुवनेश्वरकर्म पहा बरें.' ३०

ऋग्वेदिंची 'त्रीणि पदा' म्हणूनी
हे गर्जताहे श्रुति विश्वकानीं;
कीं, 'विष्णुचे धर्म धरूनि राहा,
ऐकोनि तत्कर्म मनांत पाहा.' ३१

गोशब्दें जड बुद्धि इंद्रिय, तयां जे पाळिती गोप ते,
'हे गोपाळ!' म्हणूनि हे श्रुति तया संबोधुनी बोलते.
कीं हें आक्रमिलें पदेंकरुनियां त्रैलोक्य, याकारणें
त्याचे धर्म धरूनि, कर्महि पहा, कर्णासि जें पारणें. ३२

'कर्माणि पश्यत' म्हणे श्रुति, 'विष्णुकर्में
पाहा मनीं श्रवणकीर्तनरूपधर्में;'
संध्या जशी श्रुति वदे,विधि येथही हा,
'कर्माणि पश्यति' म्हणे हरिकर्म पाहा. ३३

स्वर्गादिकाम नर ते, "कमळापतीची
सेवा करूनि असि उक्ति कधीं श्रुतीची ?
येथें उग्याच म्हणती 'हरिकर्म पाहा,
त्या विष्णुचे परम धर्म धरूनि राहा.' ३४

ऐसा विवेक न कळोनि, मुकुंदनामीं
श्रद्धा न ते धरिति वैदिक लोककामी;
स्वर्गासि जातिल कदाचित ते, तथापी
जाती अधोगतिस होवुनि तेचि पापी. ३५

नहुष इंद्रपदाप्रति जावुनी,
त्रिभुवनेश्वर इंद्रहि होउनी,
भुजग होउनि तो पडला जसा,
वरकडांसहि शेवट तो असा. ३६

स्वर्गासि जावुनिहि मागुति जन्म पावे,
दुर्वासनेकरुनि पापपथींच धांवे,
तेव्हां तयावरि कृतांत करी चपेटा,
हा काम्य वेदपथ याकरितांच खोटा. ३७

यालागिं केवळ फळात्मक वेदवाचा,
जैसी लता फुलति; हाचि विचार तीचा;
पुष्पें उपेक्षिति, तयां फळ लाभ देती,
दूतांसि येथ वदला यम येचि रिती. ३८

पढतमूढ धरूनि अशा श्रुती,
फुलचि तें फळ मानुनि मोहती;
म्हणुनि नेणति वैष्णवधर्मते,
करिति तुच्छ फळात्मक कर्म ते. ३९

या अध्यायीं श्लोक जो बाविसावा
व्यासें केला साधकांचा विसावा,
तेथें दूतां धर्म जें बोलियेला,
या तीं श्लोकीं अर्थ तो सिद्ध केला. ४०

'तन्नामस्मरणें तदद्वयपणें त्याची कळे आवडी,
तन्नामें सुटला अजामिळ तुम्हां, हे साक्षि तों रोकडी;
ऐसे धर्म न कर्मठांस कळती,' एवं स्वदूताप्रती
धर्मैं सांगितली, पुढें वदतसे सद्वैष्णवांची रिती. ४१

' ऐसें बरें दृढ विचारुनि दीर्घबुद्धी,
टाकूनियां सकळ वैदिक काम्यसिद्धी,
सर्वात्मभाव धरिती मग ते अनंतीं,
नामेंचि भक्ति असि साधिलि सर्व संतीं.' ४२

'माझें नसे' यम म्हणे, 'भय एक त्याला,
कीं विष्णुभक्तिनिधि सांपडला जयाला.'
स्वर्गास जावुनिहि कर्मठ जन्म घेती,
पापें असे नरक मागुति त्यांस होती. ४३

ऐसा मनीं धरुनि भाव कृतांत, आतां
श्लोकोत्तरार्ध वदतो यम त्या स्वदूतां,
कीं, 'दंडयोग्य नव्हती हरिदास, माझें
त्यांचे शिरीं कधिं पडेल न दंडओझें. ४४

पाप्यास दंड करणें मदधीन; येथें
नामानळें सकळ पातकभस्म, तेथें
त्याला प्रवृत्तिच कधीं न घडेल पापीं;
तेंही नुरे, जरि घडेल कधीं, तथापी.' ४५

" वैकुंठदूतां यमधर्मदूतां
परस्परें ये रिति वाद होतां,
अजामिळाला उपदेश व्हावा,
दुःसंग त्यानें अवघा त्यजावा." ४६

संकल्प ऐसा हरिनेंचि केला,
याकारणें वाद तयांसि झाला.
जीवंत ते यास्तव दूत गेले,
श्रीविष्णुशस्त्रेंकरिं ते न मेले. ४७

जरि असें हरिच्या नसतें मनीं,
परतते यमदूत न तेथुनी;
वदति नाम, तयां हरिआयुधें
सतत रक्षिति, होवुनि सावधें. ४८

म्हणूनियां, 'श्रीहरिभक्ति जेथें,
झणीं तुम्ही नेणत जाल तेथें;'
येणें रितीनें यमधर्म आतां
हितोपदेशें वदतो स्वदूतां. ४९

"जे साधु विष्णुमय पाहति सर्व सृष्टी,
ज्यांच्या सदा वदति देव पवित्र गोष्टी,
ते वासुदेवशरणागत भक्त जेथें,
त्यांच्या झणीं जवळि जाल कदापि तेथें." ५०

यम म्हणे, 'यमकिंकर हो ! सदा
हरिजनासि रमापतिची गदा
करि सुरक्षण, काय तयां भयें?
न करवे मज दंड तयां स्वयें. ५१

हरिजनास पहाल तुम्ही जरी,
करिल मृत्यु गदा हरिची तरी;
विहित दंडधरा इतरा नरीं,'
म्हणुनियां यम वर्णिल यावरी. ५२

## चरण चवथा.

( श्लोक )

दूतांला वदला कृतांत, 'हरिचीं नामें जयांच्या मुखीं
त्यांला दंड न मी, न थोर अथवा कोणी करी आणखी.'
जातां धर्म तयांसि सांगत असे कीं, 'जे तयांवेगळे,
ते आणा नरकाप्रती तुम्हि, अरे ! बांधोनि त्यांचे गळे.' १

'आजन्म जो विमुख विष्णुपदारविंदीं,
सेवी न कीर्तिमकरंद कधीं न वंदी,
ऐसे जगीं बहुत ते नरकार्ह जाणा,'
दूतां म्हणे यम, 'तयां नरकास आणा.' २

'जे का विरक्त हरिभक्त, तदंघ्रिधूळी
ज्याच्या घरीं न पडल्या असती त्रिकाळीं,
ऐशा गृहीं नरकमार्गमयीच तृष्णा,'
दूतां म्हणे यम, 'तयां नरकासि आणा.' ३

जिव्हा कधीं न भगवद्गुणनाम वर्णी,
चित्तीं न तत्पदकथा, न कदापि कर्णी,
नाहीं कदापि नमिला जिहिं देवराणा,'
दूतां म्हणे यम, 'तया नरकासि आणा.' ४

श्रवणकीर्तनमाधववंदनें
जळति पूर्विल पापहि काननें,
विधिकरांप्रति यास्तव ये रिती
वदतसे यम संयमनीपती. ५

श्रोते येथें वदति, "जळती सर्वही पूर्वपापें,
जाणो, नेणो, परि अघहरें विष्णुनामें प्रतापें;
पूर्वी शुद्धी द्विविध कथिल्या, त्यांत अत्यंत शुद्धी
नाहीं जों, तों न घडति कशा मागुती पापवृद्धी ? ६

वंदी, सेवी, 'हरि हरि' म्हणे जीव तो एकदाही,
त्याला कैसा यम म्हणतसे यातनादुःख नाहीं ?
पापीं धांवे जरि मन पुन्हां, यातनेयोग्य झाला,"
ऐसे जे का वदति, वदतो ग्रंथकर्ता तयाला. ७

धाडील दूतां यमधर्म जेव्हां,
आणावया जातिल दूत तेव्हां;
या मृत्युकाळीं जरि नाम वाचे
ये, यातनालोक तयांस कैंचे ? ८

'आणूं नका' म्हणतसे यम याचि भावें,
जें आणणें मरणकाळचि तो स्वभावें;
जेव्हां घडे स्मरण वंदन मात्र कांहीं,
तो यातनाई सहसा जन होत नाहीं. ९

'ज्याचें घरीं न हरिभक्तपदाब्जधूळी
तृष्णा जयास सदनांत असे त्रिकाळीं,
आणा तयास,' म्हणतो यम, कीं जयाला
संतप्रसाद हरिभक्ति घडे न, त्याला. १०

येथें न यास्तवहि आणिक शास्त्रनीती
मिथ्या फळश्रुति मुनींद्रमुखासिं येती,
शास्त्रांत या सकळ निष्कपटार्थ जेथें,
मिथ्या फळश्रुति कशा वदतील एथें? ११

ऐसें अजामिळमुखीं हरिनाम अंतीं
येतां, त्वरेंकरुनि सोडविलाच संतीं;
प्राणप्रयाणसमयीं हरिदास्य कांहीं
होतांचि, शुद्धि; मग दंड तयासि नाहीं. १२

याहीवरी यम म्हणे निजकिंकरांला
कीं, ' नेणतां ह्मणि पहाल अशा नरांला,
ते तों बळेंच सुटतील; परंतु तेथें
मी सापराध, तुमचा अपराध जेथें.' १३

धरूनी असा भाव पोटीं अनंता
स्मरोनी मनीं प्रार्थितो धर्म आतां,
' मुखीं नाम जो घे तयाला स्वदूतीं
कसें बांधलें?' हाचि संताप चित्तीं. १४

हृदयिं आठवुनी पुरुषोत्तमा,
यम म्हणे, ' अपराध करीं क्षमा.
द्विजमुखीं तव नाम, तयावरी
उचलिले कर या मम किंकरीं. १५

महदतिक्रम हा रचिला, हरी !
न कळतां तव किंकरकिंकरीं;
विनवितों कर जोडुनि, ईश्वरा !
करिं दया, करुणामृतसागरा !' १६

अत्यंत शुद्धि हरिकीर्तनभक्तिभावें,
हें तों खरें, परि न जाणतही स्वभावें;
नारायणस्मरणकीर्तन मात्र कांहीं
ज्याला घडेल, मग पातक त्यास नाहीं. १७

प्राणप्रयाणसमयीं यमदूत जेव्हां
येती, वडे किमपिही हरिदास्य तेव्हां;
आजन्म पातक जळे, मग त्या पवित्रा
होतील दुर्गति कशा त्रिविधा विचित्रा ? १८

याकारणें प्रकरणार्थ समस्त आतां
श्रीव्यासपुत्र वदतो सुखकारि संतां;
ज्या वर्णिल्या विविध शुद्धिहि विष्णुदूतीं,
नामप्रताप शुक वर्णिल तोचि अंतीं. १९

बोले श्रीशुक कीं, ' नृपा ! धरि मनीं या पूर्विल्या कौतुका,
तस्मात् कारण विष्णुकीर्तन असें निर्दाळितें पातका.
पापें जीं बहु थोरथोर, नरकप्राप्तीच ज्यांचीं फळें,
प्रायश्चित्त तयांसही परम हें नामें जगन्मंगळें. २०

पापास तों भलतशा हरिनाम जाळी;
त्याचेंच कीर्तन घडे जरि सर्व काळीं,
पापीं प्रवृत्तिच नव्हे अतिशुद्ध चित्ता;
श्लोकद्वयेंकरुनि वर्णिल हेंचि आतां. २१

नामोच्चारणमात्र ज्यांस घडलें, ते पावले सद्गती;
सामर्थ्यें हरिचीं अशीं घडिघडी जे वर्णिती ऐकती,
त्याला जे उपजेल भक्ति हरिची अत्यंत, ते शुद्धता;
तैसी तीर्थतपोव्रतें न करिती, हें जाण तूं, सुव्रता! २२

अजितभक्ति मनीं उपजे जया,
मग अपेक्षित काय, नृपा! तया?'
अजितकीर्तनशुद्धि असी बरी
म्हणुनियां शुक वर्णिल यावरी. २३

'कृष्णाची पदपद्मचित्सुखसुधा सप्रेम जे चाखती,
ते मिथ्या मृगनीरमायिकगुणीं कां, हो! पुन्हां माखती?
प्रायश्चित्त तदन्यही अघ ह्रीं, शुद्धी तरी त्या जशा
कीं हस्ती धुतला तथापिहि धुळी तीरीं शिरीं घ जशा.' २४

शुकमुखें इतिहास नृपें असा,
हृदयिं, आइकत, बसला ठसा;
परम विज्वर यामुनिउत्तरें
नृपति होउनि, मानियलें खरें. २५

'नरकनाशक' नाम नरेश्वरें
शुकमुखें हरिचें अतिआदरें
परिसतां, अतिविस्मित मानसीं
मन बुडे हरिनामसुधारसीं. २६

बहु सुखी, बहु विस्मित, भूपती
नयनिं देखुनियां, मुनि त्याप्रती,
वदतसे, 'तुज विस्मय, यापरी
नवल मानियलें यमकिंकरीं.' २७

बोले श्रीशुक कीं, ' नृपा ! स्वपतिची ऐकोनि हे वैखरी,
दूतीं विस्मित होवुनी धरियली आज्ञा शिरीं हे खरी;
आतां ते तइंपासुनी हरिजना दृष्टीं पहातां भिती;
जेथें श्रीहरिकीर्तनें, चुकवुनी तो ठाव, ते भोंवती.' २८

अगस्तिनें हेचि कथा शुकाला
सांगीतली, जे शुक बोलियेला;
तथापि हें व्यासमुखें पुराणीं
भविष्य बोले मुनिवर्यवाणी. २९

' स्वपुत्र सांगेल पुढें स्वशिष्या '
नृपा असें वर्णियले भविष्या,
तें बोलतां श्रीशुकही नृपाला
कीं, 'हे अगस्ती मज बोलियेला.' ३०

शुक म्हणे 'फिरतं क्षितिमंडळीं
सदितिहास असा मलयाचळीं
मज वदे, असतांहरिपूजनीं
अतिदयाळु अगस्ति महामुनी.' ३१

तृतीय अध्याय विचित्र येथें,
संपूर्ण झाला इतिहास जेथें,
समर्पिला श्रीहरिपादपद्मीं
पद्मालयेच्या आदिव्यसद्मीं. ३२

ऐसा ' नामसुधा ' म्हणोनि रचिला श्रीवल्लभ ग्रंथ हा,
सर्वात्मा हरि वामनाननमिसें जें बोलिला, तें पहा.
' जे हा वर्णिति, आयकोनि धरिती भावार्थ, त्या सज्जना
होती भागवती गती कलियुगीं, नामें जसी वामना.' ३३

# टीपा.

## नामसुधा.

**विषयसंदर्भ.**—श्रीमद्भागवत महापुराणाच्या सहाव्या स्कंधांतील पहिल्या तीन अध्यायांवर प्रस्तुत प्रकरणांत विस्तृत टीका केलेली आहे. या अध्यायत्रयींत हरिनामाची थोरवी हा विषय आहे; व हरिनामसंकीर्तनानें मोक्षप्राप्ति घडते, या सिद्धान्ताचें उदाहरण म्हणून अजामिळाची कथा सांगण्यांत आली आहे.

परम गतीचा लाभ करून देणाऱ्या परमेश्वरनामाचा यांत महिमा वर्णिला असल्यामुळें वामन पंडितांनीं प्रस्तुत प्रकरणास 'हरिनामसुधा' अगर 'नामसुधा' असें नांव दिलें आहे. (पुढें १।१।८ व ५१ आणि १।२।१, २।४।६२, ४।४।३३, पहा.) याचे तीन अध्याय असून प्रत्येक अध्यायाचे चार चार चरण केले आहेत.

श्रीमद्भागवत हें महापुराणांपैकीं एक असून, तें भक्तिप्रधान आहे. हें प्रथमतः व्यास महर्षींनीं आपला मुलगा श्रीशुकाचार्य यांस सांगितलें व नंतर तें शुकाचार्यांनीं पांडवांचा नातू परिक्षित् राजा यास कथन करून लोकप्रसिद्ध केलें. हा भक्तिमार्गांतील भागवत अगर वैष्णव पंथाचा अग्रगण्य ग्रंथ मानलेला आहे.

पुराणग्रंथाचीं पांच लक्षणें सांगितलेलीं आहेत. तीं अशीं: 'सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशो मन्वंतराणिच। वंश्यानुचरितं चेति पुराणं पंचलक्षणम्॥' सर्ग=वासना-गुण-महाभूतादि विश्वसृष्टीच्या कारणांची उत्पत्ति. प्रतिसर्ग=जडदेहात्मक सृष्टीची उत्पत्ति. वंश=इतिहासप्रसिद्ध ब्रह्मक्षत्रांचे वंश. मन्वन्तरें=चवदा मनु. वंश्यानुचरित=प्रसिद्ध ब्रह्मक्षत्र वंशांत झालेल्या व्यक्तींचीं चरित्रें.

## अध्याय १, चरण १.

**सारांश.**–हा चरण प्रस्तावनारूपाचा आहे. श्रुतिस्मृतिपुराणादिकांचें मंथन करून जें मोक्षप्रद सार हातीं लागलें, तेंच हरिनामामृत होय. अज्ञान बालकाच्या हातून सहज पडलेला विस्तव जसा अंगणांतील कडब्याच्या उडवीचें भस्म करितो, तसें, जाणून अगर नेणून, कोणत्याही निमित्तानें दुराचारी मनुष्याला हरिनामोच्चार घडला, तर त्याच्या पूर्व पापाचें क्षालन होऊन तो शुद्ध होतो. परमेश्वराच्या प्रसिद्ध नामांमध्यें हें पापक्षालनाचें सामर्थ्य स्वाभाविकच आहे. परंतु अंगणांतील कडबा जरी मुलाच्या हातून सहज जळला, तरी घरांतील कणगीमधले जोंधळे त्यानें जळत नाहींत व त्यामुळें नवीन पीक येण्याचा संभव कायमच राहतो; त्याप्रमाणेंच ज्ञानहीन नामोच्चारानें जरी पूर्व पाप जळून खाक झालें, तरी चित्तशुद्धि होत नाहीं. तें पूर्वीप्रमाणेंच वासनांनीं लडबडलेलें असतें व त्यामुळें पुनरपि पापाचरण घडतें. ज्ञानयुक्त हरिनामसंकीर्तन घडल्यास मात्र हें पापबीजच समूळ नष्ट होतें व दुराचारी मनुष्यही परम गतीस पात्र होतो. हरिनामसंकीर्तन ज्ञानयुक्त घडलें म्हणजे चित्ताची शुद्धि होऊन त्याची पापाकडे प्रवृत्तिच होत नाहीं. प्रभूच्या गुणकर्मस्वरूपांत निमग्न होऊन तो तत्स्वरूप बनतो, व तुकारामबोवांप्रमाणें ' बीज भाजुनि केली लाही । आम्हां जन्ममरण नाहीं ॥ ' असें म्हणण्याची त्यास योग्यता येते.

———

१. पूर्वार्ध.–ज्याप्रमाणें यथेष्ट मधुपान करून गुंजारव करीत भृंगें कमलामध्यें स्थिरावतात, त्याप्रमाणें इंद्रियदमन करणारे भक्तश्रेष्ठ ज्ञानानें ओतप्रोत भरून प्रभूचें नाम गुणगुणत प्रभुचरणीं रममाण होतात.

२. धातुमूर्तीला हरिनाम दिलें कीं ती हरिमूर्तिच बनते; तसेंच सर्व व्यापक अशा हरीच्या नामानें हें विश्वही संतांना हरिमय दिसूं लागतें. मोक्षप्राप्तीचा प्रयत्न करणाऱ्या साधकांना संसाराचें फार भय वाटतें. परंतु हरिनामसंकीर्तनानें मनाचें समाधान व शुद्धि होऊन, त्या भयाचें निरसन

होतें. **रसाळें**-मधुर, गोड. कवितेमध्यें विशेषणांनाही विशेष्यां-प्रमाणें विभक्तीचे प्रत्यय लाविलेले वारंवार आढळतात, व हें त्याप्रकारचें उदाहरण आहे. रसाळ नाम ( ए० व० ); रसाळें नामें ( अ० व० ).

३. भक्तांना हरिनामांनींच परमेश्वराचीं गुणकर्मचरित्रें कळून ईशस्वरूपाचें ज्ञान होतें आणि लौकिक मोहविषयांना झटकून बाहेर पडलेल्या विरा-ग्यांना हींच हरिनामें आत्मसुखाचे ठेवे वाटतात. **जीतमुक्त**, जीवंतपणीं -देहपात न होतांच-ज्यांनीं सत्यज्ञानानें जन्ममरणरूपी संसारांतून आपली सुटका करून घेतली आहे असे, जीवन्मुक्त. **सनक**, ब्रह्मदेवाचे सनक, सनत्कुमार, सनत्सुजात, व सनंदन, असे चार मानसपुत्र होते. हे सर्वच ब्रह्मनिष्ठ, पूर्णज्ञानी, व जीवन्मुक्त होते. **शुकसनकमुख**, शुकसनक वगैरे.

४. **निगम**, वेद. **वर्णवर्णीं**, अक्षरांगणीक, प्रत्येक अक्षरांत. **चरण** २, आश्रमवर्णांच्या धर्मानुसार आचरण न घडल्यामुळें जे पातकी बनले आहेत असेही प्रभुनामस्मरणानें पापमुक्त होऊन धन्यता पावतात व भवसागर तरून जातात. **आश्रम**, ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ्य, व संन्यास, हें आश्रमचतुष्टय. **वर्ण**, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, व शूद्र, हें चातुर्वर्ण्य. प्रत्येक आश्रमाचे व वर्णाचे शास्त्रांत विशिष्ट धर्म सांगितले आहेत. या धर्मांचें योग्य पालन न झाल्यानें मनुष्य पतित होतात, परंतु सर्वकर्म ईश्वरार्पण केल्यानें व ईश्वरनामसंकीर्तनांत मन निमग्न झाल्यानें, सर्व पापांची निष्कृति होते. **हरिपदीं** इत्यादि.-सोन्यावर उमटलेल्या राजमुद्रेनें जसें त्याचें वजन व मोल हीं सहज कळतात, तसेंच हरिनामाच्या योगानें हरिचरणाचें स्वरूप व महत्त्व हीं प्रत्ययाला येतात. **हरिनामी** (विशेषण), हरिनामाची. **सुवर्णी**, सोन्याची.

६ **मानसहंस**, हिमालयाच्या अत्युच्च प्रदेशांतील मानससरोवरांत जाऊन तेथें विहार करणारे हंस. **जया**, ज्या. **शलभ**, टोळ. **अजित**, सदायशस्वी असा परमेश्वर.

७ वेद, स्मृति, पुराणें, हीं ज्ञानाचा क्षीरसमुद्रच आहेत; त्यांचें घुसळण करून हा अमृतस्वरूपी-परमगति देणारा व दीनजनांचा सखा असा ग्रंथ

वामनाच्या मुखानें श्रीहरि स्वतःच प्रकट करील. कारण श्रीहरिच सर्वात्मत्वानें वामनांत वास करीत आहे, आणि तोच सर्व कृतींला चालना देत असतो. ह्या ग्रंथाचें श्रवण पठण केलें असतां, तो सर्वांचें चित्त शुद्ध करून व हरिभजनीं लावून, त्यांस जन्ममरणापासून मुक्त करील.

८ **अमृताभिधानी**, ज्याला (वरील श्लोकांत) अमृत हें नांव दिलें आहे. **परादि वाचा**, वाणीचे चार प्रकार आहेत. परा वाणी, ही केवळ वासनात्मक सूक्ष्म स्वरूप असते. सर्व शब्दोच्चाराचें हेंच मूलबीज होय. पश्यंती वाणी, हें अंतःस्थ शब्दरूप होय. हा शब्द ज्याचा त्यास ऐकूं येईल, परंतु त्याचा बाहेर स्फोट होत नाहीं. मध्यमा वाणी, हिचा आवाज ऐकूं येतो, परंतु त्यांत स्पष्टत्व नसल्यामुळें शब्दबोध व अर्थबोध होऊं शकत नाहीं. वैखरी वाणी, ही स्पष्ट वाणी होय. आपले सर्व विचार याच वाणीनें एकमेकांस कळूं शकतात.

९ त्रिगुणांचें संशोधन झाल्यामुळें शुद्धसत्त्वस्वरूप असें ज्या मोक्षाचें वर्णन वेद करितात, तोच मोक्ष प्रभूच्या सगुणावतारांचीं नामें उच्चारलीं असतां हस्तगत होतो; कारण, कोणत्याही निमित्तानें हरिनामांचा उच्चार ज्याला घडतो, त्याच्यावर परमेश्वराची करुण दृष्टि वळून दयामृताचा वर्षाव करिते.

१० **नारायणाख्य** इत्यादि, नारायण नांवाचा मनुष्य, ही हाक आपल्यालाच मारिली आहे अशा भावनेनें, त्याच्याकडे वळून पाहतो. **नारायणाक्षिविषय होती**, ईश्वराच्या डोळ्यांचा विषय होतात, भगवंताची कृपादृष्टि त्यांच्यावर होते.

११ ईश्वर हा सर्वसाक्षी असल्यामुळें, मूळांतच सर्वांस पाहत असतो. तशांत जे त्याच्या नांवाचा उच्चार करितात, त्यांना तो दयापूर्ण नजरेनें पाहातो,आणि प्रभूची अशी कृपादृष्टि क्षणमात्रही ज्याच्यावर पडते तो धन्यच होतो. कारण प्रभूची कृपामृताची वृष्टि अशी कांहीं अजब आहे, कीं तिच्या एका थेंबानेंच जीवात्मा तळ्याप्रमाणें भरपूर भरून जातो.

१२ परमेश्वराची दृष्टि जशी सर्वसाक्षी असून प्रत्येकास त्याच्या त्याच्या कर्माप्रमाणें गोड अगर कडू फळें भोगरूपानें देते, तशी त्याची कृपामृतवृष्टिही सर्वांवर सारखीच होते. परंतु ज्या ठिकाणीं जीव पातकांत गुरफटले

असतात, त्या ठिकाणीं त्या पातकाच्या छत्रीमुळें प्रभुकृपामृतानें जीव भिजत नाहींत. फक्त पापछत्र भिजून नष्ट होतें. परंतु चित्त शुद्ध न झाल्यामुळें पापबीज कायमच राहतें. **त्या छत्रें**, त्या पापाच्या छत्रामुळें.

१४ **दुरिततृणगृह**, पापरूपी गवताची झोपडी. ( पुढें १।३।१६ पहा. )

१५ उत्तरार्ध.–मूर्तींतील सोन्याप्रमाणें सर्व सृष्टमात्रांत आत्मसत्तेनें राहणारा परमेश्वर आपलें नामस्मरण करणाऱ्याला विश्वव्यापी स्वरूपानें प्रकट होऊन त्याला अत्यंत सुखपूर्ण करितो.

१६ स्थावरजंगमात्मक सर्व सृष्टि भगवत्स्वरूप असल्यामुळें खापर, धोंडा, वगैरे नांवेंही परमेश्वराचींच आहेत. परंतु तीं मायिक-अज्ञानपूर्ण–आहेत व ईश्वराचें सत्यस्वरूप न दाखवितां नाशवन्त पदार्थांची कल्पना आपल्या अंतःकरणांत उत्पन्न करून मायाजाळांत गुंतवून दुःख देणारीं आहेत. म्हणून भगवंताचीं अवतारकृत्यें व सत्यस्वरूप यांचा ठसा उमटविणारीं जीं पुराणप्रसिद्ध, पवित्र, नामें आहेत, तींच पापशमन करण्यास स्वभावतःच समर्थ असतात.

१७ महाभारताच्या अनुशासनपर्वांत शरशय्येवर पडलेल्या भीष्मांनीं आपल्या भावाचा नातू धर्मराज याला श्रीकृष्णासमक्ष भक्तियोगाचें महत्त्व सांगून विष्णूचें प्रसिद्ध 'सहस्रनाम' कथन केलें, हा प्रसंग येथें अनुसंधेय आहे. ( भारत, अनुशासन, अध्याय १४९. ) **शिराणी**, आवड.

१८ मूळ श्लोक.–यानि नामानि गौणानि विख्यातानि महात्मनः। ऋषिभिः परिगीतानि तानि वक्ष्यामि भूपते ॥ गौणानि, **गुणकर्मरूपें**, भगवंताचे गुण व चरित्र वर्णन करणारीं. **महिमाप्रतापें**, ( पापदाह करणाऱ्या ) महिम्याच्या प्रचंड तेजानें.

२० **नामधेयें**, नांवें. **मुनींद्रगेयें**, मुनिश्रेष्ठांनीं गाण्याजोगीं. **गहनार्थ**, खोल अर्थ.

२१ **अशेषात्मभावें**, सर्व वस्तुमात्रांत आत्मरूपानें विलसत असल्यामुळें.

२४ पुराणप्रसिद्ध नामें सोडून, दुसऱ्या कोणत्याही शब्दांनीं प्रभूचें नांव कल्पून त्याचा जप केला, तर त्या नांवावर जप करणाऱ्याची जशी श्रद्धा असेल त्याप्रमाणें त्याला फळ मिळेल, परंतु भगवंताच्या विख्यात नामांची

गोष्ट अगदीं निराळी आहे. हीं नामें न कळतां व श्रद्धा नसतांही मुखाला आलीं, तरीसुद्धां तीं तारक होतात. त्यांचा स्वाभाविक प्रतापच असा आहे.

२५ हें सर्व स्थावरजंगम–अचेतन व सचेतन–वस्तुमात्र परमेश्वर स्वतः आपणच आहे. सोनें ही सत्य वस्तु आहे, व तिच्यावर भासमान होणाऱ्या आकृतिविशेषानें तिच्यापासून अलंकाररूप कार्य उद्भवतें, त्याप्रमाणेंच परमेश्वर या मूलभूत सद्वस्तूपासून विश्वरूप कार्याची उत्पत्ति झाली आहे. म्हणून परमेश्वराचें नाम उच्चारलें म्हणजे तो कोणत्याही ठिकाणीं प्रकट होतोच.

२६ **निर्विकारी**, स्वतः कोणत्याही रीतीनें विकार न पावणारा.

२७ सोन्याची मागणी केली, आणि अलंकार हातीं आला, तर हें सोनें नव्हे असें कसें म्हणतां येईल ?

२८ जो अलंकाराची मागणी करितो, त्याला जव्हेरी नुसतें सोनें कधींही देणार नाहीं. त्याप्रमाणेंच जो घटपटादि लौकिक शब्द उच्चारील, त्याला घटपटादि पदार्थच लाभणार, परंतु सर्व विश्वास निर्विकार स्वरूपानें व्यापून राहणारा परमेश्वर लाभणें दुरापास्त आहे. **चक्रपाणी**, विष्णुस्वरूपी परमेश्वर.

२९. अलंकार हा सोन्याचा स्वभाव नाहीं, कारण तो सोन्यावर होणारा केवळ एक आभास आहे. मिथ्या–आभासमय–अलंकारांत अधिष्ठानरूपानें ( म्ह० मूल वस्तुरूपानें) सोनें आहे, तरी पण सोन्याच्या ठिकाणीं अलंकार ( सत्यरूपानें ) नसतोच. सोन्याच्या आकृतिविशेषानें अलंकार होतो, परंतु सोन्याला अमुक एक स्वाभाविक आकृति आहे असें म्हणतां येत नाहीं.

३० उत्तरार्ध.–विष्णुनामांत सगळ्यांचाच अंतर्भाव होतो, परंतु त्याच्या योगानें विष्णुस्वरूपाला मात्र कोणताही विकार होऊं शकत नाहीं.

३३ **अजितनाम**, भगवंताचें नाम. **कृतार्थ**, धन्य, सफल. **अमोघ–सुधारसें**, अचूक गुणकारी अमृतरसानें ( दयार्द्रपणानें ).

३५ **श्रीविष्णुधर्मीं**, भक्तिप्रधान भागवतधर्मांत.

३७ **अनिच्छेकरूनी**, इच्छा नसतांही, अजाणपणें.

३८--३९ जीवात्मा व परमात्मा हे भिन्नभिन्न नाहींत; जीवात्मा हा परमात्म्याचाच अंश आहे; म्हणून जेव्हां 'मी' या रूपानें जीवास स्वाभाविक स्मृति होते, तेव्हां तो परमात्म्याचीच आठवण करितो. मग मनुष्याच्या वाणीला परमात्म्याच्या नामाचा उच्चार घडला, तर त्यानें परमात्म्याची आठवण केली असेंच होतें.

४२ **तूळ, कार्पास**, कापूस.

४३ **वळे**, वळी, वलय, वर्तुलाकार राशी, उडवी.

४४ **विषयभोगसुखात्मक कामना**, ऐहिक पदार्थांचा उपभोग व त्यापासून भासमान होणारीं सुखें यांची इच्छा.

४५ **कुत्सित**, दुष्ट, पापकृत्याकडे प्रवृत्ति करणारी. **हरिनामहुताशना**, भगवन्नामरूप अग्नीला.

४६ पाठभेदः—**हरिनामकवित्व. कवित्व**, काव्य, गाणें.

४९ **अभिज्ञ**, पूर्णज्ञाता, रसायनशास्त्रवेत्ता.

५० **प्रवृत्तिविषयीं**, सांसारिक विषयांत, लौकिक व्यवहारांत.

५१ **व्यासें**.-वर **विषयसंदर्भ** पहा. **विष्णुदूत निर्णय वदति**, विष्णूच्या दूतांनीं नामसंकीर्तनाचें महत्त्व सिद्ध करून सर्व शंकांचें निरसन केलें आहे.

५२ **विषयसंदर्भ** पहा.

५३ **सर्वात्मतेकरुनि**, मुकुंद हा सर्वां घटीं अविकृत आत्मस्वरूपानें भरलेला आहे हें स्मरून.

---

## अध्याय १, चरण २.

**सारांशः**-नानातऱ्हेच्या पापांना नाना तऱ्हेचीं प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत. या प्रायश्चित्तांनीं घडलेल्या पापांची निष्कृति होते; परंतु अंतःकरणाची शुद्धता करून पापप्रवृत्तिच नाहींशी करण्याचें त्यांस सामर्थ्य नाहीं. असें सामर्थ्य एका ज्ञानयुक्त हरिनामसंकीर्तनांतच आहे. भागवत धर्मा-

प्रमाणें सर्व कर्मे ईश्वरार्पण करून, व भगवन्महिमा स्मरून त्याचें नामसंकीर्तन करणें हीच खरी आत्मविद्या आणि हेंच खरें सर्वांत मोठें प्रायश्चित्त. हाही चरण उपोद्घातस्वरूपाचाच आहे.

---

१ **संक्षेप-टीका**, मूळांत थोडक्यांत सांगितलेल्या गहनतत्त्वांचा विस्तार करून त्यांस स्पष्ट करणारी टीका.

**छायात्मविश्रांतिची**, प्रतिबिंबरूप जीवात्म्यास शांति व समाधान देणारी. संसारभ्रांतीनें वैतागलेल्या जीवास हा ग्रंथ म्हणजे केवळ शांतीचेंच ठिकाण आहे.

**छाया**, प्रतिबिंब. परमात्मा हें बिंब, व जीवात्मा हें त्याचें प्रतिबिंब.

**श्रवणोदरांत**, कर्णपुटांत, कानांत. **उदर**, आंतील भाग. उत्तरार्ध.—मूळांत विषयप्रतिपादन फारच थोड्या व गहन शब्दांत शुकाचार्यांनीं केलें आहे; व तें खोल विचार न करणाऱ्या ( **अलस** ) श्रोत्यांना संक्षिप्तपणामुळें त्रासदायक होतें. म्हणून भगवान् श्रीहरि ( मला-वामनाला—निमित्त करून )स्वतःच ही पापतापहरण करणारी ‘ नामसुधा ’ नांवाची विस्तृत टीका त्या विषयावर करीत आहे.

२ पांचव्या स्कंधांत श्रीशुकांनीं ‘ भुवनकोषवर्णन, ’ ‘ निरयवर्णन, ’ इत्यादि विषय परिक्षित् राजास निवेदन केलेले आहेत. **जगदघहर प्रश्न**, ज्या प्रश्नाच्या उत्तरानें जगाच्या पापाचा नाश करण्याचा मार्ग कळणार आहे, असा प्रश्न.

४ यथेष्ट खाणेंपिणें झाल्यावर जसा एकादा मनुष्य ढेंकर देऊन आपण तृप्त झालों असें दाखवितो, त्याप्रमाणेंच परिक्षित् राजानें पंचम स्कंधांत भगवत्कथा यथेष्ट ऐकून सहाव्या स्कंधाच्या आरंभीं त्यांचा जंत्रीरूपानें पुनरुच्चार करून आपलें समाधान व्यक्त केलें. **उद्गार**, ढेंकर. **अनुवाद**, पुनरुच्चार. **परिहार**, निरसन, चुकविणें, टाळणें.

५ **दुर्गति**, नरकांतील यातना.

६ **दुर्गतिनिर्गति**, पापपरिहार, पातकांचें निरसन. **गजशौच,** हत्तीचें स्नान, हत्तीच्या स्नानासारखी निरर्थक व निष्फळ कृति. हत्तीचें स्नान निष्फळ कसें होतें, हें पुढील श्लोकांत स्पष्ट केलें आहे.

७ **मालिन्य**, मळीणपणा, घाणेरडेपणा. **वहिलें**, लागलेंच, तावडतोब. **शुंडाग्रें** इत्यादि, सोंडेच्या टोकानें धूळ घेऊन ती सर्वांगावर फेंकतो व तिनें अंग लडबडून टाकितो. **क्षोभलें**, नाना प्रकारच्या वासनांनीं भडकलें.

८ **कृपामृतघना**, अत्यंत दयाशील शुकाचार्य हो! **पापाच्या इ०,** पापरूपी अग्नीला चेतविणाऱ्या वासनारूपी वायुलहरींचें निवारण करितें व विषयेच्छा नाहींशी करितें. **जों पापीं** इ०, जोंपर्यंत पापाची घटना जुळवून आणणाऱ्या अंतःकरणप्रवृत्तीची मांडणी कायम आहे, तोंपर्यंत नरकयातना या कायमच आहेत. **दुर्वार**, टाळण्यास कठीण, अनिवार.

९ **रहस्य**, गुप्त, मार्मिक तत्त्व.

१० **अज्ञा जनाला,** ज्यांना आत्मज्ञान झालें नाहीं अशांनाही हीं प्रायश्चित्तें घेतां येतात. त्यामुळें तीं केवळ दिखाऊच ठरतात व त्यांनीं पापप्रवृत्ति नष्ट करण्याचें कार्य साधत नसतें.

११ **पापमूला अविद्या**, पापाचरणाचें मूळ कारण असें अज्ञान. उत्तरार्ध.-ब्रह्मज्ञानाचा लाभ होऊन तें पूर्णपणें ठसलें म्हणजे अनेक जन्मांत संपादित केलेल्या सर्व पापपुण्याचा नाश होतो. असा मनुष्य सर्व कर्में निष्कामबुद्धीनें आचरून तीं भगवंतासच समर्पण करितो, व त्यामुळें पापपुण्याचा लेप त्याला लागत नाहीं व तो जीवन्मुक्ताच्या स्थितीला पोंचतो. "मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा। निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः॥" गीता, ३।३०. "यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात् कुरुतेऽर्जुन। ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात् कुरुते तथा॥" गीता, ४।३७.

१२ **निजबोधसिद्धी,** आत्मज्ञानप्राप्ती. **भगवदर्पण कर्मयोग,** परमेश्वराला आपलीं सर्व कर्में अर्पण करून निष्काम बुद्धीनें कार्य करीत राहणें. "तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर। असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः॥" गीता, ३।१९. "मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु।

मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः ॥" गीता, ९।३४. "चेतसा सर्व-कर्माणि मयि संन्यस्य मत्परः। बुद्धियोगमपाश्रित्य मच्चित्तः सततं भव ॥" गीता, १८।५७.

१३ **क्षपणें**, नष्ट करणें. **दुर्वासना**, पापाचरणाची जननी दुष्ट वासना.

१४ **केवळ भक्ति**, ईश्वराला सर्वस्वीं स्वतःचें समर्पण करून केलेली भक्ति. **कैवल्य**, केवल परामात्ममय झाल्याची स्थिति, मुक्तस्थिति, जीवात्म्याचें परमात्म्याशीं समरसत्व. **केव्हां तरी**, कधींही. उत्तरार्ध.--दारूचा घडा तीर्थांनीं शुद्ध होत नाहीं; त्या कामीं लाविलेलें तीर्थ निष्फळ होतें: त्याप्रमाणेंच ज्याला ही कर्मयोगभक्ति लाभली नाहीं, त्यानें केलेलीं प्रायश्चित्तादि सर्व कर्में केवळ फुकट होत, कारण चित्तशुद्धी करण्याचा मुख्य हेतु त्यांनीं सिद्धीस जात नाहीं.

१५ **हरिभक्तीस उडवी**, कर्मयोगयुक्त भक्तीला टाळा देतो. **पावनकळा**, पवित्रपणा, शुद्धि. **सुरामृद्भांड**, दारूचें मडकें.

१६ **हरिदास्यधर्म**, ज्ञानयुक्त भक्तीचा भागवत धर्म. **विरक्ती**, वैराग्य, निष्कामपणा व निर्ममत्व.

१७ **थोडक्यामाजि**, थोडक्यांत, अगदीं सहज. **व्यासवाणी**, व्यासाची उक्ति. व्यासानें मूळचें सांगितलेलें भागवत पुराण जसेंचें तसेंच शुकानें परिक्षितास निवेदन केलें आहे. **गीर्वाणवाणी**, संस्कृत भाषा. मूळचा संस्कृत श्लोक सर्व भक्तांनीं तोंडपाठ करून निरंतर स्मरणांत वागवावा, अशी पंडितांची सूचना आहे. मूळ श्लोकः—सकृन् मनः कृष्णपदारविन्दयोर्निवेशितं तद्गुणसंगि यैरिह। न ते यमं पाशभृतश्च तद्भटान् स्वप्नेऽपि पश्यन्ति हि चीर्णनिष्कृताः ॥ भागवत, ६।१।१९. याच श्लोकाचा अर्थ पुढील १८ व्या वामनी श्लोकांत आहे.

१९ **हरिनामसुधागुणें** इ०—हरिनामाच्या मोक्षप्रद गुणाशीं तुलना करून पाहिली असतां, इतर सर्व परमगतिप्राप्तीचीं साधनें केवळ फिकीं, कमकसच वाटतात.

२० **वैखरी**, स्पष्ट वाणी, मागें १।१।८ टीप पहा. **उरी**, उणीव, वाण.

## अध्याय १, चरण ३.

**सारांशः**—अजामिळ हा एका कनोजी अग्निहोत्री ब्राह्मणाचा मुलगा होता. याला एका शूद्रस्त्रीचा मोह पडला, व त्यानें स्वस्त्रीचा व स्वकुटुंबीयांचा त्याग करून त्या शूद्रीची संगति धरिली. तिला त्याच्यापासून दहा मुलगे झाले. त्या सर्वांत धाकटा नारायण. हा पालवीचें फळ या न्यायानें बापाचा फार आवडता झाला. अजामिळाला या मुलाचें इतकें वेड लागलें, कीं कोणत्या ना कोणत्या तरी निमित्तानें त्याचें नांव—नारायण—त्याच्या मूखांतून निरंतर येऊं लागलें. एकदा अजामिळ मरणोन्मुख स्थितींत होता व अंतकाळीं त्याच्या तोंडून पुत्रस्नेहानें नारायण हें नांव आलें. इतक्यांत यमदूत येऊन त्यांनीं त्याच्या लिंगदेहास जड देहांतून आकर्षण केलें, व केलेल्या पातकाबद्दल निरययातना भोगण्यासाठीं ते त्यास घेऊन जाऊं लागले. परंतु तत्क्षणीं चार विष्णुदूतांनीं त्यांच्यावर हल्ला चढवून अजामिळाची सुटका केली.

---

१ **वृषलीपती**, शूद्रस्त्रीचा यजमान. **पातकसंगती**, पातकांशीं संगत ठेवणारा; अनीति, मद्यपान, शाठ्य, इत्यादि दुर्व्यसनांत निमग्न झालेला.

२ **नष्ट**, दुराचारी, पापी. **वरुषें**, वर्षें. **पोषणतोषणार्थ**, निर्वाहाकरितां व संतोषाकरितां. **तिच्या गर्भदरींत** इ०, "आत्मा वै पुत्रः" व "पतिर्जायां प्रविशति गर्भो भूत्वा स्वमातरम् तस्यां पुनर्नवो भूत्वा दशमे मासि जायते॥" या श्रुतिवचनाप्रमाणें अजामिळाला शूद्रीपासून दहा मुलगे झाले—म्हणजे त्यानेंच स्वतः शूद्रीच्या पोटीं दहा वेळां जन्म घेतला असें होतें.

३ **जों जों कळत कळत**, जसें जसें समजे, कानीं येई.

४ **रसें**, हौशीनें. **आळवी**, प्रेमानें हांक मारी.

५ **लालन**, लाड, चोंचले.

६ **सुखमृगांबुमधें**, सुखाच्या मृगजळांत, खोटया सुखांत.

७ **पातकाचें फळ**, ( मातापित्याच्या ) अधर्माचरणानें उपजलेलें मूल. **करी धन्य** इ०, परंतु त्याच पापाचरणानें उत्पन्न झालेल्या मुलाच्या नांवाचा उच्चार केल्यानें अजामिळानें आपलें कुळ यशस्वी केलें.

१० **वाणी**, कमतरता, उणीव.

११ **नीर**, पाणी.

१२ **झणिं**, कदाचित्, न जाणों एखादे वेळीं. **दुष्टदृष्टि होईल**, दुष्टाची दृष्टिबाधा होईल, दृष्ट लागेल. **कीटकदंशधृष्टी**, कीडमुंगीच्या दंशाची बाधा. **रागिजतील**, रागें भरतील.

१४ **छंद**, नाद, ध्यास, वेड. **जागरीं**, जागेपणीं.

१५ **पापद्रुमीं** इ०,–विषारी वृक्षावर विषारी फळ येतात, त्याप्रमाणेंच पापाचा परिणाम पापरूपच होतो; परंतु या अजामिळाच्या संबंधांत मोठी आश्चर्याची गोष्ट ही, कीं त्याच्या पापाचरणापासून पुण्याची उत्पत्ति झाली. उत्तरार्ध.–अजामिळ जरी आपल्या मुलाला उद्देशून नारायणनामाचा उच्चार करीत असे, तरी भगवंताच्या पवित्र नामाचा साहजिक प्रताप आपला गुण दाखविल्याशिवाय राहिला नाहीं. त्यानें त्याच्या पूर्वपापाचें भस्म करून टाकिलें.

१६ **लक्ष्मीकांतकृपासुधाघन**, भगवंताच्या कृपारूपी अमृताचा मेघ. **पातकझोंपडी**, मागें १।१।११-१४ टीपा पहा.

१७ **अशेषें अघकुळें**, एकूण एक सर्व पापें. **कुळ**, समुदाय, संघ.

१८ **भक्तियोग**, सर्व कर्म भगवदर्पण करून ज्ञानयुक्त भक्ति करण्याचा मार्ग. (मागें, १।२।११--१४ टीपा पहा.) गोषवारा:–शूद्रीची संगती सोडून व भक्तियोग साधून या अजामिळानें अविनाशी सुख अनुभवावें, अशी परम दयाशील भगवंताला त्याच्याबद्दल करुणा येऊन, त्याला सन्मार्गास लाविण्याकरितां पुढील उपायाची योजना प्रभूनें केली.

१९ भगवंतानें यमाला असा भ्रम पाडला, कीं अजामिळाचें आयुष्य अद्याप शिल्लक असतांही यमाला तें संपलें आहे असें वाटलें, व त्यानें आपले दूत त्यास आणण्याकरितां पाठविले.

२० अजामिळाचें आयुष्य शिल्लक नसतें, तर यमदूतांपासून त्यास सोडविल्यावर विष्णुदूतांनीं त्याला सरळ विष्णुलोकाला नेलें असतें. परंतु त्यांनीं तसें केलें नाहीं. तेव्हां अजामिळाचें आयुष्य अद्याप शेष होतें असेंच म्हटलें पाहिजे; आणि यमधर्मानें भलत्याच वेळीं बेहिशो-

यानें आपले दूत त्यास आणण्याकरितां पाठविले, ही केवळ विष्णुमायेनें उत्पन्न केलेली भ्रान्तीच समजली पाहिजे.

२१ **तदुपरांतिक**, त्या प्रसंगानंतर, तो अपमृत्यु टळ्ल्यावर. **द्विजाति**, ब्राह्मण. **प्रारब्धनेम** इ०, मग प्राण्यानें प्रारब्धभोग भोगल्याशिवाय त्याचा देहपात होत नाहीं, हा नियमच खोटा ठरेल. आयुष्य सरलें असलें, तर प्रारब्धभोगही, म्हणजे प्रस्तुत जन्मांत भोगण्याचें पूर्वार्जित पापपुण्याचें फळ, सरला असला पाहिजे. मग आयुष्य सरल्यावर वांचणें संभवत नाहीं; कारण वांचणें म्हटलें कीं त्याबरोबर प्रारब्धभोग हा आलाच.

२२ आतां कदाचित् कोणी असें म्हणतील कीं, "मुलाच्या निमित्तानें तरी भगवन्नामोच्चार घडून अजामिळ निष्पाप झाला; परंतु त्याला खरी भक्ति घडली नाहीं. तेव्हां ती घडावी म्हणून प्रभूनें त्याच्या प्रारब्धीं नसलेलें नवेंच आयुष्य त्याला दिलें."

२३ मोठमोठ्या ब्रह्मज्ञानी विरक्तांनासुद्धां दुःखदायक प्रारब्धभोग भोगल्यावांचून सुटत नाहींत. तेव्हां जीवन्मुक्ताच्या संबंधेंही जो प्रभु प्रारब्धाचा नेम मोडीत नाहीं, तो या अजामिळाच्या बाबतींत आपली निश्चित वहिवाट सोडील, हें संभवतें तरी कसें ! **खोटे**, दुष्ट, संताप करणारे, महानष्ट.

२४ **तदन्तीं**, बाकी राहिलेलें आयुष्य सरलें म्हणजे.

२५ **मोहला**, मोह पावलेला, भांबावलेला.

२६ **अघआपदा**, पापाची शिक्षा म्हणून भोगाव्या लागणाऱ्या नरकयातना. **अगोचर**, अज्ञात. **विप्रकुळाधमा**, दुराचारी ब्राह्मणाला.

२७ **दुरन्याय**, घोर पापें.

२८ **फांसे**, पाश, काढिणी, दोऱ्या. **विकराळ, कराळ**, भयंकर. **वदनीं न माती**, तोंडांत मावत नाहींत. तोंडाबाहेर आलेल्या होत्या.

३० **आळवोनी**, हांक मारून. **लिंगदेह**, वासनात्मक सूक्ष्मदेह; हा जडदेहास सोडून आत्म्याबरोबर जातो. 'दशेन्द्रियें, तन्मात्रापंचक, । ऐशीं पंधरा, मन एक, । मिळोनी षोडशकलात्मक । लिंगदेह ॥' वामनपंडितकृत निगमसार, ३।६२. **स्थूलदेह**, प्रस्तुतचा हालताचालता जड देह. " मग जीवकर्में अविलोकिलीं । प्रारब्धरूपें शरीरें केलीं । पंचभूतांचीं निर्मिलीं । तीं स्थूळें ॥" निगमसार, ३-६१.

३१ **त्यामधें**, अशा स्थितींत, इतक्यांत. **पंकेरुहें**, कमळें.
३२ **किंकर**, दास, सेवक. **दापें**, दम देऊन, चापून, धमकीनें.

---

## अध्याय १, चरण ४.

**सारांशः**—आपणावर एकाएकीं घाला घालून अजामिळास आपल्या पाशांतून सोडविणाऱ्या त्या चार व्यक्तींना पाहून भांबावलेल्या यमदूतांनीं प्रश्न केला, "कां हो, एकासारखे एक दिसणारे, सारख्याच अलंकारांनीं भूषित झालेले, अत्यंत तेजस्वी व प्रतापी, असे चतुर्भुज तुम्ही कोण आहां? यमधर्माच्या अप्रतिहत सत्तेला तुम्ही विरोध करावा, हें मोठेंच आश्चर्य!" त्यावर त्यांची चेष्टा करीत विष्णुदूत म्हणतात, "तुम्ही यमधर्माचे दूत म्हणवितां, तेव्हां धर्माधर्मज्ञान तुम्हांला चांगलेंच समजत असेल, नव्हे? तर सांगा पाहूं, धर्म म्हणजे काय? व अधर्म कशाला म्हणावें? का 'सब घोडे बारा टक्के' असाच आपला तुमचा धर्मन्याय आहे? बरा असो कीं बुरा असो, त्याला पाशांनीं बांध व यमयातना भोगावयास ने, असाच तुम्ही आपल्या दण्डनीतीचा अधिकार गाजवितां काय?" यमदूतांनीं उत्तर केलें, "आम्हांला धर्माधर्माची माहिती चांगली आहे. जें वेदविहित तो धर्म, आणि जें वेदनिषिद्ध तो अधर्म, अशी आमची समजूत आहे. जीवमात्राच्या कर्माला जे निरंतर साक्षी असतात, त्यांमध्येंच आमच्या यमधर्ममहाराजांची गणना आहे, तेव्हां त्यांच्या हातून चूक होणें संभवनीयच नाहीं. हा अजामिळ ब्राह्मण अत्यंत दुराचारी होता. यानें कामान्ध होऊन आपलें कुटुंब सोडलें, ब्राह्मण्यास तिलाञ्जलि दिली, व्यसनास मिठी मारिली, नीतीस ढकलून लाविली, व नाना तऱ्हेचीं पातकें आचरिलीं. अर्थात् हा निरययातनांस पात्र आहे, व म्हणूनच आम्ही त्याला बांधून नेत होतों."

---

१ **यमशासनाला**, यमराजाच्या आज्ञेला. **उपदेव**, दुय्यम देव. **गंधर्व** इ.—देवराज इंद्राची सेवा करणारे गंधर्व, सिद्ध, यक्ष, अशांपैकीं कोणी आहां कीं काय?

२ **हेमांबरें**, पीतांबर ( पिंवळे ). **अम्लाना**, सदा टवटवीत. **अलिकुळीं कमलांचिया माळा**, ज्यांवर भ्रमरांचे थवे (सुगंधानें मोहित होऊन) झेपावत आहेत असे कमळांचे हार. **पीन**, पुष्ट, जाड. **अर्चिले**, शृंगारलेले.

३ **आगळे**, (सामान्याहून) अधिक, असामान्य. **वारितां**, अटकाव, प्रतिबंध, विरोध करितां.

४ **निदेशकर**, आज्ञेप्रमाणें वागणारे, दूत. **पार्श्वग**, जवळ राहून सेवा करणारे, तैनातींतील सेवक, दूत. **घनरवें**, मेघांच्या गर्जनेसारख्या आवाजानें, गंभीर वाणीनें.

५ **मोदें**, मौजेनें, हंसत हंसत.

६ **धर्मतत्त्व**, धर्मरहस्य; धर्माचें स्वरूप, लक्षण, प्रमाण, इत्यादि.

७ '**नेमिले**' ऐवजीं 'नेमिलें' वाचावें. पूर्वार्ध.—तुम्ही सर्व योग्य शासन करणारे आहां, कीं जीवांकडून निश्चितपणें पाप घडो वा न घडो, त्या सर्वांनाच तुम्ही सारखेच दण्डास पात्र लेखीत असतां? **तत्परिहास बोलले**, त्या यमदूतांची थट्टा करीत म्हणाले.

८ **प्रवृत्तिप्रवाहें**, (हरिनामसंकीर्तनाचें माहात्म्य न जाणतां) जगाच्या वहिवाटीस अनुसरून. **भृत्य**, सेवक, दूत.

९ **मुनिवरें**, शुकानें. **येथें**, या 'नामसुधा' नांवाच्या टीकेंत. उत्तरार्ध.—मूळांत जेथें संक्षेपानें गहन तत्त्वें सांगितलीं असतील, तितकींच स्थळें निवडून येथें त्यांची स्पष्ट फोड केली जाईल. अशी निवड करण्याचें कारण हें, कीं माझें मन धर्माधर्माच्या विवेचनापेक्षां हरिनाममाहात्म्याचें अमृतपान करण्यास फार अधीर झालेलें आहे. तेव्हां प्रस्तुत विषयाचा संक्षेप करून, नाममाहात्म्याच्या विषयाचा यथेष्ट विस्तार करण्यांत येईल; आणि या टीकेचा हाच मुख्य हेतु आहे.

१० मूळ श्लोकः—वेदप्रणिहितो धर्मो ह्यधर्मस्तद्विपर्ययः। वेदो नारायणः साक्षात् स्वयंभूरिति शुश्रुम ॥ भागवत, ६।१।४०. **विहित**, स्थापित, प्रणीत, उपदेशिलेलें. **स्मृतिनिगमनिषिद्धें**, श्रुतिस्मृतींनीं ज्यांचा निषेध केला आहे अशीं कर्में.

**तनुहृदयिं**, शरीरांत व मनांत, शारीरिक व मानसिक. **सूर्यादि**, मूळ श्लोकः-सूर्योऽग्निः खं मरुद् गावः सोमः संध्याऽहनी दिशः। कं कुः कालो धर्म इति ह्येते दैह्यस्य साक्षिणः॥ भागवत, ६।१।४२. खम्=आकाशम्। गावः=इंद्रियाणि। कम्=उदकम्। कुः=पृथ्वी। धर्मः=यमधर्मः।

११ **तदनुरूपचि**, त्याच्या पापास योग्य असाच. **निरय**, नरक.

१४ **दिग्वस्त्रधारी**, नग्न, वस्त्रहीन, दिगंबर. **स्मर**, मदन. **हारीं नावरे**, हारीला येईना, ताब्यांत राहीना.

१५ **मनसिज**, **मकरध्वज**, मदन, कामदेव.

१६ **तदपेक्षित**, तिनें अपेक्षिलेलें, तिनें मागितलेलें. **अधरासव**, मधुर चुंबन. **अधर** खालचा ओंठ. **आसव**, रस.

१८ **जसा**, जेव्हां. **धर्मपत्नी**, लग्नाची बायको. अशीच स्त्री धर्मसंस्कारांना योग्य असते.

१९ **पापवित्तें**, पापमार्गानें मिळविलेलें द्रव्य. **प्रमत्तें**, माजलेल्यानें, मदान्धानें.

२१ **हरि हरी**! शिव शिव! निषेधसूचक उद्गार. **हरिदास**,विष्णुदूत.

२२ **अमोघ**, कधींही व्यर्थ न जाणारें, अचूक गुणकारी.

२३ **जगदात्मबंधु**, जगाचा खरा आप्त, परमेश्वर. **करुणैकसिंधु**, दयेचा केवळ एकजात समुद्र असा परमेश्वर.

२५ '**यासवचना**' ऐवजीं '**व्यासवचना**' असें वाचावें- उत्तरार्ध.-परंतु मूळ श्लोकांतील प्रत्येक शब्द मराठी श्लोकांत तुम्हांस आढळणार नाहीं. तरी पण जसे शरीरांत डावा उजवा असे दोन्ही डोळे सारखेच शोभादायक व उपयोगी असतात, तसेच संस्कृत श्लोक व मराठी श्लोक एकाच तोलाचे व सारखेच गंभीरार्थ आढळतील.

---

## अध्याय २, चरण १.

**सारांश.**-मागील अध्यायांतील यमदूतांचें भाषण ऐकून हरिदूत म्हणाले, "छेछे! तुमच्या हातून ही फारच मोठी चूक झाली आहे. यमधर्मासारख्या थोर अधिकाऱ्यांनीं व त्यांच्या दूतांनीं फार जपून वागलें पाहिजे, कारण

असे थोर अधिकारी सामान्य जीवांचे मार्गदर्शक असतात. तेव्हां त्यांनींच चूक केली अगर अन्याय केला, तर त्याचें अनुकरण इतर लोक करणारच. अजामिळ हा खरोखर निष्पाप आहे, व त्याला यमधर्मानें नरकयातना भोगण्यास नेणें म्हणजे खचित अन्याय व विश्वासघात होय अजामिळानें अंतकाळीं 'नारायण' या नांवाचा उच्चार केला, आणि तेव्हांच त्याचें पूर्वार्जित पाप नष्ट झालें. कितीही दुराचारी असला तरी तो हरिनामोच्चारानें निष्पाप होतो, मग तें हरिनाम जाणून तोंडाला येवो अगर नेणून येवो हरीचीं गुणःकर्मे स्मरून जर त्याला नामस्मरण घडेल, तर त्याचीं पूर्वपापें नष्ट होतील; एवढेंच नव्हे, तर त्याचा वासनाक्षय होऊन त्याचें अंतःकरण असें शुद्ध होईल कीं, त्याच्या हातून पुढें पाप घडणार नाहीं व तो जीवन्मुक्त होईल."

१ **श्रीवैकुंठपदाब्जभृंग**, विष्णूच्या चरणकमळावर रममाण होणारे भ्रमर, विष्णुदास, विष्णूचे दूत.

२ **विशारद**, पटु, तरबेज.

३ **परमधर्मधुरंधर**, अत्यंत श्रेष्ठ अशा भक्तिमार्गीतील अग्रेसर. **पांच श्लोक**, भागवत, ६।२।२–६. **प्रभु**, अत्यंत सामर्थ्यवान् विष्णुदूत.

५ **जनशासनदंडधर्ते**, लोकांस शिस्त लाविण्याकरितां हातीं अधिकारदंड धरणारे यमधर्मासारखे अधिकारी. **विषमता**, वांकडेपणा, अन्यायबुद्धि.

७ मूळ श्लोक—" यद् यद् आचरति श्रेयान् इतरस्तत्तदीहते । स यत् प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥" भागवत, ६।२।४. **सदाचारशास्त्रार्थ**, सदाचरणाचे शास्त्रोक्त नियम.

८ '**नीतीकर्ते**' या ऐवजीं '**नीतिकर्ते**' असें वाचावें. यमधर्मादिक लोकांना शिस्त लावण्याकरितां हातांत दण्ड धरितात म्हणून ते सदाचारनीतिकर्ते आहेतच; परंतु ते नुसते नीतिकर्तेच नाहींत, तर त्यांवर आणखी एक जबाबदारी आहे. लोकांचा त्यांच्या ठिकाणीं अत्यंत विश्वास असतो, तेव्हां त्यांनीं अन्याय करणें म्हणजे लोकांचा विश्वासघात करणेंही होय. पुढील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें हें कृत्य म्हणजे आपल्या मांडी-

वर निःशंकपणें डोकें ठेवून निजणाऱ्या मित्राचा गळा कापण्यासारखेंच दुष्ट विश्वासघाताचें ठरतें.

'**असो**' ऐवजीं '**असा**' असें वाचावें. **तो असा**, तुम्ही तो असा, तुम्ही त्या विश्वासघातक्यासारखे आहां.

१० **नामप्रसंग**, नामविषय, नाममाहात्म्याचें विवेचन.

११ **प्रत्यक्ष** इत्यादि–कोणत्याही सिद्धान्ताची सिद्धता होण्यास चार प्रमाणें तर्कशास्त्रांत सांगितलीं आहेत; तीं–प्रत्यक्षप्रमाण, शाब्दप्रमाण, उपमाप्रमाण, व अनुमानप्रमाण. जेथें हीं चारी प्रमाणें एकजुटीनें एकच सिद्धान्त दाखवितात, तेथें तो सिद्धान्त निःसंशय खरा ठरला, असें मानावें.

**प्रतीती**, प्रत्यय, अनुभव, खात्रीलायक ज्ञान.

१२ **भूतभविष्य**, मागील व पुढील, झालेलें व होणारें. **विवश**, पराधीन, बेहोष, बेशुद्ध अगर भ्रान्त स्थितींत असलेला. **कल्याणालय**, कल्याणाचें स्थान, अत्यंत हितकर. **भवपाश**, पूर्वकर्मानें उत्पन्न झालेलें संसारबंधन.

१३ **पापघ्न**, पापनाशक.–यावर तुम्ही कदाचित् असा आक्षेप घ्याल कीं, "हरिनामाच्या अंगीं पापनाशक शक्ति आहे या विश्वासानें अगर समजुतीनें या अजामिळानें हरिनाम उच्चारिलें नाहीं. मग त्याच्या पापाचा नाश होणें कसें संभवनीय आहे ?" यास उत्तर म्हणून आम्ही हरिनामाचा प्रभाव वर्णन करितों, तो ऐका.

१४ **तावन्मात्रें**, त्या कालापर्यंत घडलेलीं सर्व.

१५ **पद्यद्वय**, दोन श्लोक. स्तेनः सुरापो मित्रध्रुग् ब्रह्महा गुरुतल्पगः। स्त्री-राज-पितृ-गोहन्ता ये च पातकिनोऽपरे ॥ सर्वेषामप्यघवताम् इदमेव सुनिष्कृतम्। नामव्याहरणं विष्णोर्यतस्तद्विषया मतिः ॥ भागवत,६।२।९-१०.

१७ **चतुर्थो पादीं**, 'यतस्तद्विषया मतिः' या चवथ्या चरणांत.

१८ '**श्लोकांचिया**' ऐवजीं '**श्लोकाचिया**' असें वाचावें.

२० अन्त्य चरण.–'सलोकता, समीपता, सरूपता, व सायुज्यता' या चारी प्रकारच्या मुक्ति त्याच्या अगदीं हातांतच येतात. सलोकता (परमेश्वराशीं)=

एकत्र वास; समीपता=निकट सहवास; सरूपता=एकरूप स्थिति; सायुज्यता=तन्मय अवस्था.

२१ **तदर्थक**, त्याच्याच विषयानें व्यापलेलें. **तन्मय**, विष्णुस्वरूपानें ओतप्रोत भरलेलें.

२२ अर्थ–बुद्धीचा विषय जो हरि, तद्रूपच ती होते असाही या चरणाचा दुसरा अर्थ संभवतो. परंतु वर दिलेलाच अर्थ प्रस्तुत प्रसंगाशीं सुसंगत आहे, कारण या ठिकाणीं कोणत्याही निमित्तानें न कळतां हरिनामोच्चार घडून, हरि आपण होऊनच मतीचा विषय होतो, व त्यामुळेंच पापसंघाचें भस्म होतें असा प्रतिपादनाचा रोख आहे. ( मति हरिस्वरूपच होणें ज्ञानयुक्त भक्तियोगाचें लक्षण आहे, ज्ञानहीन नामोच्चाराचें नाहीं. )

२३ **तन्नामधारक**, तें नांव धारण करणारा, त्या नांवाचा.

२४ उत्तरार्ध.-आतां कोणी अशी शंका घेईल कीं, "तुम्ही जो हरि म्हणतां तो सर्वज्ञ परमात्मा असूंच शकत नाहीं; कारण दुसऱ्याचें मनोगत न जाणतां, 'यानें माझ्या नामाचा उच्चार केला आहे, तेव्हां यानें मलाच आठविलें आहे,' अशा गैरसमजुतीनें जो हरि त्याकडे कृपादृष्टि वळवून पाहतो, तो हरि सर्वज्ञ कसला ?"

२५ **करुणेस्तव**, ( कोणत्याही गैरसमजुतीनें नव्हे, तर ) आपलें नाम ( अजाणतां का होईना पण ) त्यानें उच्चारिलें इतक्याचखातर दयार्द्र होऊन. **स्तव**,–मुळें,–कारणानें. **नामप्रताप** इ०–अन्वय–( नाम ) पाप हरि ( हरितें ) ऐसा नामप्रताप कळोनी.

२६ '**पाचारितों**' ऐवजीं '**पाचारितां**' वाचावें.

२७ **अपेक्षी**, इच्छितो. उत्तरार्ध–हरि सर्वसाक्षी आहे, तेव्हां माझ्या नामोच्चारानें पापें भस्म होतात हें तरी तो जाणतोच; मग 'याचीं सर्व पापें नष्ट झालीं आहेत व आतां हा शुद्ध झाला आहे,' अशाच बुद्धीनें हरीनें अजामिळाकडे दृष्टि वळविली.

२८ **जीवोद्धारनिमित्त**, जीवांना तारण्यासाठीं. तिसऱ्या चरणांत ईश्वराचे सर्वधर्मसंमत असे तीन गुण सांगितले आहेत; ( १ ) सर्वज्ञत्व, ( २ ) सर्वसामर्थ्य, ( ३ ) करुणामयत्व. **नुद्धरी**, तारणार नाहीं.

२९ **हा पूर्वपक्ष,** (२४ व्या श्लोकांत घेतलेल्या) या शंकेचें ईश्वरानें (माझ्या मुखानें २५-२८ श्लोकांत) समाधान केलें आहे. **पार्षद,** विष्णूचे सभासद, विष्णुदूत. **पापहरें,** पापहरण करणारीं प्रायश्चित्तें.

३० ‘**प्रायचित्तें**’ ऐवजीं ‘**प्रायश्चित्तें**’.

३०-३१ **वेदवक्ते,** वैदिक कर्ममार्गाचे अभिमानी. मूळ श्लोकः-न निष्कृतैरुदितैर्ब्रह्मवादिभिस्तथा विशुध्यत्यघवान् व्रतादिभिः। यथा हरेर्नामपदैरुदाहृतैस्तदुत्तमश्लोकगुणोपलंभकम् ॥ भागवत, ६।२।११. उत्तमश्लोकगुणोपलंभकम्=परमेश्वरगुणज्ञापकम्।

३२ **तदुपरि,** निष्पाप झाल्यावर नामसंकीर्तन करणाऱ्या भक्ताला, त्या त्या भगवन्नामांनीं दाखविलेले भगवंताचे पवित्र तेजस्वी गुण आवडूं लागतात. **रुचितान्तीं,** हरिनामाची गोडी ज्यास कळूं लागली आहे अशा अंतःकरणांत.

३३ **सिता,** पांढरी साखर. **रुचि,** गोडी. **आवडां** इ., मग तिच्याइतकें दुसरें कांहींच गोड वाटत नाहीं.

३४ **अन्यायकर्ता,** दुराचारी.

३५ **नामें गोड होतील,** हरीच्या नामांची गोडी कळूं लागेल. **अभिराम,** रमणीय, मनोहर. **धामें,** तेजस्वी गुण. **वृन्द,** समूह. अंत्य चरण—म्हणून ‘अजामिळ पापी आहे’ असें यमदूतांनीं म्हणतांच, विष्णुदूतांनीं ‘हरि हरि!’ असे निषेधपर उद्गार काढिले. मागें १।४।२१ व टिपा पहा.

३६ **पापमात्रें,** सर्व पापें. **परि करिति** इ०, परंतु खरी धन्यता परमेश्वराच्या कृपाकटाक्षानेंच प्राप्त होते, कारण ईश्वरी कृपेनेंच भगवद्गुणांचा छंद लागून लौकिक वासनांचे फंद बंद होतात व पापवृत्ति अजीबात नाहींशी होते. **तदनु,** त्यानंतर. ‘घती’ ऐवजीं ‘घेती’.

३७ **मधुरिपुमय,** विष्णुमय. मधु दैत्याला विष्णूनें मारिलें. **नामनिष्ठ,** नामसंकीर्तनांत एकतानतेनें मग्न झालेला. **वासुदेवाख्यधामीं,** वासुदेव नांवाच्या ठिकाणीं किंवा तेजांत.

३८ आपो नारा इति प्रोक्ता आपो वै नरसूनवः। ता यदस्यायनं पूर्वं तेन नारायणः स्मृतः॥ मनुस्मृति १।१०. **अयन,** स्थान.

३९ व्यक्त, इंद्रियगोचर. **अव्यक्त**, इंद्रियांस अगोचर.

४० **पंचभूतें**, पृथ्वी, आप्, तेज, वायु व आकाश, हीं पांच महाभूतें. **मीपण**, अहंभाव, ' मी ' हें स्फुरण. **लटक्या विकारा खरा प्रभु**, व्यक्ताव्यक्तादि सर्व आभासांना नारायण हाच सत्यस्वरूप आधार आहे.

४१ नारांचा आधार नारायण; पण तींच नारें नारायणालाही आश्रय होतात. पहिला नारायण हा परमात्मा, व दुसरा मायेनें व्यापिलेला परमात्म्याचा प्रतिबिंबरूप जीवात्मा होय.

४३ **विमुक्तजन-आश्रय**, विरक्तांना आसरा देणारा. **हीं ज्ञानगम्य** इ०-नारायणासारखीं नामें फार खोल अर्थाचीं आहेत व तीं समजण्याला व्याकरण, व्युत्पत्ति, तर्क, न्याय, वगैरेचें ज्ञान अवश्य आहे; परंतु यांशिवाय आणखी भगवंताचीं नांवें आहेत, तीं सगुण अवतारकृत्यें दाखवितात व म्हणून तीं सर्वांस सहज समजण्यासारखीं आहेत.

४४ **सोनेसळा**,पिंवळा पीतांबर. **भूभारांतक**, दुष्टांचा नाश करून पृथ्वीभार हलका करणारा.

४५ **कोदंड**, चाप, धनुष्य.

४६ मूळांतील अकराव्या श्लोकाचा ' तदुत्तमश्लोकगुणोपलंभकम् ' हा चवथा चरण वामनाच्या डाव्या पायाप्रमाणें केवळ ब्रह्माण्डव्यापी आहे. त्याचा अर्थच असा खोल आहे कीं, त्यांत ज्ञानसर्वस्वाचा अंतर्भाव होतो. तसेंच वामनरूपी विष्णूच्या डाव्या पायापासून उद्भवलेली गंगा जशी तीन्ही लोकीं संचार करिते, तद्वत् या श्लोकचरणापासून उगम पावणारी ही ' नामसुधा ' टीकाही तीन्ही लोकांच्या कानीं संचार करीत आहे.

४७ ' **सिद्धन्त** ' ऐवजीं ' **सिद्धान्त** '. **ग्रथितार्थ**, प्रतिपादनाचा विषय. **नामार्थ**, नामानें सुचविलेला अर्थ.

४८ **सुखें**, सहज, बिनखटपटीनें.

४९ ' **सर्वहा** ' ऐवजीं ' **सर्वही** '. **चित्ताकाशीं** इ०, आकाशांत चन्द्र उगवला असतां जसा अंधकार नाहींसा होतो, तसाच चित्तामध्यें या ज्ञानाचा प्रकाश उजळला म्हणजे भ्रम नष्ट होतो. **चित्**, ज्ञान.

## अध्याय २, चरण २.

**सारांश.**–विष्णुदास मागील चरणांतील विषयाचाच विस्तार करून सांगतात कीं, " न कळत घडलेल्या हरिनामोच्चारानें पापाचें भस्म होतें, आणि हरिगुणाची गोडी अंतरंगीं ठसली, म्हणजे मन पुन्हां पापाकडे वळतच नाहीं. रज आणि तम हे गुण भगवद्‌भक्तीला विरोधक आहेत. परंतु हरिनामोच्चार जाणून घडूं लागला म्हणजे हरिगुणाची गोडी अधिकाधिक वाढते व रजतमांचा निरास होऊन, मन शुद्धसत्त्वमय होतें. असें झालें म्हणजे वासनाक्षय होऊन मनुष्य भक्तिप्रवण होतो आणि तो सर्व कर्मे ईश्वरार्पण करून परमगतीस पात्र होतो.

थट्टेनें, हेळणेनें, अगर उपरोधानेंही हरिनाम मुखास आलें असतां, त्याचा पापहरणाचा स्वाभाविक प्रताप आपला गुण केल्यावांचून राहात नाहीं.

बेहोष स्थितींत हरिनाम मुखास आलें, तरी तेंही दुर्गति टाळण्यास पुरेंसें होतें. "

१ **विषद = विशद**, स्पष्ट.

२ **विषयीं प्रसक्ति**, लौकिक विषयोपभोगाविषयीं आवड. **विशुद्ध**, अत्यंत शुद्ध.

३ **नामींच**, केवळ ज्ञानहीन नामोच्चारानें. **आचरला**, पावला, लाभला. **शुद्धसत्त्व**, भक्तिरसांत तल्लीन होण्यास अत्यंत अनुकूल व आवश्यक, असा जो शुद्ध सत्वगुण त्यानें भरलेलें.

४ '**प्रताप**' ऐवजीं '**प्रतापें**'.

५ परंतु कामी जन अशी शुद्धि इच्छीत नाहींत, ते एकीकडे हरिनाम घेतात, परंतु दुसरीकडे सारखे लौकिक विषयांच्या मागें लागलेले असतात. पण जे शाहणे लोक अशा शुद्धीची मनापासून इच्छा करितील, त्यांना हरिनामसंकीर्तनानें ती त्वरित लाभून ते शुद्धतत्वमय होतील.

६ विषय हे तमोगुणव्याप्त आहेत व इंद्रियांवर रजोगुणाचा पगडा असतो, आणि या दोहोंमुळें सत्त्वगुण मलिन व हीणकस होतो, व स्वभावतः सात्विक असलेलें मन विषयलंपट होतें.

७ **विषयनिष्ठ**, लौकिक उपभोगांत गढलेले.

८ उत्तरार्धः–ज्या मनांत ईश्वराविषयीं भक्ति खरोखरच उत्पन्न होईल, तेथें लौकिक वासनांचें बळ–तें कितीही मोठें असलें तरी–चालणार नाहीं.

९ **रहाटणें**, रहदारी ठेवणें, जाणें येणें.

१० **अपेक्षिती**, इच्छितात.

११ **अनुवादीं**, गाइले असतां. **निश्चयासीं**, ( निश्चय+असि ) निश्चयरूपी तरवारीनें. **पापवारा लागों नेदिती**, पापाचा यत्किंचितही स्पर्श होऊं देत नाहींत.

१२ **भृतकीं**, सेवकांनीं.

१३ **गळा धरितो**, कोंडमारा करितो, अस्वस्थ करितो.

१४ **सद्गति**, परमगति, मुक्ति.

१५ ‘ द ’ ऐवजीं ‘ दे ’.

१६ **उत्कट**, अत्यन्त, अतिशय, भरघोंस.

१७ **मथितार्थ**, सारांश, तात्पर्य. **कसेपरी**, कोणत्याही रीतीनें, कोणत्याही निमित्तानें. **पतितपावन**, पाप्यास शुद्ध करणारा. **यो**, येवो.

१८ इतर व्रतादि आचरलीं असतांही परमेश्वर पापशुद्धि देतोच, पण तें देणें खरेदीविक्रीसारखें सौद्याच्या स्वरूपाचें आहे. मिळणाऱ्या शुद्धीचें प्रमाण तीप्रीत्यर्थ केलेल्या तीर्थव्रतादि पुण्यकर्मांच्या प्रमाणाबरोबरच असणार.

१९ **सकळोपरी**, इतर सर्वांपेक्षां जास्त.

२० **म्हणुनि इ०**, यामुळेंच ज्ञानयुक्त एकनिष्ठ भक्तीचें महत्त्व आपल्या दूतांच्या तोंडून विष्णूनें अजामिळास कळविलें व त्याचें मन सत्त्वशुद्ध करून त्याचा गळा यमपाशांतून सोडविला.

२२ **पदें**, शब्द, अक्षरें.

२४ **जितचि**, जिवंतपणीं घेतलेलीं. **श्रुतार्थें**, ऐकलेल्या प्रतिपादनावरून.

२५ **अभिप्राय**, खरा गूढ अर्थ. व्यक्त, स्पष्ट. **पदार्थ**, श्लोकांतील शब्दांचा अर्थ. **भावार्थ**, इष्टार्थ, इंगित, अभिप्राय.

२६ **वासनत्यागरीतीं**, वासनांचा त्याग केल्यानें. '**द्विजांला**' ऐवजीं '**द्विजाला**'.

२६-२८. पूर्वींच्या श्लोकांत (१२-१६) विष्णुदूतांनीं असें विधान केलें आहे कीं, वासनाक्षयपूर्वक जे शुद्धीची इच्छा करितात, त्यांस ती पूर्ण शुद्धि लाभते. परंतु अशी शुद्धि अजामिळ ब्राह्मणाला झाली नव्हती, म्हणून येथें यमदूतांच्या मनांत एक शंका उद्भवण्यासारखी आहे. हरिनामोच्चारानें त्याचीं सर्वपापें जळालीं परंतु ही शुद्धि त्याला न कळतां घडून आली; आणि या शुद्धीनंतर कांहीं काळ जाऊन जर त्याला मरण आलें, तर मध्यंतरीं कांहीं तरी कुकर्म घडून ती तात्पुर्ती शुद्धि नष्ट होईल, व तो यमदंडास पात्र होईल. अशी शंका कदाचित् यमदूत घेतील हें मनांत ओळखून विष्णुदूतांनीं त्या शंकेचें येथें निरसन केलेलें आहे.

२८ '**तव्हां**' ऐवजीं '**तेव्हां**'.

२९ **देहावसानसमयीं**, देहपातकाळीं, अंतकाळीं.

३१ **फळलें**, गुणकारी झालें, यश देतें झालें. **हेतु**, निमित्त, कारण.

३२ **अघबीजशेषें**, शिल्लक राहिलेल्या पापबीजासह.

३३ **प्राणयानसमयीं**, प्राण जाण्याचे वेळीं, अंतकाळीं.

३४ **तदर्थ**, म्हणून.

३५ **आत्मजा**, मुलाला.

३७ **सांकेत**, लोकव्यवहारासाठीं ठेवलेलीं पाळण्यांतलीं वगैरे नांवें. **संकेत**, व्यवहारांतील खूण.

३८ **परिहास**, थट्टा, चेष्टा.

३९ **चाळवी**, भुलवतो, चकवितो. **दंभ**, ढोंग, सोंग.

४० **उदरार्थ**, पोटासाठीं. **स्वगुण नाम** इ०, कोणत्याही निमित्तानें परमेश्वराचें नाम उच्चारिलें असतां तें आपला पापहारक गुण दाखवितेंच.

४१ **हेळणेनें**, धिक्कारपूर्वक, अपमानानें, निंदेनें.

४३ **दुर्मृत्यु**, अपघात. **दुर्गति**, नरकवास.

४५ **अग्निहीकरुनि**, आगीमुळेंही. **विवश**, बेहोष.

४६ **विवशतेंत**, बेहोष स्थितींत, बेशुद्धींत.

४७ **पापमात्रें,** केवळ पापें. **विचित्रें,** नाना प्रकारचीं.

४८ **विशद,** स्पष्ट.

४९ **विशुद्धिधामें,** अत्यंत शुद्धीचीं ठिकाणें.

५० **थोरां थोरें** इ०, लहानमोठ्या पापांप्रमाणें लहानमोठीं प्रायश्चित्तें मनुप्रभृति ब्रह्मवाद्यांनीं सांगितलीं आहेत.

५१ **तंत्र,** क्रिया, करणी, खटपट.

५२ **पुंडरीकाक्ष,** कमलनयन विष्णु.

५३ **जान्हविनंदनभारती,** भीष्माची वाणी. भीष्म हा गंगेचा मुलगा होता. ( मागें १।१।१७ व टीप पहा. )

५६ **वेदवाणी,** वेदाचाच अभिप्राय सांगणारे.

५७ **वैषम्य,** विषमता, धरसोड, फरक, दुमत, मतभेद.

५९ **रसें,** आनंदानें किंवा भक्तिरसानें. **उपमामिसें,** दृष्टान्तरूपानें, दाखला देऊन. येथपर्यंत प्रत्यक्ष व शाब्द प्रमाणें देऊन येथून पुढें उपमा प्रमाणानें हरिनाममाहात्म्य सिद्ध केलें आहे. (मागें २।१।११ व टीप पहा.)

६० **पापधामें,** पापांचीं ठिकाणें.

६२ **गोपांगनारमण,** गोपींचा प्रिय. **विहार,** खेळणें, बागडणें. पाठभेद-**क्रीडाविहार सुचवी हृदयीं तयाला.**

६३ **धनंजय,** अर्जुन. **उभय कृष्ण,** अर्जुन व गोपालकृष्ण. **अजित-कीर्तिसुधारसधामकें,** परमेश्वराच्या गोड कीर्तीचीं ठिकाणें.

६५-६७ हरिकीर्ति ज्यांत ओतप्रोत भरलेली आहे, अशीं हरिनामें जर पापहरण करणार नाहींत, तर त्या नांवांना ' उत्तमश्लोक ' हें विशेषण कसें लागू पडेल ? ( वर श्लोक ६१ पहा. ) वेदपुराणांत अत्यंत पापी म्हणून पुष्कळ व्यक्ति प्रसिद्ध आहेत. परंतु परमेश्वराची प्रसिद्धि पापाविषयीं नसून, त्याच्या विश्वतारकगुणाविषयीं आहे. म्हणून त्याचीं प्रसिद्ध उत्तमश्लोकनामें पापाचें भस्म करणारच.

६९ **मित,** मेजकें, थोडकें.

## अध्याय २, चरण ३.

**सारांश.**—यमदूतांच्या हातून अजामिळास सोडवून व वरीलप्रमाणें नाममाहात्म्य सांगून विष्णुदूत गेले व यमदूतही यमाच्या राजधानीस यमाला सर्व वृत्तान्त सांगण्याकरितां चालते झाले. इकडे कांहीं वेळानें अजामिळ सावध झाला. परंतु यमदूतांचें भाषण त्याच्या कानांत अद्याप गुणगुणत होतें व त्यावरून आपण महापातकी असून नरकवासास पात्र आहों हें कळून त्याला अत्यंत दुःख व पश्चात्ताप झाला. इतक्यांत त्याला आपल्याला सोडविण्यास आलेल्या दुसऱ्या दूतांचीही आठवण झाली व त्यांनीं सांगितलेलें नाममाहात्म्यही त्यास स्मरूं लागलें. कांहीं वेळ त्याला हें सर्व स्वप्नच होतें कीं काय, अशी भ्रान्ति झाली. परंतु लौकरच हा सर्व खरा प्रकार असून परमेश्वरकृपेनें आपल्यास आपल्या जन्माचें सार्थक करण्याचा मार्ग कळला आहे; असा त्यानें सिद्धान्त बांधला व पूर्ण पश्चात्तप्त होऊन, तो भक्तिमार्गास लागला. त्याचीं सर्व व्यसनें, दुराचार, पापसंगति, व लौकिक वासना हीं सुटलीं. त्याचा मानसिक पुनर्जन्मच झाला. नंतर सर्वसंग सोडून तो गंगातीरीं जाऊन हरिभजनांत तल्लीन होऊन राहिला. यानंतर त्याचा गंगातीरीं आयुःक्षय होऊन अंतकाळ येऊन ठेपला, तेव्हां तो विष्णुरूप बनला व चार विष्णुदूतांनीं त्याला, जेथून पुन्हां मागें परतावें लागत नाहीं, अशा वैकुंठ लोकास नेलें.

१ '**हरिकिंकरी**' ऐवजीं '**हरिकिंकरीं**' वाचावें.

२ **द्विजनिबंधक**, ब्राह्मणाला बांधणारे ( यमदूतांचे पाश ).

३ **अध्यायपर्यंत**, या दुसऱ्या अध्यायाची पुढें समाप्ति होईपर्यंत.

४ **संयमनी**, यमाची राजधानी. **जो का**, कीं. **त्वदनुशासनभंग**, तुझ्या आज्ञेचा अगर अधिकाराचा अपमान.

५ **सुमंगल**, अत्यंत शुद्ध.

६ '**दूत पादांबुजाला**' ऐवजीं '**दूतपादांबुजाला**'. **रजाला**, चरणाच्या धूलिकणांला.

८ **वांचतसे**, शुद्धीवर येत आहे, सजीव होत आहे. **देशामधें**, तोंच.

९ **सूक्ष्मशरीरधारी**, लिंगदेह धारण करणारा ( मागें १।३।३०-३१ व टिपा पहा ). **चारि दिवाकर**, चार सूर्य.

१० **फळाची**, फळ ( परिणाम ) वर्णन करणारी.

११ **त्या फळाचे दंड**, त्यामुळें होणाऱ्या यातना.

१३ **वार दहादहा**, एकेकदां असे दहा वेळां.

१४ **स्वकृतानुतापें**, आपल्या ( दुष्ट ) कृत्यांच्या पश्चात्तापानें.

१५ **अकर्में**, दुष्टक्रिया. **जों पूर्वकर्म**, इ०, केलेल्या दुष्कर्मांबद्दल मनाला खराखरा पश्चात्ताप जोंपर्यंत झालेला नसतो, तोंपर्यंत सन्मार्गाची आवड त्याच्यांत उत्पन्नच होत नाहीं.

१६ **अगम्या**, संगति करण्यास अयोग्य.

१७ **गति**, आधार, आसरा. **अकृतज्ञपणें**, कृतघ्नपणानें.

१८ **धर्मघ्न**, अधर्मानें वागणारे, दुराचारी. **पचती**, शिजतात, उकतात, यातना भोगतात.

१९ **स्मृतिगत झाला**, आठवला. **प्रोक्त**, सांगितलेला.

२० **त्याकरूनी**, त्यामुळें.

२२ **विबुधोत्तमांतें**, देवश्रेष्ठांतें. **तमातें**, अज्ञानाला, दुःखाला.

२३ **काम**, वासना, इच्छा.

२४ **महासुकृत**, मोठें पुण्य. **निर्लज**, कोडगा, निलाजरा. **विप्रहन्ता**, ब्राह्मणाचा विध्वंस करणारा. **होणार काय** इ०, 'पुढें माझी गति काय होईल ?' याची ज्यानें कधींच फिकीर केली नाहीं.

२५ '**पद्यचतुष्टये**' ऐवजीं '**पद्यचतुष्टयें**'.

२६ **पवन, इंद्रिय, चित्तहि आवरूं**, प्राणायाम, इन्द्रियदमन, व चित्तवृत्तिनिरोध हीं मी करीन; पंचप्राणांचा अवरोध करून व इंद्रियें आणि मन हीं स्वाधीन ठेवून मी भक्तियोग साधीन. **साधनवृन्द**, उपायसमूह, सर्व साधनें.

२७ '**छदूं**' ऐवजीं '**छेदूं**.' पूर्वार्ध :—मायाजन्य अज्ञानाचा जो अनादि पाश पडलेला आहे, तो मी आधीं तोडून टाकीन; कारण पुण्यकर्माचा क्षय होऊन सुख सरलें कीं ही अविद्या ( अज्ञान ) च आपलें जाळें पसरून अनेक दुष्ट वासना उत्पन्न करिते. चित्ताला भ्रान्ति पडली कीं

नानातऱ्हेच्या इच्छा उत्पन्न होतात व मग अमंगळ कृति घडूं लागते. नंतर या कृतीचीं फळें भोगल्यावांचून सुटकाच नसल्यामुळें कर्मपरंपरेची सांखळी अखंडपणें लांबतच जाते. **आवरणें**, पडद्यामुळें, दडपणानें. **विक्षेप**, चंचळपणा, भ्रान्ति.

" विक्षेप आवरण दोपरिची अविद्या, ते नाशते प्रकटतां हृदयांत विद्या ।
विक्षेप इंद्रियगणें विषयांस जाणे, तैसेंचि आवरण आपण कोण नेणे । "

वामनपंडितकृत कर्मतत्व, ४।२७-२८.

'**वेगळें**' ऐवजीं '**वोंगळें**'. '**सरकं**' ऐमजीं '**सरऊं**'. **वोंगळ**, अमंगळ, दुष्ट. **भोगतांच सरऊं**, भोगल्यानेंच नाहींसें करूं. **कर्ममूळें**, कर्माला कारण होणारीं.

२८ आत्मा काय व आत्मेतर काय, याचें ज्ञान सांख्यशास्त्राच्या अध्ययनानें संपादून ही अविद्या नाहींशी करून टाकीन. मग आत्मनिष्ठेनें योगसमाधीचा अग्नि चेतवून सर्व मनोव्यापारांचें भस्म करून सोडीन. याप्रमाणें पूर्वजन्मींचें संचितकर्म नष्ट झालें म्हणजे प्रस्तुत जन्मींचें क्रियमाण कर्मही, सर्व क्रिया ईश्वरार्पण करून, मी नष्ट करीन. याप्रमाणें वर्तन ठेवून या जन्मीं भोगावयाचें सर्व प्रारब्धकर्म भोगून संपविल्यावर मी निर्गुण परमात्म्याशीं एकरूप होऊन राहीन. **सांख्य**, या शास्त्राचे आद्य प्रवर्तक कपिल महामुनि होत; त्यांनीं आपली आई देवहूती हिला या शास्त्राचा उपदेश केला. यांत आत्मज्ञान सांगितलेलें आहे. पुरुष हें मूळ आत्मतत्त्व, व परमात्मा व जीवात्मा हे त्याचेच भेद. मायेनें विकृत झालेलें आत्मतत्त्व म्हणजेच जीवात्मा. पुरुषास (म्हणजे परमात्म्यास) सृष्टि उत्पन्न करण्याची इच्छा होऊन, त्यानें प्रकृतीच्या (म्हणजे अनादिमायेच्या) ठिकाणीं आपली चैतन्यशक्ति संक्रमित केली; अर्थात् परमात्मा हा मायेचा नियंता होय. या चैतन्ययुक्त प्रकृतीपासून महत्तत्त्व उदयास आलें. महत्तत्त्वाच्या विकारानें सत्त्व, रज, आणि तम या गुणत्रयीनें मंडित असा अहंकार उत्पन्न झाला. सात्त्विक अहंकारापासून मन, राजसापासून दहा इंद्रियें, व तामसापासून सूक्ष्मभूतें व पृथ्वी वगैरे पंच महाभूतें उद्भवलीं. एकंदरींत सांख्यशास्त्रांत पुरुष

हें चिन्मय मूलतत्त्व मानून, त्याच्यापासून उद्भवलेल्या विश्वोत्पत्तीचीं चोवीस तत्त्वें कल्पिलीं आहेत, तीं येणेंप्रमाणें.

| | |
|---|---|
| १ प्रकृति. | १ मन |
| १ महत्तत्त्व | १० इंद्रियें (कर्मज्ञानसाधनें) |
| १ | १० ( सूक्ष्मभूतें व महाभूतें. ) |
| ३ | २१ |

---

२४

तेव्हां प्रकृतीच्या उपाधीनें जडांत गुरफटलेल्या जीवात्म्यास आत्मानात्मज्ञानानें सोडवून त्याचें मूळचें चिन्मय स्वरूप उजळ करणें, हा सांख्यशास्त्राचा हेतु आहे. **शाब्द**, सांख्य हा ज्ञानमार्ग आहे, कर्ममार्ग नाहीं. केवळ आत्मानात्मज्ञानाच्या जोरावर जीवात्म्यास मुक्त करणें, हें त्याचें ध्येय आहे. कोणत्याही कर्माचा तें पुरस्कार करीत नाहीं, म्हणून त्यास येथें 'शाब्द' म्हटलें आहे. **योग**, ईश्वरार्पणबुद्धीनें निष्कामकर्माचा योग. (मागें १।२।११-१४ व टीपा पहा). **संचित, प्रारब्ध**, व **क्रियमाण**, पूर्वजन्मीं आचरलेल्या शुभाशुभ कर्माचें जें फळ प्रस्तुत जन्मानंतरच्या पुढें येणाऱ्या जन्मांत भोगण्याकरितां सांचून राहिलेलें असतें त्यास 'संचितकर्म' म्हणतात. पूर्वार्जित कर्माचें जें फळ प्रस्तुत जन्मांत भोगण्याचें निश्चित झालेलें असतें, तें 'प्रारब्धकर्म'. चालू जन्मांत जें कर्म आचरून नवीन संचित आपण तयार करितों, तें 'क्रियमाण'. संचित व क्रियमाण यांचा नाश कर्मार्पणयुक्त निष्काम भक्तिकर्मयोगानें घडतो. परंतु प्रारब्ध भोगल्याशिवाय सुटका नाहीं. "ज्ञानानळेंकरुनि संचित दग्ध होतें, तेव्हां अकर्तृपण जें क्रियमाणही तें; । प्रारब्धमात्र उरतें, सरतें स्वभोगें, तें नासल्याउपरि मुक्तिच भक्तियोगें. ॥" वामनपंडितकृत कर्मतत्व, १।४५.

२९ **सर्वात्मभाव**, परमात्मा अशेष वस्तुमात्रास व्यापून आहे या ज्ञाननिष्ठेनें. **स्थिरजंगम**, चराचर. **मध्यस्थ**, मित्र नाहीं व शत्रूही नाहीं असे, तटस्थ, उदासीन. **तद्रूप**, परमात्मस्वरूप. '**निश्चियें**' ऐवजीं '**निश्चयें**'.

३१ **नसतां**, दोष नसते तर. **आर्यकार्य**, उत्तमकार्य, आत्महिताचें भगवद्भक्तिरूप कार्य. **जगन्मोहिनी** इ०, या शूद्रस्त्रीप्रमाणेंच विश्वाला मोहमाया घालणाऱ्या या मायेस झिटकारून, मी सर्वसंगपरित्याग अंगीकारून वनवासाला जाईन.

३२ **कटकटा**, हाय हाय.

३३ **जिता**, जिवंत असणाऱ्याला. **शवाला**, प्रेताला, चैतन्यहीन देहाला. **प्रतीति**, अनुभव. "तामस पंचभूतसृष्टी । त्या देहीं आत्मत्वदृष्टी, । म्हणूनी प्रबळ जिचे पोटीं । तमोगुण, ते अविद्या ॥"२८ " 'मी देह' ऐसी प्रतीती । शवांत नाहीं, हे देखती; । मागुती 'मी देह' ऐसें म्हणती, । हें अविद्या-आवरण ॥" ३२. निगमसार, अ० २.

३४ **रविरश्मिनीर**, सूर्याच्या किरणांत होणारा पाण्याचा भास, मृगजळ. 'उल्लंघने' ऐवजीं 'उल्लंघणें'.

३५ **दिनयामिनी**, दिवसरात्र. **याम**, प्रहर, पाहरा. **निर्लज्ज**, संकोचहीन, बिनदिक्कत.

३७ **नेमुनी**, आवरून, ताब्यांत ठेवून, आत्मनिष्ठ करून.

३८ **उदासता**, विरक्ति, वैराग्य, सगत्याग.

३९ **मनिंहुनि**, आजपर्यंत मनाला जडलेला लौकिक सुखाचा आशा-पाश त्यानें तोडून टाकला. **श्रीहरी मोहरीला**, तो परमात्म्याला शुद्ध-भक्तीनें मोहून गेला.

**भवदव**, संसाररूपी वणवा, जन्ममरणाची आग.

४० **वैकुंठयात्रा**, मरणोत्तर वैकुंठास गमन. **पुत्रपौत्र**, मुलाचा नातू, पांडूचा पणतू व पांडवांचा नातू परिक्षित्.

४१ **निजा चिंता**, इ०–त्या ब्राह्मणश्रेष्ठानें शुद्ध चैतन्यभावनेंत शिरून आत्मसमाधि लाविली. **चिदाकाश**, अव्यवच्छिन्न आत्मज्ञान. आकाश म्हणजे पोकळी. मठाकाश, पटाकाश, म्हणजे मठपटादि वस्तूंनीं व्यापल्या-मुळें मर्यादित व निराळा भासणारा पोकळीचा भाग. चिदाकाश म्हणजे कोणत्याही जडवस्तूनें मर्यादित न झालेली असीम व सर्वव्यापी पोकळी. **कुहरीं**, गुहेंत. **प्रत्याहार**, शब्दादि जड विषयांपासून इंद्रियांना आवरून घेणें, इंद्रियनिरोध. **चिदाकार**, ज्ञानस्वरूप झालेलें, भगवद्रूप बनलेलें.

४२ **चिदाकारा** इ०-"विश्वाकार माझें मन। त्याहीपुढें चैतन्यघन। तें तों आपण हें अनुसंधान। हृदयीं असावें. ॥" ६४. निगमसार, अ. ७.

**उन्मनी**, परमात्मतत्त्वांत मनाचा लय ज्या स्थितींत होतो ती स्थिति. **चिदाकारें** इ०, मी भगवद्रूप आहें इतकीच ज्ञानाची मजल जाऊन जो मनोवृत्तीचा निरोध घडेल, त्या निरोधानें या मर्यादेपर्यंतचाच योग साधेल. परंतु यापुढें पाऊल पडून चिन्मय होऊन उन्मनी अवस्थेला जाणें घडावयाचें नाहीं. हें घडण्याला आणखी कमावणी झाली पाहिजे.

४३ '**असें**' ऐवजीं '**असे.**' ज्या स्थितींत निर्गुण ब्रह्माशीं तन्मयत्व झाल्यामुळें व कांहीं ज्ञेयच न राहिल्यामुळें ज्ञानशक्तीचें ज्ञातृत्वच नाहींसें होतें, ती स्थिति निर्गुणपणांत सहजच येते. परंतु सगुणोपासनेनें ईश्वराशीं ऐक्य होऊन अक्षय आनंदाचाही अनुभव घडतो. परमात्मा व जीवात्मा यांचा एकभाव निर्गुणांत स्वाभाविकच आहे; परंतु सगुणांतच जेव्हां असा एकभाव उत्पन्न होईल, तेव्हांच खरेंखरें ईश्वरज्ञान झालें असें समजावें.

४४ **मनीं रेखिले**, मनांत ठसलेले, निरंतर स्मरणांत असलेले.

४६ **गदांबुज**, गदा व कमळ. **अंबुदसांवळा**, मेघनीळ, घनश्याम. **तडिदंबर**, विजेसारखें शोभणारें पिवळें वस्त्र. **मेखळा**, कंबरपट्टा. **सतत षोडशवार्षिक**, नेहमींच सोळा वर्षांचा; निरंतर तरुण.

४७ **जलज**, कमळ. **रथांग**, चक्र. **हरिपार्षदशेखरीं**, विष्णुलोकांत विष्णुसमीप राहणाऱ्या भक्तश्रेष्ठांत.

---

## अध्याय २, चरण ४.

**सारांश.**-"अजामिळाला ज्या वैकुंठलोकीं प्रभूनें नेलें, तें वैकुंठ अनादि आहे. कालचक्राचा त्याला उपसर्ग होत नाहीं. त्या वैकुंठास जो गेला, तो तेथून कधींच च्यवत नाहीं. तो तेथेंच अनादि काल विष्णुरूप होऊन राहतो. परमेश्वर जेव्हां प्रलयकालीं योगनिद्रामग्न होतो, त्या वेळीं वैकुंठवासी भक्तजनही त्याच्यामध्येंच लीन होऊन राहतात. योगनिद्रा संपली म्हणजे सब प्रकार पूर्ववतच होतो, म्हणून हें वैकुंठपीठ अढळच ठरतें." इत्यादि

विषयाचा ऊहापोह करून पुन्हां एकदा हरिनाममाहात्म्याचें वर्णन करून कवीनें हा चरण बोलविला आहे, व अखेर फलश्रुति सांगितली आहे.

१ **जेथेंचि श्रीपति,** येथें ' श्री ' या संयुक्त व्यंजनानें मागील 'ची' स गुरुत्व येऊन छंदोभंग झाला आहे. **च्यवती,** ढळती. **विभागीं,** लोकीं, प्रदेशीं. **नामयोगीं,** नामोच्चाराच्या योग साधून.

२ **द्विजाती,** अजामिळ ब्राह्मण.

३ **जयविजय,** हे दोघे विष्णूचे द्वारपाल. सनत्कुमार एकदा प्रभुदर्शनास आले असतांना यांनीं त्यांस अटकाव केला. तेव्हां सनत्कुमारांनीं यांना शाप दिला व हे वैकुंठाहून भ्रष्ट होऊन असुरयोनींत जन्मले. **गतभवतमशेषें,** पूर्वार्जित तामस कर्म शिल्लक राहिल्यामुळें. **विप्र,** सनत्कुमार. **गज जलचर,** गजेंद्र नांवाचा हत्ती व त्यास पकडणारा नक्र. **ते न भक्तिप्रतापें,** ती त्यांनीं भगवद्भक्ति करून मिळविली नव्हती. या दोन्ही भावांनीं केवळ पुण्यकर्मांनीं वैकुंठवास मिळविला होता. परंतु भक्तिप्राप्य परमगति त्यांस लाभली नव्हती.

४ **तमें,** तामसी वृत्तीनें. **सनक,** मागें १।१।३ टीपा पहा.

३-५ जयविजयांना तप, यज्ञ, तीर्थवास, इत्यादि पुण्य कृत्यांनीं वैकुंठवास घडला होता. परंतु खऱ्या भगवद्भक्तीनें त्यांचें मन सत्त्वशुद्ध झालें नव्हतें. त्यांत अजून तामसादि अंश शिल्लक होताच. म्हणून त्यांना अक्षय्य पद न मिळतां, जेथून अधःपात होऊं शकतो अशाच वैकुंठप्रदेशांत त्यास वास मिळाला होता. " विनाज्ञान जे भक्त वैकुंठवासी, अमुक्त स्थळीं चिंतिलें त्या जिवासीं । तयांमाजिही द्वारपाळद्वयातें स्वयें जन्म द्यावें गमे अद्वयातें ॥ " नृहरिदर्पण, श्लोक ९-१४ पहा.

८ **द्विजवर,** अजामिळ. **परिहरुनि,** नाशून.

९ दुर्गा व भू या वैकुंठविभागांतून अधःपतन होऊं शकतें.

१० सरूपता, समीपता, सलोकता, व सायुज्यता हे मुक्तींचे चार प्रकार आहेत. पैकीं पहिल्या तीन मुक्ति तर अजामिळास लाभल्याच, कारण तो विष्णुस्वरूप होऊन प्रभूजवळ वैकुंठलोकीं वास मिळविता झाला. परंतु कांहीं लोकांना या तीन्ही मुक्ति कमी प्रतीच्या वाटतात. ते म्हणतात कीं,

" जींत कैवल्य ( सायुज्यता ) म्हणजे परमात्म्यांत लय पावण्याची स्थिति नाहीं ती मुक्ति कसली !" असे लोक केवळ निर्गुणाभिमानी होत. त्यांना सगुणभक्ति मान्य नाहीं. परंतु या निर्गुणोपासनेंत त्यांना अत्यंत क्लेश मात्र होतात. त्यांनीं आपलें मन जर सगुणभजनाकडे लाविलें, तर समुद्रांतील जलबिंदूप्रमाणें निर्गुणांत गडप झालेले हे ज्ञानी लोक सागरास वाहत येऊन मिळणाऱ्या गंगेप्रमाणें भक्तिसुख भोगीतच परमात्म्याशीं मिळून जातील.

१२ **स्वयें मुक्ति** इ०, मुक्ति स्वतःच त्याला शोधीत येते. **मुमुक्षूसही** इ०, कारण मुमुक्षुसुद्धां सकामच असतात; मोक्षाविषयीं त्यांना उत्कट वासना असते, तेव्हां ते पूर्णकाम नव्हत. परंतु भक्तांची गोष्ट अशी नाहीं. प्रभुनामसंकीर्तनांत त्यांना मुक्तीसकट सर्व कांहीं पूर्वींच लाभलेलें असतें. त्यांच्या वासनांचा पूर्ण क्षय होऊन ते केवळ निरिच्छ झालेले असतात.

१४ **अंबुजाक्ष**, कमलनयन हरि. **स्वभक्तां** इ०, हरिभक्तांना चारी मुक्तिप्रकार केवळ उपेक्षणीय वस्तु वाटतात; तरी पण ते मागत नसतांही परमेश्वर त्यांना त्या मुक्ति व भक्ति, आपण होऊनच देतो. **स्वपक्ष**, आपले अनुयायी, आपले एकनिष्ठ भक्त.

१५ **हरी देतसे**, देव त्यांना मुक्ति देऊन, त्या मुक्त स्थितींतही सगुण-भक्ति कायमच राखतो; कारण ते जीवन्मुक्त स्थितींत असल्यामुळें त्यांस जशी देहबुद्धि बाधत नसते, तसाच हा देहच मोक्षस्वरूप आहे असें त्यांच्या अनुभवास आलेलें असतें या देहांतच त्यांना चारी मुक्ति लाभतात.

१६ निर्गुणोपासक प्रत्यक्ष अमृतच होतात, अर्थात् अमृताला स्वतःची गोडी घेतां येणें शक्यच नाहीं; परंतु सगुणभक्ताची कशी मजा आहे, पहा ! ते अमृतस्वरूप होऊनही भक्तीच्या जिभेनें त्या अमृताचा स्वादही घेऊं शकतात.

१७ 'कलें' ऐवजीं 'केलें.' उत्तरार्ध.–ते शापादिकांच्या लवलव करणाऱ्या आगीच्या लोटांनीं जळत नाहींत; कालान्तरानें या आगींत ब्रह्मदेवादिकांच्या लगडया आटतील, परंतु हरिदासांना यत्किंचितही विकार होणार नाहीं. **लल लोळ**, लल्लल् करणारे लोट, लवलवणारे झोत. **जाळ**, डोंबाळ.

१८ **विकुंठा** ही रैवत मन्वन्तरांतील शुभ्राची पत्नी. हिच्या पोटीं विष्णूचा वैकुंठावतार झाला. या अवतारांतच विष्णूनें वैकुंठलोक निर्माण केला. प्रस्तुत

ठिकाणीं अशी शंका घेतली आहे कीं, "वैकुंठावतारांत उत्पन्न केलेला वैकुंठ-लोकच जर प्रलयकालीं नष्ट होईल, तर तेथील सगुणभक्तांचा मोक्ष अक्षय्य कसा? तो सान्त असलाच पाहिजे." या शंकेचें निरसन १९–२७ श्लोकांत केलें आहे. **'कैस'** ऐवजीं **'कैसे.'** **बरें नेणतां,** खरें तत्त्व न समजल्यामुळें.

१९ **तसी लोकाकारें** इ०, हरीच्या मानव अवताराप्रमाणेंच देहादि जड वस्तुमात्रांच्या योगानें वैकुंठलोकाची उभारणी झालेली आहे. **तनु-करुनि,** देहामुळें.

२० **योगनिद्रा,** चैतन्याची आत्मनिष्ठ स्थिति. या स्थितींत सर्व विश्व परमात्म्यांत अन्तर्धान पावतें. या वेळीं प्रकृतिमाया लुप्त होते. परंतु चैतन्यघनाची योगनिद्रा चाळविली म्हणजे प्रकृतीचें स्फुरण होऊन पूर्वक्रमा-प्रमाणें विश्वोत्पत्ति होते.

२१ सृष्टि उत्पन्न करण्याच्या पूर्वींच प्रभूनें ब्रह्मदेवाला सृष्टि उत्पन्न कर-ण्याचें कसब शिकविण्यासाठीं भविष्यमाण सृष्टि सूक्ष्म प्रमाणांत दाखविली; या सूक्ष्म देखाव्यांत वैकुंठलोकही दाखविला होता. मग विकुंठासुतानें तो नवीनच निर्माण केला असें कसें म्हणावें ?

२३ प्रलयकालीं निजणाऱ्या व सृष्टिकालीं अवतारकृत्यें करणाऱ्या पर-मेश्वराचें अनादित्व जर नष्ट होत नाहीं, तर वैकुंठलोकाचेंही अनादित्व भंगू शकत नाहीं. **भागे,** भंगे, नाश पावते. **सादित्व,** स + आदि + त्व, ज्या स्थितींत आरंभ आहे ती. आरंभाची कल्पना आली, कीं नाशाची कल्पना अचूक पाठीशीं जडलीच. तेव्हां वैकुंठ 'सादि' म्हणणें म्हणजे त्याला 'नश्वर' म्हणण्यासारखेंच आहे.

२४ **षड्गुण ऐश्वर्य,** यालाच 'भग' ही संज्ञा आहे. भगवान् म्हणजे षड्गुणैश्वर्यसंपन्न परमात्मा. "ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः। ज्ञानविज्ञानयोश्चैव षण्णां भग इतीर्यते ॥" **ईश्वरत्व,** ऐश्वर्य. **नाहीं षड्गुण,** इ०, योगनिद्रा करणाऱ्या परमात्म्याला ऐश्वर्य नसतें असें जर तुम्ही म्हणत असाल, तर तुम्हांला वैकुंठावरच काय, परंतु त्या योगनिद्रामग्न परमेश्वरावरही काळाचा वरंवटा फिरत असतो असें म्हणतां येईल !

२६ **द्रष्टा**, सर्वसाक्षी आत्मा, परमात्मा. **द्रष्ट्यावांचुनि** इ०, रज्जु ( दोर ) ही वस्तु दिसते व या सत्यवस्तूवर सर्पाचा आभास होतो, पण केव्हां ? तर पाहणारा असेल तेव्हां. पाहणाराच नसेल, तर दोर नाहीं व सापही नाहीं. म्हणून रज्जु व सर्प हीं दोन्ही द्रष्टाच आहेत असें फलित होतें. **कंठरूप**, परमेश्वराचें सगुण स्वरूप. शब्दापासून आकाश, त्यापासून स्पर्श, त्यापासून वायु, इत्यादि एक सृष्टिक्रम सांगितला आहे. तेव्हां सर्व साकार शब्दरूप ठरतें. शब्द कंठांतून निघतो, म्हणून साकार शब्दरूपाला ' कंठरूप ' म्हटलें आहे. **मायामात्रचि** इ०, माया ही निराळी नाहींच. सर्व मायिक हें परमेश्वराचेंच साकार स्वरूप आहे, असें समजलें म्हणजे या विद्येला ठिकाणच राहात नाहीं.

२७ हारांत भासणारा साप साप नव्हे, तर हारच आहे. त्याप्रमाणें माया ही माया नसून देही (म्हणजे देहाचा स्वामी आत्मा)च आहे. या सिद्धान्तानुसार परमेश्वराच्या सगुणस्वरूपांत निर्दोष माया राहते.या मायेला निर्दोष म्हणण्याचें कारण तींत अज्ञानाचा अंश नसून, परमात्म्याचें पूर्ण ज्ञानच विलसत आहे.

२८ **भागवती गती**, खऱ्या विष्णुभक्तास मिळणारी परम गति. **द्वैपायनपुत्र**, व्यासपुत्र, शुक.

२९ **अनादि रचला बंध**, मागें २।३।२७ टीपा पहा.

३० मोक्षापेक्षक, मोक्षदायक. **तयांवेगळें**, रजतमापासून मुक्त झालेलें.

३१ **भरतान्वयनंदन**, भरत+अन्वय+नंदन, भरतकुळाला आनंद-विणारा परिक्षित्.

३२ **'गंगाम्यु'** एवजीं **'गंगाम्बु.' गंगाम्बु** इ., अशा रीतीनें हें सर्व पाप हरण करणें. नामरूपी गंगाजल अंतःकरणांत तुडुंब भरलें म्हणजे मग गंगादि पावनतीर्थें त्याला अधिक तें काय देणार ? **तीर्थपदानुकीर्तन**, गंगादि तीर्थें ज्याच्या चरणांत आहेत अशा परमेशाचें वर्णन. **पदें**, शब्दानें.

३३ **तीर्थाङ्घ्रि**, तीर्थ आहे चरणीं ज्याच्या असा, तीर्थपद, विष्णु.

३४ **मंदाकिनी**, गंगा.

३५ **अंगअंगा**, अंगोंअंगीं, प्रत्येक अंगांत, दरेक अवयवांत. **विहंगासननखशिख**, गरुडवाहन विष्णूच्या नखापासून मस्तकापर्यंत. विहंग= पक्षी, गरुड. आसन=बसण्याचें साधन, वाहन. शिखा=शेंडी. **पापभंगा**,

पाप भंगणारी, पापनाशक. **हस्तीही** इ०, हत्तींना सुद्धां गंगेच्या लाटा धुतात, परंतु तें धुणें झाल्यावर जसे ते हत्ती पुन्हां तीरावर येऊन आपलें सर्वांग धुळींत मळवून घेतात, त्याप्रमाणेंच गंगेंत स्नान करणारे पापी जन पापमुक्त होतात, परंतु त्यांचें वासनांच्या तावडींत सांपडलेलें मन दिव्यावर झेंपावणाऱ्या पतंगासारखें विषयांना इष्ट मानून त्यांभोवतीं घोंटाळतच राहतें. अन्वय--तत्तरंगा हस्तीही धुती, ( परंतु ) चित्ता पतंगा विषयदिवा इष्ट ( असतोच ). मागें १।२।६-७ पहा.

३८ **पूर्वींच**, मागें २।१।३०-४९ पहा.

३९ **स्नपन**, स्नान.

४० पूर्वार्धः--तीर्थें, तपें, व्रतें करूनही, जेव्हां आणखी हरिचरिताचें श्रवण-कीर्तन करावें तेव्हांच परमगति प्राप्त होते, एरवीं नाहीं.

४१ **अजरामरता**, जराहीन व मृत्युहीन स्थिति. **इतरें**, दुसरीं फळें, अन्नें, इत्यादि.

४२ **रति**, प्रेम, गोडी. **विरक्तीच्या** इ०, नामसंकीर्तनांत रममाण होऊन वैराग्यस्थितींत टिकले. 'तीथ' ऐवजीं '**तीर्थ**.' **विषयभूमीं उतरले**, विषयाच्या प्रदेशास आले, विषयासक्त झाले. **सुखेंही** इ०, पुण्यकर्मांनीं स्वर्ग संपादणारेसुद्धां स्वर्गलोकीं सुखाच्या लालचीनं विषयांच्या विखारी भपक्यांत गुरफटले.

४३ **तीर्थपद**, विष्णु. **निवर्तनें** ( नपुं. नाम, अनेकवचन ), परतणें, पराङ्मुख होणें. **प्रवर्तनें**, ( नपुं. ना. अ. व. ) प्रवृत्ति, कल.

४४ **उत्तर अर्ध**, दुसरें श्लोकार्ध, " न यत्पुनः कर्मसु सज्जते मनो रजस्तमोभ्यां कलिलं ततोऽन्यथा। " भागवत, ६।२।४६.

४५ **गुणरत्न**, गुणकारी हिरे, वगैरे. हिरे, माणकें, पोवळीं, इत्यादि रत्नांत वैद्यांच्या व ज्योतिष्यांच्या मतें रोग व ग्रहपीडा निवारण्याचें सामर्थ्य असतें.

४६ '**अमृतसिंधुतरंग**' असा एक समास.

४७ मागें २।२।६ व टीप पहा.

४८ **मिळे**, **मिसळे**.

४९ **असंग**, सर्व संगांना विटून विरक्त झालेला.

५२ '**श्रवणवर्णनें**' असें पाहिजे. **अनुष्ठवे**, आचरणांत आणितां येईल"

५३ **रुचिनिमित्तें**, लोकांना रुचि लागावी म्हणून, लोकांत आवड उत्पन्न करण्यासाठीं. **तथ्य**, खरें खरें.

५४ **धर्मः प्रोज्झितकैतवोत्र**, या भागवत ग्रंथांत उपदेशिलेला धर्म अगदीं निष्कपट खरा आहे. **नाणें खरें तोलणें**, नाणें नुसत्या नजरेनें पाहून नव्हे, तर तें प्रत्यक्ष काटयांत घालून त्याच्या खरेपणाची परीक्षा करणें.

५६ **हा लोक**, वैकुंठलोक.

५७ **श्रद्धा** इ०, निष्ठावंतपणानें उच्चारलेल्या भगवन्नामाचा जो महिमा वर्णितात तो खरा आहे असा निश्चल विश्वास म्हणजेच श्रद्धा. **स्वचरणें**, आपल्या पायीं, आपण होऊन, आपसूक.

५९ मूळ श्लोक--म्रियमाणो हरेर्नाम गृहृणन् पुत्रोपचारितम् । अजामिलोऽप्यगाद् धाम किं पुनः श्रद्धया गृणन् ।। भागवत, ६।२।४९.

**पुत्रोपचारें**, मुलाच्या निमित्तानें. **लोकप्रचारें**, लोकरीतीस अनुसरून. '**भक्तिभावें**' असा समास पाहिजे.

६१ **अनुष्ठिल**, आचरणांत आणील. **तदनु**, शुकाचार्यांच्या भावार्थाला धरून.

६२ **निर्धार**, निश्चय, सिद्धान्त, निर्णय. **रचिली**, रचलेली.

---

## अध्याय ३, चरण १.

**सारांश**—यमदूत यमाकडे गेल्यावर त्यांनीं त्याला घडलेला सर्व वृतांत निवेदन केला, आणि " पापाचरण करणारा अजामिळ शुद्ध कसा व त्यास सोडवणारे ते कोण ? यमधर्माचें शासन अलंघ्य म्हणतात तें खोटें काय ? तसें नसेल, तर मग तुमच्या आज्ञा हाणून पाडण्याचा या चौघांना कसा अधिकार पोंचतो ? " इत्यादि प्रश्न विचारिले. तेव्हां यमानें त्यांना उत्तर केलें कीं, " चराचराचा स्वामी विष्णु आहे व त्याच्यापासूनच मला अधिकार मिळाला आहे, अर्थात् विशेष प्रसंगीं माझ्या अधिकाराचें नियमन

करण्याची त्याला सत्ता आहेच. जो हरिनामोच्चार करितो त्याचें पूर्व पाप नाहींसें होतें व त्यावर माझा अधिकार चालूं नये, असा त्या परमात्म्याचा नियम आहे. याला अनुसरूनच प्रस्तुत प्रसंग घडला आहे." असें सांगून यमानें हरिनामाचा प्रताप सविस्तर वर्णन केला आहे.

३ **दंडभंग**, यमराजाच्या अधिकाराचा उपमर्द.

४ **मिसें**, निमित्तानें, प्रसंगानें.

५ **सूर्यसुत**, यम. **संयमनी**, यमाची राजधानी.

७ **दृढ**, कठोर, खोंचदार. **शासनकार**, जीवलोकांचे शास्ते, जीवांवर अधिकार चालविणारे.

८ **उदंड दंड करिती**, पुष्कळजण अधिकार चालवितात. **नियमभंग**, बेबंदशाही, सांवळागोंधळ.

९ **प्रभुपणें** इ०, सगळेच सारखे अधिकारी झाले म्हणजे सगळेच एकमेकांच्या अधिकारांत हात घालून गोंधळ माजवतील व कोणाचाही अधिकार अचूक चालणार नाहीं; व ते सर्व केवळ नांवाचेच अधिकारी राहतील. **मंडळनाथनृप**, चक्रवर्ती राजे, मांडलिक राजांवर सत्ता चालविणारे सम्राट्, बादशहा.

१३ **झणीं भिसी**, भिऊं नकोस. **ध्वनि दीर्घबोली**, लांब व मोठ्या स्वरानें उच्चारलेला आवाज.

१७ माझ्याहून श्रेष्ठ व वरिष्ठ असा एक प्रभु आहे, ज्याचें चैतन्यस्वरूप या स्थावरजंगमास आत्मभावानें भरून आहे. जसे धागे वस्त्रांना भरून असतात म्हणजे वस्त्रें तन्तुमय असतात, त्याप्रमाणेंच हें सर्व स्थावरजंगमात्मक विश्व प्रभुमय आहे. उत्पत्ति, उपजीवन ( संरक्षण ), व नाश, या क्रियाही तोच आपल्या अंशमात्रांकडून घडवितो.

२० हें जर खरें सत्य आहे, तर त्या देवाला सोडून सुज्ञलोकही शास्त्रादिकांना अनुल्लंघ्य मानून त्यांच्या नादीं कां लागतात ? **परधर्म**, वैष्णवधर्माहून इतर धर्म.

२१ मनुष्यें माणुसकी सोडून दोन पायांच्या पशूंप्रमाणें वागूं लागलीं. तीं दुष्ट वासनांच्या रानांत सैरावैरां बोकळून गोंधळ घालूं लागलीं. तेव्हां त्यांना

आवरून व शिस्त लावून त्यांचें कल्याण करावें, या उद्देशानें परमेश्वरानें वेदरूप दावें त्यांच्या गळ्यांत अडकविलें आहे.

२२ **गळबंधन,** गळदोऱ्या, गळ्याला बांधण्याच्या रशा. देवता याच अनेक गळदोऱ्या. यांपैकीं कोणत्याही देवाच्या भजनीं कोणी लागला, तरी ती गळदोरी गळ्याला बसतेच व तो वेदरूपी दाव्यानें बांधला जातो.

२३ **थारा,** दावणींतली आपली जागा.

२५ **यजी,** यज्ञ करितो. **अस्मदादिक नांवें,** यम, इंद्र, इत्यादि आम्हां देवतांचीं नांवें. ( येथें वक्ता यम स्वतःच आहे, हे लक्षांत घ्यावें ).

२६ आम्हांला ज्या आहुति, पूजा, वगैरे अर्पण करण्यांत येतात, त्या सर्व आम्ही परमात्म्याजवळ नेऊन पोंचत्या करितों. दावणींतल्या गुरांप्रमाणें बद्ध झालेल्या जीवांना आम्ही उपास्य ( उपासनायोग्य ) वाटतों. परंतु आम्हीही बद्धच आहों, व खरा उपास्य तो परमात्माच होय.

२८ यमाला 'सर्वोत्तमतात' ( श्रेष्ठांतील श्रेष्ठ ) असें संबोधून रागावलेले त्याचे दूत जें जरासें खोंचून बोलले होते, त्याला यमानें, आपल्या मनांत सर्वेश्वराचा अधिकार ओळखून, याप्रमाणें उत्तर दिलें.

---

## अध्याय ३, चरण २.

**सारांशः**—यमधर्म पुढें म्हणतो, " ज्या चौघाजणांनीं अजामिळास तुमच्या पाशांतून सोडविलें, ते विष्णुदूत असले पाहिजेत. हे हरिस्वरूपी हरिदूत गुप्तपणें संचार करून हरिदासांचें रक्षण करीत असतात. भागवतधर्माचें गहन तत्त्व हें आहे कीं, परमात्म्याचें पूर्णज्ञान होऊन, विश्व हें विश्व नसून परमात्माच आहे असा साक्षात्कार घडला पाहिजे व या सर्वात्मबुद्धीनेंच सगुणभक्ति झाली पाहिजे. निर्गुणोपासनेंत ही गोडी नाहीं, व ज्ञानहीन भेदात्मक सगुणोपासनेंत तथ्य नाहीं. "

१ **तयाचेच,** त्याच विष्णूचे.

२ **संयमाला,** अधिकाराला, शासनाला.

४ **दिशाधिराज,** दिक्पाल. हे इंद्रयमवरुणादि आठ आहेत. **तदिच्छित,** सगुण परमात्म्याची इच्छा—हेतु.

६ **शुद्धें मनें** इ०, परंतु मन शुद्धसत्त्व झालें तर परमेश्वराचें खरें स्वरूप प्रत्ययाला येतें, आणि असें झाल्यावर दिव्यावर झेंप घालणाऱ्या पतंगाप्रमाणें मन परमात्म्याच्या चैतन्यस्वरूपांत झेंप घालून रममाण होतें.

१० **भगवदीक्षण** इ०, ते केवळ भगवंताच्या कृपादृष्टीची निरंतर इच्छा करीत असतात.

११ **नरकान्तक**, नरकासुरास मारणारा कृष्ण परमात्मा.

१२ **तयां**, यमदूतांना. यमदूतांना अशी शंका उद्भवली कीं, "आह्मांला जर सर्व धर्माचें ज्ञान आहे, तर हा नामप्रतापच तेवढा आह्मांला आजपर्यंत अज्ञात कसा राहिला ?"

१४ **कुमार**, सनत्कुमार. **वैदेहि**, जनक. **स्वयंभुसुतमनु**, स्वायंभव मनु. **मी स्वयें**, यम. **वैष्णवधर्म**, भागवत धर्म, सर्वकर्मसमर्पणपूर्वक ज्ञानयुक्त सगुणोपासनेचा योग.

१६ **विज्ञान**, परमेशाच्या अभेद स्वरूपाचें ज्ञान. आत्मा व अनात्मा यांना वेगळें वेगळें निवडणें हें ज्ञान; परंतु अनात्मवस्तु ही स्वतंत्र नसून तें आत्मस्वरूपच आहे, हें विज्ञान. विज्ञानाच्या योगानें मायाच विष्णुस्वरूप होते, प्रकृतीच पुरुष होते.

१८ **परि जयास्तव** इ०, परंतु ज्या कारणें तो त्यांना प्रिय वाटतो, तें ते पाहत नाहींत. हरि सुख देतो, म्हणून तो त्यांना प्रिय वाटतो. म्हणजे त्यांचें खरें प्रेम हरीच्या ठिकाणीं नसून, त्याच्यापासून मिळणाऱ्या सुखाच्या ठिकाणीं असतें. ते हरिभक्त नव्हत, तर सुखभक्त होत. **तयीं**, तेव्हां.

२० **मुक्तिनिमित्तक**, मुक्तीच्या निमित्तानें, मोक्षाच्या हेतूनें.

२१ **किमर्थ उपास्य**, कोणत्या कारणानें उपासनापात्र होतो, कां म्हणून उपासावा. **वर्तती**, वागतात, क्रिया करतात.

**शास्त्रविशारद**, शास्त्रपारंगत, शास्त्रवेत्ते. " प्रयोजनमनुद्दिश्य न मंदोऽपि प्रवर्तते ।" असें संस्कृतांत प्रसिद्ध वचन आहे.

२२ **देही**, देहधारी जीव, मनुष्य.

२६ **हरिहुनी** इ०, आपली आपणा स्वतःविषयींची आवड जर हरीपेक्षांही जास्त प्रिय असेल, तर वेदमान्य अशी खरीखरी निष्काम व निर्हेतुक भक्ति घडणार तरी कशी ?

२७ **निगमीं**, वेदामध्यें, बृहदारण्यकांतील मैत्रेयीयाज्ञवल्क्यसंवादांत. मैत्रेयी ही याज्ञवल्क्यऋषीची पत्नी असून फार ब्रह्मनिष्ठ होती.

२८ या जगांतील सर्व सुखें व वेदांनीं सांगितलेल्या पुण्यकर्मांनीं लाभणारीं स्वर्गवासादि सुखें ज्या आपल्याकरितां प्रिय वाटतात, आणि जो आपलेपणानें स्फुरणारा जीवात्मा आपल्यास अत्यंत प्रिय असतो, आणि ज्या जीवात्म्यावर आपलें असें निर्हेतुक प्रेम असतें, किंबहुना ज्याच्या सुखाकरितांच आपण हरिसेवा करितों, तो आपला जीवात्मा म्हणजेच परमात्मा हरि, असें ज्ञान मनांत ठसेल, तरच खरी भगवद्भक्ति घडेल.

२९ कोणीएक परमात्म्याचें विश्वव्यापी स्वरूप जाणतात, परंतु त्यांस सगुणोपासना घडत नाहीं; कोणी दुसरे निष्ठावन्त सगुणोपासक असतात, परंतु आपला प्रिय आत्मा म्हणजेच श्रीहरि हें रहस्यज्ञान त्यांस नसतें. एवंच पहिल्यांची निर्गुणोपासना व दुसऱ्यांची ज्ञानहीन सगुणोपासना, या दोन्ही सद्भक्तीच्या पायरीस येत नाहींत.

३० **इतर मानुनियां**, भेदबुद्धीनें, परमात्मा माझ्याहून वेगळा आहे अशा समजुतीनें.

३२ **स्वचिदात्मता**, आपलें परमात्मस्वरूप, ‘ अहं ब्रह्मास्मि ।’ हें तत्त्व. **तदुपरान्तिक**, तदनंतर. **उभयभक्ति**, देवभक्ति व गुरुभक्ति.

३३ मूळ–यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ । तस्य ते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः ॥ **स्फुट**, स्पष्ट, उघड. **व्याकरिजेल**, स्पष्ट केलें जाईल.

३५ **उपाधि**, जीवात्मा व परमात्मा ईश्वर यांच्या स्वाभाविक एकत्वांत–एकात्मतेंत–भेद उत्पन्न करणारा प्रकृतिमायेचा उपाधि; जीव व शीव यांमध्यें भेदभाव उत्पन्न करणारी माया. **चित्तलहरी** इ०, पाण्याची लाट जशी समुद्रजळांत शांत होऊन तद्रूपत्वानें राहते, त्याप्रमाणेंच जीवात्मा परमात्म्यांत समरस होऊन राहतो.

३६ **चैतन्यांश** इ०, वस्त्र जसें तन्तुरूप तसेंच जड परमात्मरूप आहे असें तो तेव्हां जाणतो. **परिपाक**, पक्वदशा, पूर्णता.

३७ **निजिच्या निजीं**, आपल्या स्वतःच्या जीवात्म्याविषयीं.

४० **अनुभवीं** इ०-ते श्रुतीचे अर्थ प्रत्यक्ष प्रत्ययाला येऊन त्या भक्ताला धन्यत्व देतात.

४२ उत्तरार्ध.-**धर्म**, यमधर्म. या कारणास्तव यमधर्म त्या दूतांस म्हणतो कीं, हा 'भागवत धर्म फार गूढ, गहनतत्त्वमय, आहे.' मागें श्लोक १५ पहा.

४५ "तन्नामग्रहणादिभिः" असा भक्तियोग साधण्याचा उपाय सांगितला आहे.

४६ उत्तरार्ध-परंतु अशा प्रकारचें भजनप्रेम जडलें म्हणजे या हरिनामगुणश्रवणानें पापकृत्याविषयींची आवड राहातच नाहीं, आणि म्हणूनच हरिनाम हें सर्वोत्कृष्ट साधन म्हटलें आहे.

५० **निदर्शन**, दृष्टान्त, दाखला, उदाहरण.

५२ **तन्नामक**, त्या नांवाचा. हरीचें नाम धारण करणाऱ्या एकाद्या मनुष्याला उद्देशून मुखीं नाम आलें, तरी असें नामग्रहणसुद्धां हरिनामकीर्तनच होतें; मात्र, हरीच्या उद्देशानें हें नाम नसल्यामुळें, हा नामोच्चार ज्ञानहीन होय.

५३ **स्नेहाब्धि** इ०-त्याचे पोटांत प्रेमाचा अत्यंत उमाळा आला, प्रेमाचें भरतें येऊन तो सद्गदित झाला.

५५ **सिका**, शिका, प्राप्त करून घ्या.

५६ **पीयूषरूपें वचनें**, अमृतासारखे गोड शब्द. **निजकर्णपात्रें**, आपले कान हींच पात्रें त्यांनीं, कानाचे पेले करून.

५८ **अग्निकणें**, आगीच्या एका ठिणगीनें. **प्रबळानळ**, डोंब आग. **कां परी**, कशाकरितां, कां म्हणून.

५९ **तें नाम जाणोनियां**, असा नामोच्चार ज्ञानयुक्त नामग्रहण होतो.

६० **आक्रोशतां**, आळवितां, हांक मारतां.

६१ **क्षुत्तृषादैन्य**, भूकताहनेची पीडा.

६२ झाडावर जीं फळें येतात, त्यांचें पूर्वचिह्न फूल होय. त्याप्रमाणेंच नामापासून अखेर प्राप्त होणाऱ्या सरूपतादि चार मुक्तींचें पूर्व चिह्न पापहरण हें होय. अहो, जें लष्कर त्रिभुवन काबीज करणार आहे, त्याच्या पायानें वाटेवरचीं गवतें आधींच तुडवून चुरडलीं जातात, यांत नवल काय?

---

## अध्याय, ३ चरण ३.

**सारांश**—वैदिक कर्मे सकाम असतात व त्यांचें फळ नश्वर असतें. चित्त-शुद्धि हाच या कर्मांचा वास्तविक हेतु आहे. परंतु हा हेतु बाजूस राहून स्वर्गादि पदांचा लाभ व्हावा म्हणूनच हीं कर्मे बहुशः आचरलीं जातात. त्यामुळें अक्षय्य परमगतीला हीं कर्मे नेऊं शकत नाहींत. पूर्णवैराग्य-युक्त सज्ञान भक्तीचा उपदेश श्रुतीही करितात, परंतु सुखाच्या मोहानें अंध झालेल्या वैदिकांना तो दिसत नाहीं. एकंदरींत अक्षय्य पद लाभण्यास निःस्पृह व ज्ञानयुक्त सगुणभक्तीवांचून अन्य मार्ग नाहीं.

४ **मुनिहो**, अहो शौनकादिक मुनी ! ( ही पुराण सांगणाऱ्या सूताची शौनकादिक ऋषींना उद्देशून उक्ति आहे. सर्व पुराणें प्रथमतः व्यासांनीं सांगितलीं, व नंतर त्यांचा प्रसार व्यासशिष्यादिकांनीं केला. या पुराणप्रसारक मंडळांत सूताचा प्रामुख्यानें अंतर्भाव होतो. ) **निगमागमें**, वेदशास्त्रांनीं. **कर्मठ**, कर्मनिष्ठ, कर्मकांडी, कर्मच एक मोक्षसाधन आहे असें मानणारा.

५ **काम्यकर्म**, कांहीं तरीं इच्छा तृप्त करून घेण्यासाठीं केलेलें.

६ **मखादिक**, यज्ञ वगैरे.

७ **मृगजळ**, मायेचा खोटा भ्रम.

८ वेदांनीं यज्ञकर्म करण्याची आज्ञा केली आहे, तिचा हेतु असा आहे:—यज्ञादि पुण्यकर्मांनीं चित्तशुद्धि होईल, त्यानंतर सत्यज्ञान प्राप्त होऊन मोक्ष हातीं लागेल. परंतु चित्तशुद्धीचा मूळ हेतु बाजूस राहून, बहुतेक सर्व कर्मठ स्वर्गादिकांची इच्छा मनांत धरून यज्ञक्रिया करितात. अर्थात् हीं कर्मे त्यांच्या त्या मायिक इच्छाच तृप्त करितात, परंतु ज्ञानाच्या मार्गानें मुक्तस्थितीला त्यांना नेत नाहींत, हें साहजिकच आहे.

९ **विचित्रें**, नाना प्रकारचीं. फुलांचाच विध्वंस केला, मग फळ कोठून मिळणार? तसेंच सर्व पुण्यकर्मे स्वर्गादि सुखांतच खर्ची घातलीं, तर मग मन शुद्धसत्त्व करून मोक्षफळ कोण देणार ?

१० **सुमन**, फूल. **उपेक्षा करितो**, इच्छा करीत नाहींत.

१२ उत्तरार्ध.—हे कर्मठ देवांचा सहवास व प्रत्यक्ष इंद्राच्या अमरावतींतही रहिवास लाभले, तरी अखेर अमरांना व अमरावतीला सोडून दुःखच भोगतात.

१३ पूर्वार्ध.–जसें एखादें घोडें कांहीं मुदतीपुरतें भाड्यानें घ्यावें, त्याप्रमाणेंच हे कर्मठ केलेल्या कर्माच्या मोलानें स्वर्गादि सुस्थळें कांहीं ठराविक मुदतीनें भाड्यानें घेतात. मग यामध्यें त्यांना इतका मोठा लाभ वाटावा, हें खरोखर आश्चर्य आहे.

१५ याच कारणास्तव ज्ञानयोगी पुण्यालाही पापच म्हणतात. कांहीं काळ पुण्याचें फळ भोगावयास सांपडलें, तरी त्यापूर्वीं पापाचें फळ जें दुःख तेंच पदरांत होतें, आणि पुण्यान्तीं सुख सरून पुन्हां पापाचें फळ जें दुःख तेंच वांट्यास येतें. दुष्टकर्म बंधक होऊन लोखंडाच्या बिडीप्रमाणें जाचतें. पुण्यकर्म हें सोन्याच्या बिडीप्रमाणें आहे, तरी पण तिचा बंधक गुण नाहींसा होतो असें नाहीं. मग हातपाय जखडून टाकणारी बिडी सोन्याची असली म्हणून काय झालें ? तिच्यांत सुख अगर भूषण मानण्यासारखें काय आहे ?

१६ **दीर्घकामी,** ज्याच्या इच्छा मोठमोठ्या आहेत असे, ओढाळ. **कुवाटे,** भलत्याच वाटेनें.

१७ **आद्यन्तवंत,** ज्यास आदि व अन्त आहेत असें ( फल ), नश्वर.

१८ पूर्वार्ध.–वेदांत चातुर्मास्ययज्ञ करणाराला अक्षय्य पुण्य सांगितलेलें आहे.

१९ क्षय पावणाऱ्या देवांना जसें 'अमर' हें नांव देतात, त्याप्रमाणेंच हें यज्ञाचें फळ वेदांमध्यें 'अक्षय्य' म्हटलें आहे. बराच काळ लोटल्यावर अमर देवांनाही जसें मरण येतेंच, तसाच यज्ञकर्मापासून उत्पन्न होणाऱ्या या अक्षयांचाही बऱ्याच दिवसांअखेर क्षयच होणार. **अक्षयें,** 'अक्षय' म्हटलेलीं पुण्यें.

२० यावर कोणी अशी शंका घेतील कीं, "मुक्तीचीं फळें शाश्वत आहेत, असें श्रुतींत लिहिलें आहे. मग त्या स्थळींही 'शाश्वत' शब्दाचा अर्थ असाच कां करीत नाहीं ?" या शंकेला आम्ही पुढील प्रत्युत्तर देतों:–

२१ 'मुक्तिफळें शाश्वत नाहींत,' असें जर वेदांत कोठें प्रतिपादन केलें असतें, तर 'मुक्तिफळें शाश्वत नाहींत' असें म्हणतां आलें असतें; परंतु वेदांत असें प्रतिपादन कोठेंच नसल्यामुळें, 'मुक्तिफळें शाश्वत नाहींत' हें विधान करितांच येत नाहीं. कर्ममय फळ शाश्वत नसतें, हें जें विधान

आम्ही करितों, तें श्रुतीच्याच आधारानें करितों. ( हा श्रुतीचा आधार पुढील श्लोकांत दिला आहे. )

२२ **कर्मार्जिता**, कर्म करून मिळविलेल्या. **पदें**, स्थळें, स्थानें, ठिकाणें.

२३ यावर असें विचारण्यांत येईल कीं, “ चातुर्मास्ययज्ञादि पुण्यें जर श्रुतिसिद्धान्तानेंच कर्ममय म्हणून नश्वर ठरतात, तर श्रुतीच त्यांना ‘अक्षय्य’ कशा म्हणतात, तें सांगा.” यास आमचें उत्तर असें आहे, कीं ‘अक्षय्य’ शब्दानें ‘ अगण्य ’ असा अर्थ समजावा; कारण त्या पुण्याचें फळ पुष्कळ वर्षेंपर्यंत टिकतें. **अब्द**, वर्ष.

२४ **तयांत ऐसा**, त्या कर्मफळाच्या नाशाप्रमाणें.

२५ **बोलेल**, उपदेशील.

२६ **पूर्वपक्ष**, शंका, प्रश्न, आक्षेप.

२८ **जसें तसें करुत**, कोणत्या तरी निमित्तानें करोत. उत्तरार्धः– परंतु हीं फळें विरागी जनांना सांगितलेलीं नाहींत; जे सकाम आहेत त्यांनाच हें आमिष दाखविण्यांत येतें.

३० **तुच्छ**, उपेक्षा करण्यासारखें, हलकें, हीन.

३१ **श्रुति**–“ त्रीणि पदा विचक्रमे विष्णुर्गोपा अदाभ्यः। अतो धर्माणि धारयन् विष्णोः कर्माणि पश्यत ॥ ”

३२ **कर्णासि जें पारणें**, कानाला अत्यन्त संतोष देणारें, कर्णमधुर.

३३ **विधि**, ( कर्म करण्याची ) आज्ञा. ‘ संध्यामुपासीत ( संध्या करा ) ’ ही जशी वेदाज्ञा आहे, त्याप्रमाणेंच येथें ‘ विष्णोः कर्माणि पश्यत ( विष्णूचीं कर्में पहा ) ’ हीही वेदाची आज्ञाच आहे.

३४ परंतु स्वर्गादि पदें मिळविण्याचाच ज्यांना छंद जडला आहे, ते विचारतात कीं, “ ‘ विष्णूची सेवा करून ’ असें श्रुतींनीं कधीं सांगितलें आहे ? श्रुति नुसत्या असें म्हणतात कीं, ‘ हरिकर्म पहा व विष्णुधर्म धरून रहा. ’ विष्णूची सेवा करा असें मुळींच ह्मणत नाहींत. ”

३५ **लोककामी**, स्वर्गादि लोकांची इच्छा करणारे. **पापी होउनि**, पुण्य संपल्यावर.

**नहुष,** सोमवंशी राजा. इंद्राच्या हातून ब्रह्महत्या घडल्यामुळें तो एकदा पदच्युत झाला होता. तेव्हां देवांनीं नहुषाला इंद्रपद दिलें. या अधिकारानें नहुष इतका चढून गेला, कीं त्यानें इंद्राची स्त्री इंद्राणी हिच्यावरही आपली हुकमत चालविण्याचा प्रयत्न केला. 'तुह्मी अपूर्व वाहनांत बसून मजकडे या, म्हणजे मी तुमची हुकमत पाळीन,' असा इंद्राणीनें नहुषास जबाब दिला. तेव्हां तिची मनधरणी करण्याकरितां, नहुष आपल्या पालखीस सप्तर्षि व अगस्ति मुनि यांस लावून इंद्राणीकडे जाण्यास निघाला. जातांना त्या अधीर झालेल्या नहुषानें ऋषींनीं जलद चालावें म्हणून त्यांच्या मस्तकांना पायानें टोंचून, 'सर्प, सर्प.' ( चला, चला ) असे शब्द उच्चारले. तेव्हां क्रोधसंतप्त झालेल्या अगस्तींनीं त्याला शाप दिला कीं, 'जा, तूंच सर्प हो!' तेव्हां नहुष तत्काळ अजगर होऊन यमुनागिरीवरील सरोवरांत पडला. **वरकड,** इतर.

३७ **चपेटा,** चपराक, थप्पड. **काम्य,** काममय, वासनांनीं भरलेला.

३८ **केवळ फलात्मक,** नुसती सकाम, फक्त कामनांकडेच लक्ष पुरवणारी.

४१ '**एस**' ऐवजीं '**ऐसें.**'

४२ **दीर्घबुद्धि,** धोरणी, शाहणे.

४३ **निधि,** ठेवा, द्रव्यसंग्रह.

४५ **तेंही नुरे** इ०, आणि जर यदाकदाचित् कांहीं पाप घडलेंच, तर तें नामप्रतापामुळें नाहींसें होईल.

४८ उत्तरार्ध.–जे हरिनामोच्चार करितात, त्यांचें रक्षण हरीचीं आयुधें निरंतर फार सावधगिरीनें करीत असतात. "यम सांगे दूतां, । 'तेथें नाहीं तुम्हां सत्ता, । जेथें होय कथा । सदा घोष नामाचा. ॥ नका जावूं तया गांवा । नामधारकांच्या शिवा । सुदर्शन यावा । घरटी फिरे भोंवती. ॥ चक्र गदा घेऊन हरी । उभा राहे त्याच्या द्वारीं, । लक्ष्मी कामारी । ऋद्धि सिद्धीसहित. ॥ ते वळियाशिरोमणी । हरिभक्त ये मेदिनी,' । तुका म्हणे, कानीं । यम सांगे दूतांचे. ॥" ( तुकाराम ).

४९ **झणीं नेणत जाल,** कदाचित् अजाणतेपणानें जाल, कधींही जाऊं नका.

५२ **विहित,** योग्य, नियमानुसार.

---

## अध्याय ३, चरण ४.

**सारांश.**–अखेर आपल्या दूतांना यमदूत बजावून ठेवितो कीं, "दूतांनो, हरिनामाचा प्रताप असा असल्यामुळें जो हरिनाम उच्चारील त्याला पापदण्ड भोगण्यासाठीं आणण्याच्या भरीस पडूं नका. कोणाचाही अंतकाळ प्राप्त झाला म्हणजे त्याला आणण्याकरितां मी तुम्हांस पाठवितों; परंतु देहावसानसमयीं जर तो जाणून अगर नेणून नामोच्चार करील, तर तो सर्वपापमुक्तच झाला व त्यावर तुमचा शह चालणार नाहीं.

आज तुम्हीं अज्ञानानें या नियमाचें उल्लंघन करून परमेश्वराचा मोठा अपराध केला आहे. परंतु परमात्म्यानें कृपाळू होऊन या अपराधाबद्दल तुम्हांला योग्य शासन केलें नाहीं. पण यापुढें जपून वागा, कारण सेवकांचे अपराध धन्याला भोंवतात. तुमच्या अपराधाबद्दल मी परमात्म्याची क्षमा मागतों." इतक्या हकीकतीनंतर 'जो हा विषय वाचील व ऐकेल तो भगवद्भक्त होईल,' ही साधी फलश्रुति सांगून प्रकरणसमाप्ति केली आहे.

२ **नरकार्ह,** नरकायातनेस पात्र.

३ **तदंघ्रिधूळी,** त्या हरिभक्तांच्या पायाचे रजःकण. **नरकमार्गमयी तृष्णा,** नरकाची वाटच अशी दुर्वासना, पातकी इच्छा.

५ **विधिकर,** आज्ञा अमलांत आणणारे, सेवक, दूत.

६ **जाणोनेणो,** जाणो किंवा नेणो, कळून अगर न कळून. **अत्यन्त शुद्धी,** मागें २।२।२–१६ व टीपा पहा.

८ **यातनालोक,** नरकादि पापदंड भोगण्याचीं ठिकाणें.

११ म्हणून या ठिकाणीं दुसरे कोणतेही शास्त्रनियम नाहींत आणि स्वर्गसुखलाभादि भाकड फलश्रुतीही शुकाचार्य सांगत नाहींत. **भागवतशास्त्रांत** आडपडदा न करितां अगर कोणतेही डावपेंच न लढवितां,

मोकळ्या मनानें खराखरा विष्णुधर्म सांगितला आहे. मग तेथें काल्पनिक फलश्रुती कशा येतील ? मागें २।४।५३-५५ व टिपा पहा.

१२ **हरिदास्य,** हरिसेवा.

१३ यम म्हणतो, "हरिनाममहिमा न जाणून तुम्ही जर अंतकाळीं कोणत्याही निमित्तानें हरिनाम उच्चरणाऱ्या मनुष्याला यदाकदाचित् पकडाल, तर तो त्या नामप्रतापानें तुमच्या बंधांतून सुटेलच आणि शिवाय तुम्हीं केलेल्या अपराधानें मीमात्र दोषी ठरेन."

१६ **महदतिक्रम,** मोठा अपराध, भयंकर गुन्हा. **तव किंकरकिंकरीं,** तुझ्या दासाच्या (माझ्या) दासांनीं.

१९ **समस्त प्रकरणार्थ,** एकंदर विषयाचें तात्पर्य.

२४ **पदपद्मचित्सुखसुधा,** हरीच्या चरणकमलापासून प्रसवणारें ज्ञानसुखरूपी अमृत. **मृगनीरमायिकगुणीं,** मृगजळाप्रमाणें खोट्या अशा मायेच्या गुणांनीं. 'घ' ऐवजीं 'घे' वाचावें.

२५ **बसला,** वठला, उमटला. **विज्वर,** गतज्वर, शांत, समाधानयुक्त.

२७ **तुज विस्मय** इ०, हे राजा, हा एकंदर विषय ऐकून तूं जसा आश्चर्यचकित झाला आहेस, असेच ते यमदूतही आपल्या धन्याचें भाषण ऐकून चकित झाले.

२९–३१ हा इतिहास अगस्तीनें शुकाला प्रथम सांगितला, परंतु व्यासांनीं पुराणांत पूर्वीच भविष्य करून ठेविलें होतें, कीं "अगस्तिमुखानें माझ्या मुलाला (शुकाला) हा इतिहास कळल्यावर, तो आपल्या शिष्याला हा सांगेल." म्हणून हें भविष्य कथन करितांना, आपल्याला प्रवास करीत असतां मलयाचलावर अगस्तिमुखानें हा इतिहास कसा कळला तें शुकाचार्यांनीं परिक्षित् राजाला सांगितलें.

३२ **पद्मालया,** लक्ष्मी. **सद्म** घर, प्रेमाचें ठिकाण.

३३ **श्रीवल्लभ,** लक्ष्मीप्रिय, कमळापति. **भागवती गती,** निष्काम व ज्ञाननिष्ठ सगुणभक्ताला अजामिळाप्रमाणें प्राप्त होणारी मुक्तस्थिति. **वामना,** मला वामन कवीला.

समाप्त.

REFBK 0001983

REFBK-0001983